सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २४८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघकार्य करण्यासाठी आपल्याला कार्यकर्त्यांची संख्या वाढवणे आवश्यक असते. हे कार्यकर्ते आपल्या उपलब्ध स्वयंसेवकातून मिळतील. त्यासाठी सकारात्मक दृष्टी विकसित करावी. प्रत्येकामध्ये काहीना काही सद्गुण असतोच ही युधिष्ठिराची दृष्टी होती. आपलीही दृष्टी युधिष्ठिरासारखी हवी, म्हणजे आपल्याला कार्यकर्ते मिळतील.

**- श्रीकृष्ण मोतलग**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा.
सह प्रचारक प्रमुख

# वनविभागाची परवानगी न घेताच सोलापूर विद्यापीठाने केले बांधकाम

- शासनाकडून घेणार मार्गदर्शन
- इको सेन्सिटीव्ह झोन
- समितीच्या बैठकीत निर्णय



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने राखीव वनक्षेत्र लगतच्या गट ३५६ व ३६५ मध्ये नवीन प्रशासकीय इमारत, भव्य स्मारकाची उभारणी, खेलो इंडिया मल्टीपरपज हॉल आदी बांधकामे केली आहेत. परंतु त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीची परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. या समितीने यावर राज्य शासनाकडे मार्गदर्शन मागविण्याचे ठरविले आहे. उर्वरीत गट क्रमांक ३६६ व ३५७ मधील बांधकाम करण्यासाठी समितीने मंजूरी दिली आहे. देशाचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना धडे देणाऱ्या विद्यापीठाकडून असे प्रकार योग्य नसल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात रंगली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (दि.७) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपवन संरक्षक कुलराज सिंग, सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपसंचालक निखिल मोरे, संनियंत्रण समिती सदस्य प्रा. डॉ. निनाद शहा, नगररचना, भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाने ४९२ एकर क्षेत्रामध्ये नवीन स्वतंत्र इमारत, स्मारक व अन्य बांधकाम केली आहेत. ९० ते ९५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्याचा मानस कुलगुरू प्रा. महानवर यांनी पत्रकार परिषेदेत दोन वेळा व्यक्त केला होता. परंतु रस्त्याचे काम झाले नसल्यामुळे यास गती येत नव्हती. त्यामुळे उद्घाटनाचा मुहुर्त दोन वेळा पुढे गेला. विस्तार क्षेत्रातील काही जमिनीचे गट वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रात येतात. नवीन प्रशासकीय इमारतीस जाण्यासाठी रस्ता, बांधकामासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. पण, त्याबाबत विद्यापीठाने स्वतंत्र आराखडाच वन विभागाकडे सादर केलेला नव्हता. दरम्यान, वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रासह इतर प्रश्नांबाबत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मंत्रालयात बैठक घेतली होती. त्यानंतर दोन वेळा जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली होती.

### ● विद्यापीठ प्रशासनाचा ढिसाळ कारभार

विद्यापीठाने ४९२ एकर क्षेत्रात विद्यापीठाचे विस्तारीकरण करताना स्थानिक प्रशासन, संबंधित यंत्रणांची परवागनी घेणे बंधनकारक असताना त्याकडे दुर्लक्ष केले. यासाठी तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व त्यानंतर विद्यमान कुलगुरू प्रा. महानवर यांचे प्रशासन जबाबदार आहे. त्यामुळे प्रशासनाचा ढिसाळ कारभार यातून दिसून येत आहे.

### ● स्थानिक समितीच्या परवानगीची गरज

विद्यापीठास मिळालेले प्रस्ताव जागेच्या लगतचे काही गट राखीव वनक्षेत्रातील आहेत. वनकायद्यानुसार वनविभाग त्यासंदर्भात कार्यवाही करेल, असा तत्कालीन सहाय्यक वनसंरक्षकांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विद्यापीठाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. संबंधित विभागाची कायदेशीर परवानगी घ्यावे, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. त्यामुळे विद्यापीठाला आता इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीच्या परवानगी गरज आहे.

# सुप्रीम कोर्टाचा 'निर्णायक' दिवस

● महामार्ग, शाळा, रुग्णालयांतून भटके श्वान हटवा ● नसबंदीनंतर निवारागृहात ठेवा ● सर्वोच्च न्यायालयाचे कठोर आदेश

◆ **नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

सर्व राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांवरून भटक्या प्राण्यांना हटवावे. भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी रुग्णालये, शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात कुंपण घालावे, अशा कठोर सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांशी संबंधित एका प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय देशभर लागू होईल, असा निर्णय दिला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एनव्ही अंजारिया यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यांनी सांगितले की, भटक्या श्वानांना पकडल्यानंतर त्यांची नसबंदी करावी आणि त्यांना निवारागृहात ठेवण्यात यावे.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तीन आठवड्यांच्या आत स्थिती अहवाल आणि प्रतिज्ञापत्र दाखल करावे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १३ जानेवारी रोजी होणार आहे. (वृत्तसंस्था)





### आदेशातील ठळक मुद्दे

- सर्व राष्ट्रीय महामार्गांवर भटक्या प्राण्यांची उपस्थिती कळविण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक असतील.
- दोन आठवड्यांच्या आत, राज्य सरकारे आणि राज्य अधिकारक्षेत्रे सरकारी आणि खाजगी शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांना कुंपण उभारावे.
- देखभालीसाठी एक नोडल अधिकारी नियुक्त केला जाईल. महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायतींनी दर तीन महिन्यांनी किमान एकदा या कॅम्पसची तपासणी करावी.
- पकडलेल्या भटक्या श्वानांना जिथून उचलले होते त्याच ठिकाणी परत सोडले जाणार नाही.


## तकिया मशीद पाडकामावर शिक्कामोर्तब

### मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळली

◆ **नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

उज्जैनमधील तकिया मशीद पाडण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करीत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळून लावली. मशिदीत नमाज पठन करणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी ही याचिका दाखल केली होती.

मध्य प्रदेश सरकारने महाकाल मंदिरासाठी पार्किंग क्षेत्र वाढवण्यासाठी तकिया मशीद पाडण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते. या विरोधात मुस्लिम पक्षाने सुरुवातीला मध्य प्रदेश उच्च न्यायालयात धाव घेत निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. मात्र खंडपीठाने त्यांची मागणी फेटाळून लावली. उच्च



न्यायालयाच्या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनासमोर झालेल्या सुनावणीत मुस्लिम पक्षाचे वकील एम. आर. शमशाद यांनी युक्तिवादात सांगितले की, ही मशीद २०० वर्षे जुनी असून, दुसऱ्या धार्मिक स्थळाच्या पार्किंगसाठी इतर धर्माचे प्रार्थनास्थळ हटविणे धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन असल्याचा युक्तिवाद केला. पण, न्यायालयाने तो फेटाळून लावला. (वृत्तसंस्था)

## प्रतिज्ञापत्रात गुन्हा लपवता कामा नये

### निवडणूक उमेदवारांना कोर्टाची तंबी

◆ **नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

गुन्हेगारी शिक्षा असलेल्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला. न्यायालयाने म्हटले आहे की प्रत्येक उमेदवाराने नामांकन अर्जात मागील सर्व शिक्षा उघड केल्या पाहिजेत, मग तो गुन्हा किरकोळ असो किंवा उच्च न्यायालयाने नंतर शिक्षा रद्द केली असेल तरीही. यासंदर्भातील कोणतीही माहिती दडवल्यास प्रसंगी उमेदवाराचे नामांकन रद्द केली जाऊ शकते.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि ए. एस. चांदुरकर यांच्या न्यायासनाने म्हटले आहे की, माहिती उघड न करणे मतदाराच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. यामुळे मतदाराला योग्य निवड करण्यापासून रोखले जाते. ते लपवल्याने नामांकन रद्द होऊ शकते.

मध्यप्रदेशातील भेकनगाव येथील नगरसेविका पूनम या नियमाला बळी पडल्या. तिच्यावर चेक बाऊन्सचा खटला सुरू होता (कलम १३८), ज्यासाठी ट्रायल कोर्टाने तिला एक वर्ष तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा सुनावली. तिने तिच्या नामांकनात ही वस्तुस्थिती लपवली. उच्च न्यायालयाने नंतर शिक्षा रद्द केली, परंतु पूनम यांनी दावा केला की शिक्षा रद्द करण्यात आली असल्याने ती उघड करण्याची आवश्यकता नाही. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळून लावली आणि रद्द केलेल्या शिक्षा देखील उघड करणे आवश्यक असल्याचे म्हटले. (वृत्तसंस्था)

## भारताच्या दौऱ्यावर लवकरच जाणार : ट्रम्प

◆ **वॉशिंग्टन, ७ नोव्हेंबर**

भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे मोठ्या प्रमाणात बंद केले असून, पंतप्रधान मोदी यांच्यासोबत माझी सकारात्मक चर्चा सुरू आहे. मी लवकरच भारत दौऱ्यावर जाणार असून मोदी यांना भेटण्यासाठी उत्सुक असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.



प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, पंतप्रधान मोदी माझे घनिष्ठ मित्र असून त्यांच्याशी माझी सकारात्मक चर्चा सुरू आहे. आमचा नेहमीच दूरध्वनीवरून संवाद होतो. मोदी महान व्यक्तिमत्व असून, त्यांनी मला भारत भेटीचे निमंत्रण दिले आणि मी ते स्वीकारले आहे. मी लवकरच भारत भेटीवर जाणार आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारासंदर्भातील वाटाघाटी अजूनही सुरू आहेत. काही मुद्यांवर मतभेद असले तरी मला विश्वास आहे की, दोन्ही देशात लवकरच कराराचा अंतिम निर्णय होईल. व्यापार चर्चा गेल्या काही महिन्यांपासू सुरू आहे आणि भारताने आपली बाजारपेठा आणखी खुली करण्याचा विचार करावा असे मला वाटते. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे कमी केले आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### खासदाराच्या खात्यातून ५६ लाख लंपास

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या जुन्या बँक खात्यातून जवळपास ५.६ दशलक्ष (अंदाजे ५.६ दशलक्ष) पैसे काढण्यात आले आहेत. बँक अधिकाऱ्यांनी कोलकाता पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी सांगितले की, फसवणूक करणाऱ्याने बॅनर्जी यांच्या खात्याचे केवायसी तपशील अपडेट करण्यासाठी खासदाराचे बनावट पॅन आणि आधार कार्ड वापरले. त्यानंतर घोटाळेबाजाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजी खात्याशी जोडलेला नोंदणीकृत मोबाइल नंबर बदलला. यामुळे त्याला खात्यात पूर्ण प्रवेश मिळाला. एकदा क्रेडेन्शियल्स बदलल्यानंतर, फसवणूक करणाऱ्याने असंख्य अनधिकृत इंटरनेट बँकिंग व्यवहार केले आणि ५६,३९,७६७ काढले असा आरोप आहे.

### संपूर्ण जम्मू-काश्मीरवर भारताचा हक्क

**इस्लामाबाद :** पाकिस्तानी प्राध्यापक इश्तियाक अहमद यांचा असा युक्तिवाद आहे की जम्मू आणि काश्मीरवर भारताचा खरा हक्क आहे. त्यांनी सांगितले की फाळणीनंतर पाकिस्तानने जुनागढ राज्यावर दावा केला, जे भारताच्या सीमेपासून २५० किलोमीटर अंतरावर गुजरातमध्ये होते. त्यांनी दावा केला की जुनागढचे राज्यकर्ते मुस्लिम होते आणि त्यांना पाकिस्तानात सामील व्हायचे होते. म्हणून जुनागढ पाकिस्तानातच राहिले पाहिजे. ही पाकिस्तानची चूक होती. जुनागढची लोकसंख्या ९१ टक्के हिंदू होती आणि पाकिस्तान, शासकाच्या मुस्लिम ओळखीचा हवाला देऊन, तो प्रदेश जोडू इच्छित होता. जर हाच युक्तिवाद जम्मू, काश्मीरला लागू केला तर पाकिस्तानला कसा अधिकार असू शकतो? सध्याची परिस्थिती अशी आहे की पाकिस्तानच्या बाजारपेठा डबघाईला आल्या आहेत. जर भारताशी संबंध पूर्ववत झाले तर अर्थव्यवस्थेला फायदा होईल

### महसूल विभाग, पोलिस करीत आहेत पार्थला वाचवण्याचा प्रयत्न

**पुणे :** उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शुक्रवारी महाराष्ट्राचे महसूल आणि पोलिस विभाग पुणे जमीन व्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांना कारवाईपासून वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला आहे. पुण्यातील पार्थ पवार यांच्याशी संबंधित एका कंपनीचा ३०० कोटी रुपयांचा जमीन व्यवहार अनियमिततेचा आरोप आहे. यामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. सरकारने एका उपनिबंधकाला निलंबित करून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. या व्यवहारासंदर्भात तीन जणांविरुद्ध एफआयआर नोंदविण्यात आला आहे. नोंदणी प्रक्रियेत तेच कागदपत्र वापरले जात असूनही आणि चौकशी अहवालात जिल्हा उद्योग मंडळाच्या मुद्रांक शुल्कात सूट देण्याच्या ठरावावर पार्थ पवार यांच्या स्वाक्षरीचा उल्लेख असूनही, अधिकाऱ्यांनी त्यांचे नाव का टाळले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महसूल विभाग आणि पोलिस त्यांना कायदेशीर कारवाईपासून वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे.

# पार्थ पवार : कथित जमीन घोटाळ्यातील व्यवहार रद्द

**सखोल चौकशी होणार : अजित पवार**

◆ **मुंबई, ७ नोव्हेंबर**

अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठे वादळ निर्माण झाल्यानंतर यासंदर्भातील जमीन व्यवहार रद्द करण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. आता यावर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक खुलासे केले आहेत.

अजित पवार म्हणाले, गेल्या २-३ दिवसांपासून माध्यमांमध्ये जी काही चर्चा सुरू आहे, त्याची माहिती घेऊन मी आपल्याशी बोलेल असे मी सांगितले होते. मी स्पष्टपणे सांगितले होते की माझ्या



आतापर्यंतच्या राजकीय जीवनात मी कधीही नियम सोडून कुठले काम केले नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले होते, पण ते सिद्ध झाले नव्हते. तसेच या व्यवहारात सुद्धा मला अजिबात माहीत नव्हते. माहीत असते तर मी असे काही होऊ दिले नसते. मी कधीही जवळच्या, नातेवाइकांनी, माझ्या मुलांनी काही जरी व्यवसाय केला असेल तर मी त्यांना सांगत असतो की नियमात असेल ते काम करा.

### या प्रकरणात एक रुपयाही देण्यात आलेला नाही

आता या प्रकरणावर सांगायचे झाले तर, या प्रकरणात एक रुपयाही देण्यात आलेला नाही. तरी मोठे मोठे आकडे सांगितले, मोठ्या गोष्टी सांगितल्या आणि विरोधकांनी देखील आम्हाला टार्गेट केले, ते त्यांचे काम आहे. मला आज संध्याकाळी समजले की, सर्व व्यवहार रद्द करण्यात आले. तसेच या राज्याचे ॲडिशनल चीफ सेक्रेटरी रेव्हेन्यू यांच्या अध्यक्षतेखाली काही विभागीय आयुक्त यांची समिती आज जाहीर करण्यात आली आहे. तसेच एक महिन्याच्या आत याबद्दलचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### वस्तुस्थिती जनतेला कळणे महत्त्वाचे


अजित पवार म्हणाले, आता या प्रकरणाची मी संपूर्ण माहिती घेतल्यावर मुख्यमंत्र्यांशी फोनवर संवाद साधला. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, हा जरी माझ्या घरातला मुद्दा असला तरी तुम्ही राज्याचे प्रमुख आहात, तुम्हाला जे काही नियमाप्रमाणे करावे लागेल, चौकशी करावी लागेल, एसआयटी नेमायची असेल, त्याला माझा पाठिंबा असेल. आरोप करणे सोपे असते, परंतु वस्तुस्थिती जनतेला कळणे महत्त्वाचे आहे.

# धनंजय मुंडेंनी हत्येची सुपारी दिली

● मनोज जरांगेंचा खळबळजनक आरोप ● अडीच कोटीत झाली डील

◆ **बीड, ७ नोव्हेंबर**

माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडे यांच्या सांगण्यावरूनच रचण्यात आला आणि त्यासाठी अडीच कोटींची डील झाल्याचा खळबळजनक आरोप मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी केला.



जरांगे पत्रपरिषदेत म्हणाले, मुंडे यांनीच माझ्या हत्येचा कट रचला आणि हत्या करण्यासाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, त्यापैकी ५० लाख रुपये देण्यात आले. बीडमधील कांचन नावाची व्यक्ती धनंजय मुंडेंचा कार्यकर्ता आहे. त्याने दोन आरोपींपैकी एकाला परळीला नेले होते. त्यानंतर भाऊबीजेच्या दिवशी झाल्टा फाटा येथे मुंडे यांनी या आरोपींची भेट घेतली. आम्ही त्याला ठोकतो असे आरोपींनी सांगितल्यावर, मुंडे यांनी मी जुनी गाडी देतो असे आश्वासन दिले. या घातपाताच्या कटाचे मूळ धनंजय मुंडे आहे. राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही, असे म्हणत जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना नार्को टेस्ट करण्याचे आव्हान दिले. पुढे जरांगे म्हणाले, मला मिळालेली माहिती मी पोलिसांना दिली. घातपाताच्या प्रकरणात आठ ते दहा जण असून त्यात मुंडे यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### नार्को टेस्ट, सीबीआय चौकशी करा : मुंडे

मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपाला पत्रपरिषदेतून प्रत्युत्तर देत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे म्हणाले, जरांगे आणि माझी ब्रेन मॅपिंग, नार्को टेस्ट करावी आणि हे प्रकरण सीबीआयकडे तपासासाठी द्यावे, अशी माझी मागणी आहे. माझ्यावर केलेले आरोप खोटे आहे, त्यात कुठलेही तथ्य नाही. मी पाच वर्षे विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. त्यावेळी मराठा आरक्षणासाठी सभागृह बंद पाडले. मी सभागृह चालू दिले नाही. बीड जिल्ह्यात ८० हजार कुणबी प्रमाणपत्र मी वाटले. जरांगे यांचे उपोषणही मी सोडले. आता वकिलांशी चर्चा करून पुढील कायदेशीर पाऊल उचलणार आहे. खालच्या पातळीचे आरोप मी सहन करणार नाही.



# पार्थ पवार दोषी असतील तर मुख्यमंत्री कारवाई करतीलच!

**पालकमंत्री गोरे : काँग्रेसचे दिलीप माने यांच्या भाजपा प्रवेशाबाबतही मांडली भूमिका**

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

मुंढवा जमीन खरेदी प्रकरणात अनियमितता, चुकीचे झाल्याचे निदर्शनास आल्यास पार्थ पवार यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करतील, अशी प्रतिक्रिया राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवारी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. दरम्यान, या प्रकरणाबाबत प्राथमिक कारवाई करण्यात आली असून, इतर काहीजणांवर गुन्हेही नोंद झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माजी आमदार दिलीप माने यांच्या भारतीय जनता पार्टीतील प्रवेशाबाबत आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, संघटना, पार्टी वाढवित असताना कोणाला वाईट वाटते, कोणाला चांगले वाटत असते. सध्या ऑपरेशन लोटस् जोरात चालू आहे. आगे-आगे देखो होता है क्या...यामुळे एकेक नवीन प्रवेश करून पक्ष मोठा करण्याचे पक्षश्रेष्ठींचे धोरण आहे. कोणाच्या विरोधामुळे कोणाचा पक्षप्रवेश थांबणार नाही...यामुळे माजी आमदार दिलीप माने यांचा योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल...पक्षश्रेष्ठींचा आदेश आल्यावर प्रवेश दिला जाईल.

# 'वंदे मातरम्' ही भारत मातेची पूजा : पंतप्रधान

## राष्ट्रीय स्फूर्तिगीताचा १५० वा वर्धापन सोहळा

◆ **नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

'वंदे मातरम्' हा एक मंत्र, एक स्वप्न, एक संकल्प, एक ऊर्जा आहे. हे गाणे भारत मातेची पूजा आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. स्वातंत्र्य संग्रामात स्फूर्तिगीताचा मान मिळविणाऱ्या 'वंदे मातरम्'ला शुक्रवारी १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित सभेला ते संबोधित करत होते.

'वंदे मातरम्'च्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त भारत सरकारने वर्षभर देशभरात स्मरणोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजचा दिवस खूप ऐतिहासिक आहे. वंदे मातरम् ही भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा होती. ती प्रत्येक




वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त इंदिरा गांधी मैदानात आयोजित प्रदर्शनाची पाहणी करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

युगात प्रासंगिक आहे. १९३७ मध्ये, वंदे मातरम्चा एक भाग काढून टाकण्यात आला. वंदे मातरम्च्या विभाजनाने देशाच्या फाळणीचे बीज पेरले. ती फूट पाडणारी विचारसरणी आजही देशासाठी एक आव्हान आहे. आज, मी देशातील लाखो महापुरुषांना, भारतमातेच्या सुपुत्रांना, ज्यांनी वंदे मातरम्साठी आपले जीवन समर्पित केले, त्यांना आदरपूर्वक आदरांजली वाहतो आणि देशवासीयांना माझे मनापासून अभिनंदन करतो.

**गुलामगिरीच्या काळातील रचना**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर एकदा म्हणाले होते की, बंकिमचंद्रांचे आनंदमठ हे केवळ एक कादंबरी नाही, तर ते स्वतंत्र भारताचे स्वप्न आहे. 'आनंदमठ'मधील वंदे मातरम्चा संदर्भ, त्याची प्रत्येक ओळ, बंकिमबाबूंचे प्रत्येक शब्द आणि प्रत्येक भावना, या सर्वांचा खोलवर अर्थ होता आणि अजूनही आहे. हे गाणे गुलामगिरीच्या काळात रचले गेले होते, परंतु त्याचे शब्द कधीही गुलामगिरीच्या सावलीत मर्यादित नव्हते. ते गुलामगिरीच्या आठवणींपासून कायमचे मुक्त राहिले.

वंदे मातरम्च्या मूळ मजकुरात म्हटले आहे की, भारतमाता सरस्वती, लक्ष्मी आणि दुर्गा आहे. जेव्हा शत्रूने दहशतवादाद्वारे भारताच्या सुरक्षिततेवर आणि सन्मानावर हल्ला करण्याचे धाडस केले, तेव्हा संपूर्ण जगाने पाहिले की नवीन भारताला दहशतवादाचा नाश करण्यासाठी दुर्गा कसे व्हायचे हे देखील माहीत आहे. (वृत्तसंस्था)

### विशेष टपाल तिकीट, नाण्याचे प्रकाशन

राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधानांनी एक विशेष टपाल तिकीट आणि एक नाणे प्रकाशित केले. त्यांनी वर्षभर चालणाऱ्या स्मारकाचे उद्घाटन केले आणि एका संकेतस्थळाचेही लोकार्पण केले. विशेष म्हणजे, स्वतः पंतप्रधानांनी 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनात भाग घेतला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे...



### अंजली भोंग हिचे निबंध स्पर्धेत यश

**बार्शी दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत तालुका पंचायत समिती बार्शीच्यावतीने नागनाथ हायस्कूल घारी येथे संपन्न झालेल्या तालुका स्तरीय निबंध स्पर्धेत लहान गटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) शाळेची विद्यार्थीनी अंजली भोंग हिने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तिची जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरीय स्पर्धा येत्या ११ तारखेला पंढरपूर येथे होणार आहे. तिला वर्गशिक्षिका श्रीमती दिपाली गोरे यांचेसह मुख्याध्यापक अनिल काळे, प्रभाकर काटे, आनंद घाडगे, रामचंद्र बरचे, हरिभाऊ दळवी, श्रीमती वैशाली खुने,श्रीमती बेबीनंदा खडबडे, श्रीमती सुवर्णगौरी गवळी, श्रीमती मीरा गरड यांचे मार्गदर्शन लाभले.

### नगरपालिका निवडणुकीत दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

**सांगोला, दि.७ नोव्हेंबर -**

गतवेळी पार पडलेल्या सांगोला नगरपरिषद निवडणुकीत सांगोला शहरातील सर्वात मोठा पक्ष किंवा गट म्हणून दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या गटाला यश मिळाले होते. त्यांच्या विचारांचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे दिपकआबा साळुंखे पाटील आघाडीबाबत कोणती भूमिका घेतात यावर नगरपालिका निवडणुकीची समीकरणे अवलंबून असणार आहेत. त्यामुळे दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या भूमिकेकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. सांगोला शहर आणि परिसरातील अनेक वर्षे सोबत काम करणारे ज्येष्ठ सहकारी, नगरपालिका निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवार आणि महत्त्वाच्या कार्यकर्त्यांशी चर्चा आणि विचार विनिमय करून नगरपालिका



निवडणुकीबाबत पुढील दिशा ठरवणार तसेच युती आणि आघाडी बाबतचा निर्णय घेणार असे प्रतिपादन माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले. सांगोला शहर व परिसरातील प्रभागनिहाय इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करू आणि कार्यकर्ते ज्या पद्धतीने निर्णय घेतील त्याप्रमाणे त्यांच्या भावनेचा आदर करूनच सांगोला नगरपालिका निवडणुकीत कोणत्या पक्षासोबत किंवा नेत्यासोबत युती आघाडी करायची याचा निर्णय घेऊ असे श्री. साळुंखे-पाटील यांनी सांगितले.

### दारुच्या नशेत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर -**

बार्शी शहरातील मांगडे चाळ येथे २२ वर्षीय तरुणाने दारुच्या नशेत घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवार दि. ६ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. याची नोंद बार्शी शहर पोलीस ठाण्यात झाली. अक्षय पुट्टे (वय २२) असे मृत तरुणाचे नाव आहे. मृत हा दारुच्या नशेत असताना बार्शी येथील राहत्या घरातील लोखंडी पाईपला साडीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर तात्काळ घटना पोलिसांना कळविण्यात आली. बार्शी शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करुन, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.




### वंदे मातरम् गीताचा प्रचार व प्रसार करण्याची प्रत्येकाची जबाबदारी

**मुंबई, दि. ७ नोव्हेंबर:**

देशभक्ती जागृत करणाऱ्या 'वंदे मातरम्' गीताचा प्रत्येकाने गौरव करायला हवा. 'वंदे मातरम्' कडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघणाऱ्यांकडे दुर्लक्ष करत या गीताचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी केले. राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्ष पूर्तीनिमत्त प्रदेश भारतीय जनता पार्टीतर्फे प्रदेश कार्यालयात 'वंदे मातरम्' च्या सन्मानार्थ विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात संपूर्ण 'वंदे मातरम्' चे समूह गायन झाले. तसेच स्वदेशी वस्तू वापराचा संकल्प सोडण्यात आला. या कार्यक्रमाला आ. राजेश वानखेडे, आ. प्रवीण पोटे पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर, माजी आ. सुरेश हळवणकर, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, कार्यालय सह प्रभारी सुमंत घैसास, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सार्ध शताब्दी महोत्सव साजरा होत आहे. 'वंदे मातरम्' या गीताने स्वातंत्र्यलढ्यात देशभक्ती आणि एकतेची भावना जागृत केली. देशप्रेमाचे प्रतीक असलेले 'वंदे मातरम्' हे गीत १५० वर्षांपासून लोकांच्या मनात देशाबद्दल जाज्वल्य अभिमान आणि भारतीयांना स्फूर्ती देत आहे. या गीताचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. नव्या पिढीपर्यंत हे गीत सन्मानाने पोहोचले पाहिजे, असे सांगितले

### श्रावणी वाघमारे तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेत प्रथम



**सांगोला, दि. ७ नोव्हेंबर:**

तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेत जि.प.प्रा. शाळा, वझरे ता.सांगोला येथील विद्यार्थिनी श्रावणी महेश वाघमारे हिने प्रथम क्रमांक मिळवला असून तिची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, केंद्रप्रमुख मल्लय्या मठपती, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, सरपंच, मुख्याध्यापिका लता पाटील, शिक्षक खंडू गाडेकर, शिक्षिका मेघाराणी गुरव, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# राजकीय पक्षप्रमुखांची विभागीय आयुक्तांनी घेतली बैठक

## ६ नोव्हेंबरपर्यंत झालेल्या नाव नोंदणीची दिली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत ६ नोव्हेंबरपर्यंत झालेल्या नाव नोंदणीची माहिती देण्यासाठी विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांसोबत बैठक घेण्यात आली. मतदार नोंदणी अधिकाधिक व्हावी यासाठी सर्व जिल्हाधिकारी तसेच राजकीय पक्षांनी प्रयत्न करावेत, असे डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीस अपर आयुक्त तुषार ठोंबरे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मीनल कळसकर, राजकीय पक्षांचे जिल्ह्यातील प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्हाधिकारी, राजकीय पक्ष प्रमुख व प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम निवडणूकीपूर्वी एक वर्ष आधी सुरु करण्यात आला आहे. पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत पुणे विभागातील ५८ तालुक्यांमध्ये ५६४ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत नमुना क्रमांक १८ किंवा १९ द्वारे दावे स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक ६ नोव्हेंबरपर्यंत मागील निवडणुकीपेक्षा मतदार नोंदणी कमी प्रमाणात झाली आहे.

या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार याद्यांची मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी प्रसिद्धी, २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील.

या कालावधीतही मतदार नोंदणी करता येणार असल्याने प्रत्येक मतदाराने जागरुकतेने नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय पक्षांनी मतदारांमध्ये जागृती करावी. २५ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली करण्यासह पुरवणी यादी तयार करणे व छपाई करण्यात येणार आहे. तसेच अंतिम मतदार यादी मंगळवार ३० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतरही निवडणूक जाहीर होईपर्यंत मतदार यादीत नाव नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक पात्र मतदारांची नाव नोंदणी व्हावी यासाठी प्रयत्न व्हावेत. मतदार नाव नोंदणीच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यातील राजकीय पक्षांनी त्यांच्या सूचना संकलित करुन सादर कराव्यात. त्या सूचना भारत निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येतील, असेही डॉ. पुलकुंडवार म्हणाले. यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विविध सूचना केल्या.

## मनीषा मुसळे-माने हिच्या दोषमुक्ती अर्जावर २१ नोव्हेंबर रोजी होणार युक्तिवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी मनिषा मुसळे-माने हिने खटल्यातून दोषमुक्त होण्यासाठी दाखल केलेल्या अर्जावर सरकार पक्षाने आक्षेप घेतला आहे. या दोषमुक्तीच्या अर्जावर युक्तिवाद करण्यासाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी दि.२१ नोव्हेंबर पुढील तारीख दिली आहे. त्यामुळे याप्रकरणी सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, मनीषा मुसळे-माने हिचेमार्फत डॉक्टर शिरीष वळसंगकर, फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे घटनेपूर्वी ५ महिन्याचे सीडीआर व टॉवर लोकेशन न्यायालयात सादर करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. या अर्जावर सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले आहे, त्याबरोबर तपास अधिकाऱ्याचे म्हणणे देखील सादर करण्यात आले आहे. सरकार पक्षाच्या म्हणण्यानुसार. तपास अधिकारी यांनी अर्जात नमूद सर्व साक्षीदारांचे सीडीआर व एसडीआर मिळवण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. सदर सीडीआर व एसडीआर प्राप्त होताच ते न्यायालयात सादर करण्यास तयार आहेत. असे म्हणणे मांडून सदर अर्जास देखील तीव्र हरकत घेतली असून अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

मनीषा मुसळे-माने हीचा मोबाईल तपासावेळी पोलिसांनी जप्त केला होता. तो मिळण्यासाठी मनीषा हिने दाखल केलेल्या अर्जावर आज रोजी सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले असून मनीषा मुसळे माने हिस तिचा मोबाईल देण्यास सरकार पक्षाने हरकत घेतलेली आहे.

या तीनही अर्जावर दि.२१ नोव्हेंबर ही तारीख नेमण्यात आलेली आहे. यात मनीषा मुसळे माने हिचे तर्फे ऍड प्रशांत नवगिरे तर सरकारतर्फे प्रदीप सिंग राजपूत हे काम पाहत आहेत.

## महापालिकेच्या सेवासंदर्भात आता ऑनलाईन अपील करण्याची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या www. sola{urcor{oration.gov.in या अधिकृत वेबसाईटवर नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २००५ अन्वये अधिसूचित केलेल्या सेवां बाबत ऑनलाइन अपिल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना पारदर्शक, सुलभ व जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

महानगरपालिकेकडून अधिसूचित केलेल्या सेवांचा निर्णय निर्धारित वेळेत न मिळाल्यास अथवा प्राप्त सेवेसंदर्भात तक्रार असल्यास संबंधित सेवांचे अपिल आता नागरिकांना ऑनलाईन करता येणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या होम पेजवरील 'नागरिक' या मेनूमधील 'प्रथम सेवा अपिल' व 'द्वितीय सेवा अपिल' या पर्यायांखाली ही सुविधा उपलब्ध आहे. अपिल करताना नागरिकांनी संबंधित सेवेचे नाव निवडून, त्याबाबत ऑनलाईन अर्जाचा क्रमांक प्रविष्ट करावा. ओटीपी द्वारे खात्रीकरणानंतर अपिलासंबंधी आवश्यक कागदपत्रांची एकच पीडीएफ फाइल अपलोड करावी.अपिल सादर झाल्यानंतर अर्ज क्रमांक एसएमएस द्वारे नागरिकांना कळिवण्यात येईल. अपिलाच्या सुनावणीची वेळ व निकालाची माहिती देखील एसएम एसद्वारे पाठविली जाईल.सुनावणीचा निर्णय नागरिकांना वेबसाईटवरून थेट ऑनलाईन डाउनलोड करता येणार आहे. तसेच, सोलापूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर नागरिकांसाठी आणखी एक महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महानगरपालिकेकडून सध्या एकूण १४४ सेवा ऑनलाईन स्वरुपात दिल्या जात असून, या सर्व सेवांचा आढावा घेण्यासाठी 'सेवा डॅशबोर्ड' तयार करण्यात आला आहे. या डॅशबोर्डवर विभागनिहाय खालील माहिती एकाच ठिकाणी पाहता येईल. प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, निकाली काढलेल्या अर्जांची संख्या, तसेच कर्मचारीनिहाय प्रलंबित अर्जांची माहिती या ठिकाणी उपलब्ध आहे. डॅशबोर्डवरील 'वापरकर्त्यासाठी सूचना' या विभागात उपलब्ध माहितीसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन दिलेले आहे.या नव्या डिजिटल सुविधेमुळे सोलापूर महानगरपालिका अधिक पारदर्शक, जबाबदार व जनसुलभ प्रशासनाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकत असल्याचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

# ए.जी. पाटील महाविद्यालयात आविष्कार अंतर्गत विविध प्रकल्पांचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**




सोलापूर येथील स्वायत्त ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात अविष्कार २०२५-२६ या संशोधना आधारित पोस्टर व प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते. यात विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पना सादर केल्या. विविध सहा विभागातून जवळजवळ ५० पेक्षा जास्त प्रकल्प व त्याचे सादरीकरण झाले.

ह्युमॅनिटी लैंग्वेज अँड फाईन आर्ट्स यामधून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्रथमेश रामपोगु व नागेश कोंडाबत्तीन, कॉमर्स मॅनेजमेंट आणि लॉ या प्रकारांमध्ये शोएब इनामदार व मोहम्मद अरीवाले तसेच प्युअर सायन्स आर्यन मस्के व जय माशाळ एग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री पारस राजगिरी व समीक्षा कुलकर्णी इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी वैष्णवी गोनसग व तनिष्क माने आणि मेडिसिन आणि फार्मसी या विभागात समर्थ हक्क व अंजली माने या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न करून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेचे आयोजन व संचालन प्रा. आर.डी. मैत्री, प्रा. एस.जे. लिगाडे, प्रा. एस.एन. उपाध्ये, प्रा. एस.के. कोनापूरे व प्रा. रेणुका होर्तीकर यांनी केले. या प्रसंगी मेकॅनिकल इंजिनिअरींगचे विभाग प्रमुख डॉ. एस. बी. गदवाल, कॉम्प्युटर विभागप्रमुख प्रा. एस.व्ही. कुलकर्णी, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. टी. डी. मसलेकर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजीनियरिंग विभाप्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर व प्राध्यापक वृंद यांची उपस्थिती होती. आविष्कार-२०२५-२६ या स्पर्धेचे समन्वयक प्रा. श्रीशैल बिराजदार यांनी सर्वांचे स्वागत केले. स्पर्धेच्या परीक्षणासाठी डॉ. एस. बी. गदवाल, डॉ. आर. व्ही. दरेकर, प्रा. एस.व्ही. कुलकर्णी, डॉ. एस. आर. साखरे, प्रा. ए.एस. लिगाडे, प्रा. आर. बी. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री एस.ए. पाटील, ट्रस्टी शिवानंद पाटील यांनी अभिनंदन केले.



## डॉ.ओमप्रकाश शेटे यांची सिध्देश्वर शिक्षण मंडळास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या आयुष्मान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी नुकतीच येथील श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळास सदिच्छा भेट दिली.

भेटी दरम्यान त्यांनी संस्थेमार्फत चालवण्यात येणाऱ्या विभागाची माहिती घेतली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जागतिक स्तरावर वास्तुशास्त्र क्षेत्राला अनन्य साधारण महत्व असल्याचे नमूद करून त्याविषयी तंत्रज्ञानात होत असलेल्या नवनवीन बदलांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. संस्थेच्या वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले व आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील परस्पर सहकार्याद्वारे शिक्षक व समाजहितासाठी नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची शक्यता व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. आर. पाटील यांच्या हस्ते डॉ. शेटे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सचिव डॉ. शशिकांत हलकुडे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती सादर केली. सहसचिव असिम सिंदगी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, संस्थेतील सर्व विभागांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शहरातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

# विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडविण्यासाठी 'वंदे मातरम्'चा संकल्प करूया : मुख्यमंत्री

## मंत्रालयात सामूहिक 'वंदे मातरम् गीताचे गायन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ७ नोव्हेंबर-**

जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी 'वंदे मातरम्' म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक 'वंदे मातरम्' गीत गायनप्रसंगी केले.

वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचा कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर आदी उपस्थित होते.

फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्वांनी एकत्र वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंध ठेवणारी भावना आहे. कोलकाताच्या टाउन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती.



त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद देत ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर वंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्याविरुद्ध 'वंदे मातरम्' म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फेऱ्या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये हल्ला केला तरी 'वंदे मातरम्' गायिले जात होते. काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम् गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येऊन वंदे मातरम् चे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून 'वंदे मातरम्' तयार झाले.

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी फाशीवर जातानाही 'वंदे मातरम्' म्हणायचे. अहिंसेतून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करायचं आहे, असे म्हणणाऱ्या नेत्यांचे 'वंदे मातरम्' घोषवाक्य झाले. स्वातंत्र्याच्या परवलीचा शब्द तयार झाला. स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान वंदे मातरम् ने दिले. स्वतंत्र भारताचा झेंडा तयार करतानाही त्यावर वंदे मातरम् लिहिण्यात आले. महात्मा गांधी आपल्या प्रत्येक पत्राचा समारोप हा वंदे मातरम् ने करीत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीनंतर जन गण मन आणि वंदे मातरम् या दोन्ही गीतांना राष्ट्रगीताचा दर्जा देऊन समान सन्मान दिला, असे सांगून ते म्हणाले की.

प्रधानमंत्री मोदी यांचे एक विकसित भारताचे स्वप्न आहे. भारतामध्ये 'विकास भी और विरासत भी', अशा प्रकारची भावना त्यांनी मांडली आहे. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिलासारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले. वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. यावेळी पूर्वा निर्मिती विश्वतर्फे 'वंदे मातरम्'वर पथनाट्य सादर करण्यात आले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम् लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे 'वंदे मातरम्'चे सामुहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन झाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






(१) वंदे मातरम् राष्ट्रगीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त देशभरात स्मरणोत्सव साजरा होत आहे. त्रिपुराची राजधानी आगरतळा येथे कलाकारांनी वंदे मातरम् गीत सादर केले. (२) विशेष टपाल तिकीट, नाण्याचे प्रकाशन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी. (३) काश्मिरातील अनंतनाग येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थिनी. (४) पाटणा येथील कार्यक्रमात उपस्थित केंद्रीय गृहमंत्री अमित शाह.

# योग्यवेळी करू अणुचाचणी

## भारत कुणाचाही दबाव खपवून घेणार नाही : राजनाथसिंह

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

कोणताही देश राष्ट्रीय सुरक्षा किंवा अणुचाचण्यांच्या संदर्भात भारतावर दबाव आणू शकत नाही आणि आम्ही कुणाचाही दबाव खपवून घेणार नाही. भारत योग्यवेळी अण्वस्त्र चाचणी घेणार असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एका कार्यक्रमात सांगितले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अणुचाचण्यासंदर्भातील टिप्पणीवर एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना सिंह म्हणाले, भारत अमेरिका, चीन, पाकिस्तान किंवा इतर कोणत्याही देशाच्या दबावाला बळी पडणार नाही. भारत सरकार परकीय दबावाखाली नाही तर आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांवर आधारित निर्णय घेईल. भारत काय करेल हे भविष्य सांगेल. अमेरिका किंवा पाकिस्तान जे करत आहे त्यामुळे भारतावर दबाव येणार नाही. ते जे काही करायचे ते करू शकतात, आम्हाला जे योग्य वाटेल ते आम्ही योग्य वेळी करू, कुणाच्याही दबावामुळे भारत अण्वस्त्र चाचणी करणार नाही. पाकिस्तानविरोधातील संघर्ष आम्ही कुणाच्याही दबावात थांबविला नाही. आम्हाला पाकिस्तानच्या डीजीएमओकडून युद्धबंदीसाठी वारंवार फोन आले. ते फोन कॉल मिळाल्यानंतर आणि आम्हाला जे उद्दिष्टे साध्य करायची होती ती साध्य केल्यानंतरच आम्ही संघर्ष थांबविण्याची घोषणा केली.

बांगलादेशचे अंतरिम सरकारचे सल्लागार मोहम्मद युनूस यांना इशारा देताना संरक्षणमंत्री म्हणाले, भारत कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यास सक्षम आहे. परंतु आम्हाला बांगलादेशसोबत चांगले संबंध ठेवायचे आहे. युनूस यांनी भारतासंदर्भात काळजीपूर्वक टिप्पणी करावी. भारताला कमकुवत समजण्याची चूक कोणीही करू नये आणि आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.

# ‘चिकन नेक’जवळ भारताने उभारल्या तीन नव्या चौक्या

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

गेल्या काही काळापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत असलेली राजकीय हितसंबंधांची समिकरणं तसेच पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये झालेली जवळीक यामुळे भारतासाठी आपल्या ईशान्य भागातील सुरक्षेवर अधिक लक्ष ठेवणं आवश्यक बनलं आहे. त्यातही देशाच्या इतर भागाला ईशान्य भारताशी जोडणाऱ्या आणि चिकन नेक अशी ओळख असलेल्या सिलिगुडी कॉरिडॉरच्या सुरक्षेसाठी भारतीय लष्कराने या भागात तीन नव्या चौक्या उभ्या केल्या आहेत.

बांगलादेश आणि चीनची या भूभागावर वाकडी नजर आहे. सिलिगुडी कॉरिडोरला लागून असलेल्या या निमुळत्या पट्टीची लांबी ६० किलोमीटर असून रुंदी ही काही ठिकाणी २२ किलोमीटर एवढी आहे. या ‘चिकन नेक’ला लागूनच

### शत्रूची प्रत्येक चाल होणार निष्फळ




बांगलादेश, भूतान, नेपाळ आणि चीनच्या सीमा आहेत. सामरिकदृष्ट्या ही चिंचोळी पट्टी अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील असल्याने बांगलादेशचा या भूभागावर डोळा आहे. बांगलादेशी घुसखोर याच भागातून भारतात अवैधपणे शिरतात. याला आळा घालण्यासाठी या तीन चौक्या ह्या बमुनी, किशनगंज आणि चोपडा येथे उभ्या करण्यात आल्या आहेत. या चौक्या उभारण्याचा हेतू सीमेवर कमकुवत सुरक्षा व्यवस्था असलेल्या भागात सुरक्षा वाढवणे, गस्त वाढवणे आणि सिलिगुडी कॉरिडॉरचं रक्षण करणे हा आहे.

सिलिगुडी कॉरिडॉरला चिकन नेक म्हणून ओळखलं जातं. हा अरुंद पट्टा भारताच्या इतर भागाला ईशान्य भागातील राज्यांशी जोडतो. त्यामुळे सिलिगुडी कॉरिडॉर अत्यंत




संवेदनशील असून, हा भाग बंद झाल्यास भारताचा ईशान्य भारताशी असलेला संपर्क तुटू शकतो. शेख हसीना यांच्या राजवटीत चितगाव बंदरातून त्रिपुराशी थेट संपर्क स्थापन करण्यास मंजुरी दिली होती. यासाठी फेनी नदीवर पूलही बांधण्यात आला ज्याला मैत्री पूल असे नाव देण्यात आले. दरम्यान, बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी पाकिस्तानी जनरल साहिर शमशाद मिर्झा यांची भेट घेऊन चर्चा केली. यामध्ये कनेक्टिव्हिटी आणि संरक्षण संबंधांबाबत चर्चा केली होती. मोहम्मद युनूस यांनी शेख हसिना सत्तेतून पायउतार झाल्यानंतर चीनला गुंतवणुकीचा प्रस्ताव दिला होता. तसेच पाकिस्तानसोबतचे संबंध सुधारण्याबाबत विचारविनिमय केला होता. (वृत्तसंस्था)

**ब्रह्मोस क्षेपणास्त्रे तैनात**

**सामरिकदृष्ट्या हा भाग भारतासाठी हा भाग अत्यंत महत्त्वाचा असल्याने आणि इशान्य भागातील राज्यांशी जोडणारा मार्ग असल्याने शत्रूने कुठलीही आगळीक करू नये, म्हणून ‘चिकन नेक’ मध्ये भारताने ब्रह्मोस क्षेपणास्त्रे आणि हवाई संरक्षण प्रणाली तैनात केली आहे. त्यामुळे कोणत्याही देशाला चुकीचे पाऊल उचलण्यापूर्वी दहावेळा विचार करावा लागणार आहे.**

# धर्मांतर कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांना आव्हान

## हिंदू संघटनेची सर्वोच्च न्यायालयात धाव

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

अखिल भारतीय संत समिती या हिंदू संघटनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि बेकायदेशीर तसेच जबरदस्तीने धर्मांतर करण्यावर बंदी घालण्यासाठी अनेक राज्यांमध्ये लागू केलेल्या कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्याची विनंती केली.

अधिवक्ता अतुलेश कुमार यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत उत्तराखंड धर्म स्वातंत्र्य कायदा २०१८, उत्तरप्रदेश बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंध कायदा २०२१, हिमाचल प्रदेश धर्म स्वातंत्र्य कायदा २०१९ आणि मध्य प्रदेश धर्म स्वातंत्र्य कायदा २०२१ यासह अनेक राज्यांमध्ये लागू केलेल्या कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांना आव्हान देण्यात आले आहे. सप्टेंबरमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने वरील कायद्यांना आव्हान देणाऱ्या विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या याचिका स्वतःकडे हस्तांतरित केल्या. अखिल भारतीय संत समितीने या प्रकरणात पक्षकार बनवण्याची आणि न्यायालयात लेखी युक्तिवाद सादर करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

संघटनेचा असा युक्तिवाद आहे की धर्माचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य एखाद्या व्यक्तीला जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा अधिकार देत नाही आणि कायदा स्वतंत्र विचारसरणीवर आधारित स्वेच्छेने धर्मांतर करण्यास मनाई करत नाही.

**अनुसूचित जातीच्या दर्जाची चौकशी करणाऱ्या आयोगाची मुदत वाढवली**

राष्ट्रपतींच्या आदेशानुसार अनुसूचित जातीच्या श्रेणीत न येणाऱ्या धर्मात धर्मांतर करणाऱ्या परंतु अनुसूचित जातीच्या श्रेणीत न येणाऱ्या व्यक्तींना अनुसूचित जातीचा दर्जा द्यावा की नाही, याची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या चौकशी आयोगाचा कार्यकाळ केंद्राने सहा महिन्यांनी वाढवला आहे. नुकत्याच जारी केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या या मुदतवाढीमुळे आयोगाला १० एप्रिल २०२६ पर्यंत आपले काम सुरू ठेवता येईल. हिंदू, शीख आणि बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीमध्ये अनुसूचित जातीच्या ओळखीच्या दाव्यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने ६ ऑक्टोबर २०२२ रोजी चौकशी आयोग कायदा, १९५२ अंतर्गत आयोगाची स्थापना करण्यात आली.

कमिशनला सुरुवातीला १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत आपला अहवाल सादर करायचा होता, परंतु अधिक वेळ मागितल्यानंतर कार्यकाळ १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत करण्यात आला. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशात जाणार नाही भारताचा कांदा

**ढाका, ७ नोव्हेंबर**

भारताने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. यापुढे बांगलादेशात कांदा जाणार नाही. परिणामी कांद्याचे भाव आकाशाला भिडले आहेत. अवघ्या काही दिवसांत दर दुप्पट झाले आहेत. सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरातील अर्थसंकल्पाचे गणित पूर्णपणे बिघडले आहे.

राजधानी ढाका, चितगाव, राजशाही आणि खुलना यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये कांद्याचे दर ११० ते १२० टका प्रति किलोपर्यंत पोहोचले आहेत. काही दिवसांपूर्वी हेच दर ६० टका प्रति किलो होते. घाऊक बाजारातही कांद्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने ग्राहकांकडून अधिक किंमत आकारावी लागत आहे, असे किरकोळ विक्रेत्यांचे म्हणणे आहे. देशातील स्थानिक कांदा साठा संपत आला आहे आणि भारताकडून होणारी आयात अचानक थांबल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. भारत सरकारने देशांतर्गत दर नियंत्रित ठेवण्यासाठी कांद्याच्या निर्यातीवर बंदी केली; मात्र त्याचा थेट परिणाम बांगलादेशातील बाजारपेठांवर झाला. भारतातून पुरवठा पुन्हा सुरू होईपर्यंत किंवा देशांतर्गत नवीन पीक बाजारात येईपर्यंत दर अजून वाढू शकतात. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रातील शेतकरी गुंतवणूक करण्यास घाबरत नाहीत : डॉ. तंवर

**नामदेव भदे**

**जोधपूर, ७ नोव्हेंबर**

ऐतिहासिकदृष्ट्या राजस्थान आणि महाराष्ट्र यांच्यात साम्य असून यांचा एकमेकांशी दृढ संबंध आहे. सध्या महाराष्ट्रात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या यावर चिंता व्यक्त करताना राजस्थानमध्ये हे दृश्य दिसत नसल्याचे आयसीएआर-सेंट्रल ॲरिड झोन रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक तसेच विद्यापीठाचे मुख्य वैज्ञानिक डॉक्टर सुरेशपाल सिंग तंवर यांनी सांगितले.

ते म्हणाले, राजस्थानच्या कोरड्या जमिनीत फक्त २०० मिमी ते ६०० मिमी पाऊस पडतो; परंतु या प्रदेशातील लोकांना पाण्याचे मोल समजते आणि म्हणूनच त्यांनी विविध रेनवॉटर हार्वेस्टिंग तंत्रे विकसित केली आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यात परिस्थिती वेगळी आहे, जिथे पुरेसा पाऊस पडतो; परंतु तरीही या प्रदेशातून पिके न मिळाल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची प्रकरणे नोंदवली जातात.



**पीक उत्पादनात विविधता**

राजस्थानला पावसाच्या पाण्याचे संचयन करण्याच्या अनेक पद्धती शिकवल्याचे श्रेय महाराष्ट्राला देतात. ते म्हणाले की, पावसाच्या पाण्याचे संचयन महाराष्ट्रात सुरू झाले; परंतु नंतर राजस्थानने त्याचे अनुकरण केले. पिकांच्या अपयशामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा धोका कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक उत्पादनात विविधता आणणे त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे, राजस्थानमध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत खूपच कमी पाऊस, आव्हानात्मक वातावरण असले तरी, शेतीच्या कारणांमुळे या प्रदेशातील एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केलेली नाही, असे डॉ. एस. पी. एस. तन्वर यांनी पीआयबीच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून सुविधेला भेट देणाऱ्या पत्रकारांना यावेळी सांगितले.

महाराष्ट्रातील शेतकरी जोखीम पत्करतात आणि शेतीत मोठी गुंतवणूक करतात आणि भरपूर उत्पादन मिळवण्याचा अंदाज लावतात, तर राजस्थानातील शेतकरी त्यांच्या मर्यादेत काम करतात. हे शेतकरी जोखीम पत्करत नाहीत, असे ते म्हणाले.

# वैमानिकाची कोणतीही चूक नाही

## सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र, डीजीसीएला नोटीस

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

एअर इंडिया बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनरचे पायलट-इन-कमांड दिवंगत कॅप्टन सुमित सभरवाल यांच्या वडिलांना शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, देशातील कोणीही ही पायलटची चूक मानत नाही. ९१ वर्षीय वडील पुष्कर सभरवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्ज्वल भुयान यांच्या न्यायासनाने ही टिप्पणी केली. सभरवाल यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली या अपघाताची स्वतंत्र आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य चौकशी करण्याची मागणी केली आहे. अहमदाबादमधील अपघातात २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्ससह २६० लोकांचा मृत्यू झाला.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, नागरी उड्डयन महासंचालनालय (डीजीसीए), विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) आणि विमान अपघात चौकशी ब्युरो (एएआयबी) आणि विमान अपघाताच्या चौकशीसंदर्भात इतर संबंधित पक्षांना नोटीस बजावल्या. दिवंगत कॅप्टन सुमित सभरवाल यांचे वडील पुष्कराज सभरवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केल्यानंतर ही नोटीस बजावण्यात आली.

सुनावणीदरम्यान, खंडपीठाने पुष्कराज सभरवाल यांना सांगितले की हा अपघात अत्यंत दुःखद होता, परंतु त्यांनी त्यांच्या मुलाला दोषी ठरवल्याचा भार सहन करू नये... कोणीही कोणत्याही गोष्टीसाठी पायलटला दोष देऊ शकत नाही. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी जोर देऊन सांगितले की, भारतातील कोणीही ही पायलटची चूक असल्याचे मानत नाही.

प्राथमिक चौकशी अहवालात पायलटविरुद्ध कोणतेही आरोप नाहीत. न्यायालयाने याचिकेवर सविस्तर चर्चेसाठी तारीख निश्चित केली आहे आणि सर्व पक्षांकडून उत्तरे मागितली आहेत. (वृत्तसंस्था)


## चित्रपट वार्ता

### अशोक-निवेदिता सराफ पहिल्यांदाच टीव्हीवर एकत्र



**मुंबई** : मनोरंजन जगतातील सर्वांची लाडकी जोडी अशोक सराफ आणि निवेदिता यांनी अनेक चित्रपटांमध्ये सोबत काम केले आहे. मात्र, त्यांनी कधीही मालिकांमध्ये एकत्र काम केले नाही. आता ही जोडी टीव्हीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच मालिकेत एकत्र दिसणार आहे. अशोक सराफ यांच्या सध्या सुरू असलेल्या ‘अशोक मा.मा.’ या मालिकेत निवेदिताचा प्रवेश होणार आहे. यात निवेदिता सराफ यांची भूमिका एका उत्साही, आत्मनिर्भर आणि अविवाहित स्त्री म्हणून आहे, जी स्वतःचा संस्कार वर्ग चालवते. हा वर्ग पारंपरिक चौकटीतील नाही. जेव्हा अशोक मामा आपली नातवंड घेऊन या वर्गात येतात तेव्हा त्यांना एका वेगळ्याच शिक्षिकेची अपेक्षा असते. पण, समोर येते एक वेगळीच, आधुनिक विचारांची स्त्री. दोघांना एकत्र पाहणे ही प्रेक्षकांसाठी मेजवानीच ठरणार आहे.

### कॅटरिना-विकीला पुत्ररत्नाची प्राप्ती



**मुंबई** : अभिनेत्री कॅटरिना कैफ आणि अभिनेता विकी कौशल या दाम्पत्याच्या जीवनात चिमुकल्या बाळाचे आगमन झाले आहे. कॅटरिनाला मुलगा झाला असून विकीने समाज माध्यमाद्वारे ही बातमी जगजाहीर केली आहे. या जोडप्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विकीने लिहिले की, आमच्या आयुष्यात आनंदाचं आगमन झालं आहे. सगळ्यांचे अपार प्रेम आणि कृतज्ञतेने आम्ही सर्वजण आमच्या मुलाचे आनंदाने स्वागत करतोय्.

### ब्रॅड पिटने अँजेलिनावर दाखल केला २९० कोटींचा खटला



**कॅलिफोर्निया** : हॉलिवूडमधील गाजलेले जोडपे ब्रॅड पिट आणि अँजेलिना जोली यांच्यातील वाद काही थांबण्याचे नाव घेत नाहीय. हे जोडपे बरेच आधी विभक्त झाले आहे. पण, त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होताना दिसतोय. आता एका कंपनीतील भागीदारीवरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला असून तो थेट कोर्टापर्यंत पोहोचला आहे. एका दारू कंपनीचे दोघे एकेकाळी मालक होते. मात्र, अँजेलिनाने या कंपनीतील आपले शेअर्स विकून टाकले आहेत. तिच्या या निर्णयाला ब्रॅड पिटने न्यायालयात आव्हान दिले असून तिच्यावर २९० कोटींचा खटला दाखल केला आहे. अँजेलिनाच्या वकिलांनी यासंदर्भातील आरोपांना फेटाळून लावत अशा पद्धतीने गोपनीय व्यवहार उघड करणे अयोग्य असल्याचे म्हटले आहे.



# नार्को-दहशतवाद प्रकरणी ईडीची छापेमारी

## माजी मंत्री बाबू सिंगांच्या घराची घेतली झडती

**जम्मू, ७ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालयाने गुरुवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये एकाच वेळी छापे टाकले. यावेळी माजी मंत्री बाबू सिंग यांच्या घरावरही छापा टाकण्यात आला. त्याच्या घरावर ड्रग्जशी संबंधित आणि मनी लॉण्ड्रिंग चौकशी भाग म्हणून घरावर छापा टाकण्यात आला, असे सूत्रांनी सांगितले.

श्रीनगरमधील सहा आणि जम्मूमधील दोन परिसर मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींखाली निरीक्षणात आहेत. हे प्रकरण मार्च २०२२ मध्ये यूटी पोलिसांनी पहिल्यांदा उघडकीस आणलेल्या अमली पदार्थांशी आणि मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाशी संबंधित आहे. मोहम्मद शरीफ शहा नावाच्या एकाला काश्मीरहून जम्मूमध्ये ६.९ लाख रुपये हे हवाला पैसे जितेंद्र सिंग उर्फ बाबू सिंग उर्फ जतिंदर सिंग यांना पोहोचविण्याचा प्रयत्न करताना अटक करण्यात आली होती. हे पैसे जम्मूमधील फुटीरतावादी आणि फुटीरतावादी गटांना विध्वंसक कारवाया करण्यासाठी निधी देण्यासाठी होते.

एजन्सींना सैफ दीन, फारूख अहमद नायकू, मुबाशिर मुश्ताक फाफू यांचा कथित संबंध आढळला. येथे पाकिस्तानमधील कार्यकर्ते विध्वंसक कारवायांसाठी निधी देण्यासाठी नार्को-दहशतवाद मॉड्यूल चालवत होते, असे सूत्रांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# शास्त्रज्ञांना सापडला ६० लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा तुकडा

## ● पृथ्वीच्या प्राचीन हवामानाची मिळणार माहिती ● हवेचे बुडबुडे २७ लाख वर्षांपेक्षाही जुने

**न्यू यॉर्क, ७ नोव्हेंबर**

शास्त्रज्ञांना अंटार्क्टिक खंडातून ६० लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा तुकडा सापडला आहे. त्यांनी तो बाहेर काढून त्यावर संशोधन सुरू केले आहे. हा बर्फ कालमापन केलेला आतापर्यंतचा सर्वात जुना बर्फ आहे.

या ६० लाख वर्षांपूर्वीच्या सापडलेल्या बर्फामुळे संशोधनातून शास्त्रज्ञांना पृथ्वीच्या प्राचीन हवामानाची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. पीएनएएस या नियतकालिकेमध्ये २८ ऑक्टोबरला प्रकाशित झालेल्या अभ्यासक्रमानुसार हा बर्फ आणि त्यात अडकलेले हवेचे बुडबुडे हे सुमारे २७ लाख वर्षे जुन्या असलेल्या ज्ञात बर्फाच्या नमुन्यांपेक्षा दुप्पट वयाचे आहेत. आईस कोर म्हणजे बर्फाचा गाभा हे शास्त्रज्ञांना



आपला ग्रह भूतकाळात कसा होता, याबद्दल संशोधन करण्याची संधी देते, असे या अभ्यासाच्या प्रमुख लेखिका आणि मॅसॅच्युसेट्मधील वुड्स होल ओशनोग्राफिक इन्स्टिट्यूशनमधील सहायक शास्त्रज्ञ सारा शॅकलटन यांनी सांगितले.

ॲलन हिल्समधील गाभा हा फार पूर्वीच्या काळाबद्दल माहिती देतो. येथील बर्फ आणि हवा मायोसिन युगातील म्हणजेच ५३ ते २३० लाख वर्षांपूर्वीचे आहेत. त्यावेळी पृथ्वी प्रचंड उष्ण होती. समुद्राची पातळी उंच होती आणि ग्रहावर आता विलुप्त झालेले प्राणी होती. यात प्रामुख्याने सॅबर टूथ्ड मांजरी, ओकापीसारखे जिराफ, आर्क्टिक गेंडे आणि मॅमथ यांचा समावेश होता. शॅकलटन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०१९ ते २०२३ दरम्यान पूर्व अंटार्क्टिकाच्या दुर्गम ॲलन हिल्स ब्लू आइस एरियामध्ये हा विक्रम मोडणारा बर्फ सापडला आहे. (वृत्तसंस्था)

**संशोधनासाठी केले ६६० फूट ड्रिलिंग**

अभ्यासानुसार, ॲलन हिल्स बर्फाचे मैदान समुद्रसपाटीपासून सुमारे ६,५०० फूट उंचीवर आहे. नमुने मिळीण्यासाठी संशोधकांनी बर्फाच्या थरामध्ये ३३० ते ६६० फूट खाली ड्रिलिंग केले. त्यानंतर त्यांनी हवेच्या कणांमध्ये असलेल्या अर्गोन समस्थानिकांच्या किरणोत्सर्गी ऱ्हासाचे मापन करून उत्खनन केलेल्या बर्फाच्या गाभ्यांचे कालमापन केले. या गाभ्यांमधील ऑक्सिजन आयसोटोप्सचा मागोवा घेऊन मागील ६० लाख वर्षांमध्ये ॲलन हिल्स प्रदेश सतत थंड असल्याचे निश्चित केले आहे.

## अग्रलेख...

# मित्रांनी सांभाळूनच वागावे...

काँग्रेसच्या केंद्रीय सत्तेच्या काळात देशात भ्रष्टाचाराच्या राक्षसाने थैमान घातले होते. त्या काळात भ्रष्टाचार झाला नाही, असे एकही क्षेत्र नव्हते. काँग्रेसच्या तत्कालीन सरकारमधील बहुतांश मंत्री भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत अडकले होते. बरे, हा भ्रष्टाचारही साधासुधा नव्हता, तर शेकडो आणि हजारो कोटी रुपयांचा होता. संपुआ शासन काळात सरकारमधील मंत्री आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली होती. देशातील सर्वसामान्य जनतेला सरकारने विकासाचे एखादे काम कमी केले तर त्याचे काही वाटत नाही, पण भ्रष्टाचाराची लोकांना जबरदस्त चीड असते. त्यामुळे काँग्रेस सरकारमधील भ्रष्टाचाराच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी आवाज उठवला होता. या भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष सुरू केला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा जो पराभव झाला, त्यामागे सरकारमधील लोकांचा भ्रष्टाचार हे एक प्रमुख कारण होते.

दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झाला नसला तरी त्यांनी आपल्या सरकारमधील भ्रष्ट मंत्र्यांना भ्रष्टाचार करण्यापासून रोखले नाही आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली नाही, असा आरोप त्यांच्यावर झाला होता. या पृष्ठभूमीवर मोदी सरकार सत्तेवर येऊन ११ वर्षे पूर्ण झाली असतानाही, मोदी सरकारमधील एकाही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही, ही मोदी सरकारची फार मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. नाही म्हणायला एखाद-दुसऱ्याबद्दल काही लोकांनी हेत्वारोप केले, पण ते विषय लगेच निकाली निघाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ''ना खाऊंगा ना खाने दूंगा'' ही भूमिका यासाठी कारणीभूत ठरली. मोदी यांची स्वच्छ प्रतिमा ही त्यांची जमेची बाजू म्हटली पाहिजे. त्यांच्यावर देशातील कोट्यवधी लोकांचा विश्वास आहे. त्यांच्या कारकीर्दीच्या पृष्ठभूमीवर मागे वळून पाहिले तर असे दिसते की, काँग्रेस सरकारच्या काळात काँग्रेस नेत्यांचा भूखंड घोटाळा हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत होता. केंद्रात व राज्यांमध्येही भूखंडाचे श्रीखंड खात काँग्रेस नेत्यांनी आपल्या तोंडाला काळे फासून घेतले होते. त्यांची बदनामी झाली होती. तरीही काँग्रेस नेत्यांचे डोळे उघडत नव्हते. त्याचे जे काय परिणाम भोगायचे, ते काँग्रेसला आता भोगावे लागत आहेत. त्याला काँग्रेस स्वतः जबाबदार आहे.

केंद्रात असो वा राज्यात, आघाडीचे सरकार चालवताना तर जास्त खबरदारी घ्यावी लागते. भाजपाने केंद्रात व राज्यांमध्येही हा प्रयोग यशस्वीरीत्या राबविला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळू शकले नाही. तेलगू देसम आणि जनता दल संयुक्तच्या पाठिंब्यावर मोदी यांना सरकार स्थापन करावे लागले. भाजपाच्या मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत आणि या सरकारला पाठिंबा देणाऱ्या भाजपाच्या मित्रपक्षांच्या मंत्र्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत. केंद्रीय सरकारच्या या स्वच्छ प्रतिमेबाबत हेत्वारोप करता येतील, असा मुद्दा मध्यंतरी विरोधकांना मिळाला होता. पहिल्या घटनेत पुण्यातील जैन छात्रावास जमीन प्रकरणामुळे केंद्रीय नागरी उड्डयन आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ अडचणीत येण्यासारखी स्थिती निर्माण झाली होती. पुण्यातील हिराचंद नेमचंद दोशी स्मृती ट्रस्टची ३ एकर जमीन गोखले बिल्डरला देण्यासंबधीचे हे प्रकरण होते. मोहोळ हे गोखले बिल्डरचे भागीदार होते, असा आरोप होता. मुळात जैन ट्रस्टने आपली जमीन विकसित करण्यासाठी एखाद्या बिल्डरला देण्यात काही गैर नव्हते. असे हजारो व्यवहार देशात दररोज होत असतात. पण, मोदी सरकारमध्ये राज्यमंत्री असलेले मुरलीधर मोहोळ यांची या कंपनीत भागीदारी असल्याचा आरोप झाला. त्यामुळे हा भूखंड व्यवहार चर्चेचा विषय झाला. भूखंडाचे श्रीखंड न खाताच मोहोळ यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे क़रण्याचा प्रयत्न झाला. या जमिनीचा सौदा रद्द करण्यात आल्यामुळे या प्रकरणावरून उठलेले वादळ शांत झाले. वास्तवात मोहोळ यांनी गोखले बिल्डरमधील आपली भागीदारी वर्षभर आधीच सोडली होती. पण त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. याचा अर्थ असा की, सार्वजनिक जीवनात आपण स्वच्छ आणि प्रामाणिक असलो तरी आपले वर्तन देखील जनतेला संशयातीत विश्वास देणारे असावे लागते. तुमच्यावर संशय घेता येईल, अशी सूईच्या टोकाएवढी जागा जरी विरोधकांना मिळाली तरी ते संधी घेतात. ते राईचा पहाड करण्यासाठी टपूनच बसले असतात. मुरलीधर मोहोळ यांचे प्रकरण थोडक्यात निभावले. परंतु, त्याचे कवित्व संपत नाही तोच पुण्यातील दुसरा कथित भूखंड घोटाळा समोर आला आहे. हा कथित घोटाळा महायुती सरकारमधील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित आहे. दादांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी पुण्यातील ३०० एकर जमीन अत्यल्प दरात आपल्या ट्रस्टच्या नावाने करताना अपेक्षित कर भरला नाही, असा आरोप आहे. त्या आरोपाचे तपशीलही चर्चेत आलेले आहेतच. हा आरोप तसा गंभीरच म्हटला पाहिजे. त्यातही हे प्रकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित असल्यामुळे त्याची व्याप्ती आणि गांभीर्य आणखी वाढले.

अजितदादा पवार यांची प्रतिमा तशी आधीपासूनच वादग्रस्त आहे हे खरेच. महायुतीत सहभागी होण्याआधी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले होतेच. आता ते महायुतीचे घटक आहेत. अजित पवार हे शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात असताना किंवा त्यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला असताना त्यांच्यावर एखादा आरोप होणे आणि ते आता महायुती सरकारचे जबाबदार घटक असताना त्यांच्यावर आरोप होणे यात फारच मोठा फरक आहे. आपण महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहोत आणि आपल्यावर होणाऱ्या आरोपामुळे केंद्रीय सरकार तसेच राज्यातील फडणवीस सरकारच्या प्रतिमेवर परिणाम होतो, याची जाणीव त्यांनी ठेवणे भाग आहे. या प्रकरणाची मला माहिती नव्हती वा कोणताही चुकीचा व्यवहार मला मान्य नाही, असे त्यांनी म्हणणे ही पश्चातबुद्धी म्हटली पाहिजे. मुलांनी मोठे झाल्यावर व्यवसाय करणे यात काहीही गैर नाही, हे त्यांचे म्हणणे खरे आहे. परंतु, एवढ्या मोठ्या नेत्याच्या चिरंजीवांनी कोणताही व्यवहार करताना राजकारणातील आपल्या वडिलांचे स्थान, त्यांची आणि त्यांच्या मित्रपक्षाची प्रतिमा याची काळजी घेणे अपेक्षित आहे. दुसरा मुद्दा म्हणजे आपला मुलगा काय करतो, कोणता व्यवसाय करतो, यावर वडिलांचे लक्ष असले पाहिजे. मी असे सांगितले होते, तसे सांगितले होते, ही वक्तव्ये पुरेशी नाहीत.

हे प्रकरण गंभीर नसते तर राज्य सरकारने याच्या सखोल चौकशीचे आदेश दिले नसते, सह दुय्यम निबंधकांना निलंबित केले नसते. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या असताना असा आरोप उपमुख्यमंत्र्यांवर होणे कोणत्याही सरकारसाठी अडचणीचे आहे. आपण कोणतेही गैर काम केले नाही, भूखंड घोटाळ्यात आपला सहभाग नाही, असे अजितदादांनी वारंवार म्हणणे पुरेसे नाही तर त्यांच्या व कुटुंबीयांच्या कृतीतून तसे दिसणे आणि जनतेची खात्री होणे आवश्यक आहे. महायुती आकाराला येण्याच्या पूर्वीचा काळ वेगळा होता. त्या काळी काँग्रेस-राष्ट्रवादी आणि घोटाळे यांच्यात अनन्यभाव कायम होता. आता अजितदादा स्वतंत्र पक्षाचे नेते आहेत आणि महायुतीचे प्रमुख घटक आहेत. त्यामुळे त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी स्वत:बरोबर महायुतीतील इतर घटकांच्या इभ्रतीचीही काळजी वाहिली पाहिजे. मित्रामुळे मित्र अडचणीत आल्याची उदाहरणे इतिहासात आहेत. मित्रांनी एकमेकांना सांभाळले पाहिजे आणि त्याच वेळी आपल्यामुळे दुसरा मित्र अडचणीत येणार नाही, यासाठी नेहमी सांभाळूनच वागले पाहिजे. भाजपाची राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छ आणि कार्यक्षम अशी प्रतिमा लक्षात घेता महायुती सरकारमधील प्रत्येक घटकाची जबाबदारी वाढली आहे, हे त्यांच्या लक्षात आले पाहिजे आणि तसे नसेल तर ते त्यांच्या लक्षात आणून देणे आता गरजेचे झाले आहे.


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# व्होटचोरीला बिनशर्त पाठिंबा?

सत्याचा मोर्चा हा विषय सध्या महाराष्ट्रात ट्रेंड करतोय. गेल्या आठवड्यात मुंबईत काढलेल्या या मोर्चात महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र आले. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अनेक वर्षांनंतर एकत्र दिसले. कै. बाळासाहेब ठाकरे असताना कधी पवार-ठाकरे आघाडी होऊ शकली नाही. मात्र बाळासाहेबांच्या निधनानंतर आधी उद्धव ठाकरे आणि आता राज ठाकरे हे आघाडीत सामील होऊ पाहत आहेत. या सर्वांसमोर समान शत्रू जर कोण असेल तर तो म्हणजे भाजपा! काँग्रेस एकटी भाजपाला हरवू शकत नाही हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. राहुल गांधी सोडून काँग्रेसकडे दुसरा चेहरा नाही कारण नेहरूंच्या वंशजाव्यतिरिक्त इतर कुणीही काँग्रेसवर सध्या तरी हक्क सांगू शकत नाही. काँग्रेसने इतर पक्षांना, इको-सिस्टिमला बाजूला सारून भाजपशी दोन हात करण्याचा प्रयत्न केला. राहुल गांधींना युवा नेता, जनेऊधारी ब्राह्मण इत्यादी विविध प्रकारे प्रोजेक्ट करण्याचा प्रयत्न झाला. पण फारसे यश आले नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र काँग्रेसला मित्रपक्ष व राजकीय नसलेल्या संघटना व इको-सिस्टिमच्या मदतीने डोकं वर काढता आलं. यानंतर काँग्रेसला पुन्हा असं वाटू लागलं की राहुल गांधींच्या नेतृत्वात हा चमत्कार घडतोय. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत युतीने आघाडीला पुन्हा धूळ चारली. त्यामुळे आता वेगवेगळी इको-सिस्टिम भाजपाला सत्तेतून दूर करण्यासाठी सज्ज झाली आहे. मिशनरी, जिहादी, डावी ताकदही आपापल्या परीने जोर लावत आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकेच्या निवडणुकीत विरोधकांना आपली ताकद पुन्हा दाखवायची संधी मिळाली आहे. या पृष्ठभूमीवर हा सत्याचा मोर्चा निघाला आहे. या मोर्चात मतदारयादीत दुबार येणारी नावे, मृत व्यक्तींची नावे अजूनही दाखवणे आणि ईव्हीएमच्या सुरक्षिततेवर शंका हे मुद्दे विरोधकांनी उपस्थित केले. या मोर्चात अनेकांची भाषणे झालीत. मात्र आज आपण राज ठाकरेंचा विचार करणार आहोत.

राज ठाकरे यांनी १० वर्षांपूर्वी गुजरातचा दौरा केला आणि नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात गुजरात किती पुढारला आहे हे त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेला समजावून सांगितलं. त्यांनी मोदींच्या विकासकामांचं उघड कौतुक केलं. या दरम्यान मनसे



हा एकटा निवडणूक लढत होता. मनसेचे कार्यकर्ते सांगायचे की आम्ही हरलो तरी एकटे लढतो. ते एकटे लढायचे कारण इतर कोणत्याही मोठ्या पक्षाला त्यांची गरज वाटली नाही. भाजपसोबत शिवसेना होती. तेव्हा उद्धव ठाकरे हे पक्ष प्रमुख होते. ठाकरे बंधूंचे संबंध चांगले नव्हते. म्हणून मनसेला युतीत घेण्याचा प्रश्नच नव्हता. दुसरीकडे आघाडीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन मोठे पक्ष होते. मनसे तेव्हा मराठी मुद्यावरून राजकारण करत होती. आघाडीने स्वत:ला नेहमीच पुरोगामी म्हटलं म्हणून मनसेला आघाडीत घेऊन अमराठी लोकांची मते घालवण्याचा खेळ आघाडीने केला नाही. त्यामुळे मनसेने कधीच कुणाशी युती केली नाही असं वरवर वाटत असलं तरी त्यांच्यासाठी युती व आघाडीत जागाच नव्हती. त्यानंतर त्यांनी मोदींवर टीका करायला सुरुवात केली. २०१९ च्या आधीच त्यांनी मोदी सरकारवर टीका सुरू केली. 'लाव रे तो व्हिडीओ' हे राज यांचं वाक्य खूप गाजलं. ही राज ठाकरेंची परीक्षा होती. जर त्यांच्या भाषणांमुळे लोकसभा निवडणुकीत परिणाम दिसला असता तर त्यांना कदाचित विधानसभेत आघाडीत स्थान मिळवून देण्याचा पवारांनी प्रयत्न केला असता. मात्र २०१९ ला भाजप प्रचंड बहुमताने जिंकला. त्यामुळे विधानसभेत पुन्हा मनसेसाठी आघाडीत जागा राहिली नाही. त्यात विधानसभेच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंनी भाजपला अलविदा करत आघाडीत प्रवेश केला. म्हणून आघाडीचे दरवाजे राज ठाकरे यांच्यासाठी बंद झाले. पुढे एकनाथ शिंदेंनी आपली वेगळी चूल मांडली, इतकंच नव्हे तर त्यांनी पक्षच ताब्यात घेतला आणि ते आघाडीतून युतीत दाखल झाले. मराठीच्या मुद्यावर मते मिळत नाही हे ओळखून राज ठाकरेंनी हिंदुत्व हाती घेतलं आणि सावरकरांचा फोटो आपल्या सभेत लावला. मशिदीवरील भोंग्यावरून त्यांनी रान पेटवलं. आपणच खरे हिंदुत्ववादी आहोत हे दाखवण्याचा त्यांनी व्यवस्थित प्रयत्न केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला आणि आता ते व्होटचोरीच्या मुद्यावरून आंदोलन करत आहेत. एखाद्या नाट्यमय चित्रपटात जितके उतार चढाव नसतात तितके उतार चढाव राज ठाकरे यांच्या राजकीय कारकीर्दीत आहेत. राज ठाकरे कधी आपली भूमिका बदलतील याचा अंदाज त्यांना स्वत:लाही नसावा. मात्र त्यांचाही नाईलाज आहे. पक्ष स्थापन केल्यापासून सुरुवातीचा काही काळ सोडला तर त्यांच्या वाटेला अपयशच आलेलं आहे, निराशाच आलेली आहे. त्यामुळे त्यांना भूमिका बदलाव्या लागतात. मात्र वारंवार भूमिका बदलत राहिले तर विश्वासार्हता कमी होते. किंबहुना (उद्धव ठाकरेंच्या शैलीत) निघून जाते. राज ठाकरे यांचा आवाज मोठा आहे म्हणून महाराष्ट्रात व्होटचोरीचं आंदोलन लीड करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली असावी. राज ठाकरे म्हणतात की, २०१७ पासून ते व्होटचोरीबद्दल आवाज उठवत आहेत. ठाकरेंचे हे वाक्य जनतेने विशेषत: मराठी माणसाने गांभीर्याने घेतले पाहिजे.

२०१७ च्या आधी २०१४ ची निवडणूक आली त्यात २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे हे भाजपासोबत होते. २०१९ च्या विधानसभा निवडाणुकीतही उद्धव ठाकरे भाजपासोबत होते. मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकेची निवडणूकही झाली. राज ठाकरे यांचे व्होटचोरीचे आरोप खरे मानले तर उद्धव ठाकरे हे व्होटचोरीचे भागीदार होते असे म्हणायचे का? दुसरी गोष्ट राज ठाकरे यांना २०१७ सालीच व्होटचोरीचा साक्षात्कार झाला होता तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी त्यांनी मोदींची भेट का घेतली? आणि या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोदींची स्तुती का केली? मोदींना बिनशर्त पाठिंबा का दिला? राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार हा बिनशर्त पाठिंबा म्हणजे व्होटचोरीला दिलेला बिनशर्त पाठिंबा नव्हे काय? मग जर राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार त्यांनी व्होटचोरीला पाठिंबा दिला असेल आणि राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार उद्धव ठाकरे हे देखील व्होटचोरीचे भागीदार असतील, तर तर्कसुसंगतपणे म्हणायचे झाले तर हा मराठी माणसाचा विश्वासघात नव्हे काय?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# दोन विश्वचषकांच्या सकारात्मक बाजू

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर २ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय महिला क्रिकेट संघाने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिका संघाला हरवले आणि महिला विश्वचषक सुरू झाल्यापासून ५२ वर्षांत प्रथमच जगज्जेता होण्याचा मान मिळवला. त्या रात्री सर्व भारत जागा होता. रात्री बरोबर १२ वाजताच्या सुमारास आफ्रिकेच्या नडीन डी क्लर्कचा कठीण झेल भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने झेलला आणि भारताच्या हाती विश्वचषक असल्याचा विश्वास निर्माण झाला. तो झेल बघून १९८३ च्या पुरुषांच्या विश्वचषक स्पर्धेतील वेस्ट इंडीज विरुद्ध भारत यांच्यातील सामन्याची आठवण झाली. त्या सामन्यात कर्णधार कपिल देवने तडाखेबंद फलंदाज व्हिव्हियन रिचर्ड्सचा कठीण झेल सुमारे २० पावलं मागे धावून अलगद पकडला आणि त्यावेळीही भारताने विश्वचषक जिंकल्याचा विश्वास निर्माण झाला. त्यावेळी ६० षटकांचे एकदिवसीय सामने व्हायचे. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५४.४ षटकांत सर्व बाद १८३ धावा केल्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडीजचा संघ ५२ षटकांत १४० धावा काढू शकला. बलाढ्य वेस्ट इंडीज संघ ४३ धावांनी पराभूत झाला. त्यापूर्वी तो दोन वेळा विश्वविजेता होता. त्यांचे तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भारताने भंग केले. त्यावेळी भारतीय संघाचे प्रशिक्षक होते पीआर मान सिंग. १९८३ च्या विश्वचषकावर नजर टाकली तर बहुतेक पंजाबी किंवा उत्तर भारतीय खेळाडूंचा दबदबा होता. त्यातही सुनील गावस्कर, संदीप पाटील आणि मुंबईत राहणारे बलविंदरसिंग संधू आपल्या शैलीदार खेळामुळे संघात स्थान टिकवून होते. १९८३ च्या विश्वचषकाचा पुरस्कार वितरण सोहळा मैदानाबाहेर झाला, तर २०२५ च्या विश्वचषकाचा पुरस्कार वितरण सोहळा मैदानात हजारो लोकांच्या साक्षीने झाला. त्यावेळी भारताने सामना जिंकताच लोक मैदानाकडे पळत सुटले होते. भारतीय महिलांनी सामना जिंकताच मैदानाबाहेरील इतर खेळाडूंनी मैदानाकडे धूम ठोकली आणि आपल्या विश्वविजेत्या खेळाडूंना डोक्यावर घेतले.

भारतीय महिलांनी दुसऱ्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाला जबरदस्त मात देत हरविले आणि त्यांचे आठव्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न धुळीस मिळवले. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करीत ५० षटकांत ३३८ अशी मोठी धावसंख्या उभारली. धावांचा पाठलाग करताना भारतीय महिलांनी ४८.३ षटकांत म्हणजे ९ चेंडू आणि ५ गडी राखून ऑस्ट्रेलियाला विश्वचषकातून बाहेर घालविले. त्यानंतर २ नोव्हेंबरला द. आफ्रिका विरुद्धच्या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करीत २९८ धावा काढल्या आणि धावांचा पाठलाग करणाऱ्या द. आफ्रिका संघाला २४६ धावांवर रोखले आणि विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. पुरुषांचा एकदिवसीय विश्वचषक १९७५ साली सुरू झाला, पण त्याआधी १९७३ मध्येच महिला विश्वचषकाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. म्हणजे येथेही महिलांनीच बाजी मारली. भारतीय महिला संघाने विश्वचषक जिंकला आणि त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पण या जगज्जेत्या महिलांच्या यशामागे एका मराठी माणसाचे कष्ट आहेत आणि त्याची चर्चा सर्वदूर सुरू आहे. महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार हे मूळ मुंबईचे आहेत. सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, राहुल द्रविड, सौरभ गांगुली यांचे समकालीन असलेले अमोल मुजुमदार यांना गुणवत्ता असून, कधीही राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळाली नाही. प्रथम श्रेणी सामन्यात त्यांची चमकदार कामगिरी पाहता भारतीय क्रिकेट चाहते एका प्रतिभावान खेळाडूचा खेळ पाहण्यास मुकले असे म्हणावे लागेल. १७१ प्रथम श्रेणी सामन्यात त्यांनी ११,१६७ धावा काढल्या. त्यात ३० शतके आणि ६० अर्धशतकांचा समावेश आहे. सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळीच्या विश्वविक्रमी ६६४ धावांच्या भागीदारीची चर्चा सर्व जण करतात, पण १९ व्या वर्षी रणजी चषक पदार्पणात अमोल मुजुमदार यांनी नाबाद २६० धावांची खेळी करून विश्वविक्रम केला होता. तब्बल दोन दशके हा विक्रम त्यांच्या नावावर होता. इतके असूनही त्यांच्यासाठी राष्ट्रीय संघाचे दार कधी उघडले नाही. हे विषही त्यांनी आपल्या खिलाडूवृत्तीने सहज पचविले. पण महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून अमोल मुजुमदार यांनी स्पर्धेच्या अमृतमंथनात भारताला विश्वचषक मिळवून दिला. इतके यश मिळाल्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांचे त्यांच्या सोसायटीतील रहिवाशांनी स्वागत केले तेव्हा ते अत्यंत शांतपणे म्हणाले, आता मला फक्त घरचा वरण-भात खायचा आहे. यशाच्या शिखरावर असतानाही संयम राखणारी माणसं जगावेगळी असतात.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# कर्करुग्णांसाठी देवदूत!

त्या माणसाचं कर्तृत्वच इतकं मोठं आहे की, युनेस्कोच्या पातळीवर त्या कर्तृत्वाची दखल घेतली गेली, राज्य शासनाच्यावतीने खुद्द मुख्यमंत्र्यांनी त्यांची कामगिरी अधोरेखित केली, कितीतरी पुरस्कार, सत्कार सोहळे, कौतुक आणि बरेच कार्य... हा गौरव एका माणसाचा, त्याच्या कर्तबगारीचा, त्याच्या कार्यकर्तृत्वाचा ठरला... या पुरस्कार, गौरवाने त्यांचे काम थांबले नाही उलट भविष्यातील विकासाच्या वाटा ते धुंडाळीत राहिले... कर्करुग्णांसाठी देवदूत ठरलेल्या एका सेवाव्रतीची ही संघर्ष आणि यशाची गाथा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते आहे. विदेशातील गलेलठ्ठ पगारांची आमिषं झुगारून, कॅन्सर रुग्णांसाठी धडपडणाऱ्या या अवलियाचे नाव आहे डॉ. दिलीप निकम...

संपन्न भविष्याची खात्री देणारे देशातील नामांकित खाजगी रुग्णालयांचे प्रस्ताव, परदेशातील मोठ्या पगाराच्या नोकरीची मोहक आमंत्रणं, यापैकी कशाचाही विचार न करता, एका ध्येयवेड्या डॉक्टरने निवडला संघर्षाचा, सेवेचा आणि सामान्यांच्या ओंजळीत जीवनदान देण्याचा खडतर मार्ग. कर्करोगावरील वैद्यकीय शिक्षण पूर्ण होताच डॉ. दिलीप निकम यांनी हे सर्व आकर्षक प्रस्ताव धुडकावले. निवड केली ती मुंबईतील कामा रुग्णालयाची, अगदी नगण्य मानधनावर सामान्य कॅन्सर रुग्णांवर उपचार करण्याची. आजवर त्यांनी लाखो कर्करोगग्रस्तांना आपल्या उपचारांनी मृत्यूच्या दारातून बाहेर काढले आहे. उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यातील एका छोट्या गावातून सुरू झालेला हा प्रवास, अतिशय खडतर परिस्थितीतून कर्करोगतज्ज्ञ बनण्यापर्यंतचा, खरोखरच थक्क करणारा, हृदयस्पर्शी आणि हजारो लोकांसाठी प्रेरणादायी आहे.

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि.) हे डॉ. दिलीप निकम यांचे मूळ गाव. त्यांचे वडील धाराशिव नगर परिषदेत कारकून होते. पण मोठे कुटुंब आणि मर्यादित उत्पन्नामुळे घरची परिस्थिती अत्यंत साधी होती. वडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण आणि त्यानंतर धाराशिव येथील भारत विद्यालय व शरद पवार हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेत असताना, त्यांच्या आयुष्यात एक घटना घडली - ज्याने त्यांच्या संपूर्ण आयुष्याची दिशा बदलवून टाकली.



एके दिवशी खेळताना त्यांच्या हाताला झालेली किरकोळ जखम त्यांनी घरच्यांपासून लपवली. परंतु, ती जखम चिघळत गेली, संक्रमण वाढले आणि असह्य वेदना सुरू झाल्या. अखेर आईच्या नजरेत ती जखम आली आणि तिने तातडीने गावातील डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी एक इंजेक्शन दिले आणि काही तासांतच वेदनांचा अंत झाला. त्या क्षणी, वेदनामुक्त झालेल्या चिमुकल्या दिलीपच्या मनात एक ठिणगी पेटली... मीही असा डॉक्टर होणार, जो इतरांचे दुःख दूर करेल. त्याच जखमेतून जन्म घेतलेले हे स्वप्न पुढे त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले आणि तेच त्यांना कर्करोग क्षेत्रातील शून्यापासून शिखरापर्यंत घेऊन गेले.

बारावी विज्ञान शाखेत ९२ टक्के गुणांसह उत्तीर्ण होऊन, ध्येयानुसार वैद्यकीय शाखा निवडली. आर्थिक अडचणींमुळे मुंबईत प्रवेश घेणे शक्य झाले नाही, म्हणून त्यांनी मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केले. यादरम्यान भारतात कॅन्सर रुग्णांची संख्या मोठी असूनही आणि हा आजार गंभीर असतानाही, फार कमी डॉक्टर्स या क्षेत्रात येण्यास उत्सुक असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हे आव्हान स्वीकारून त्यांनी पुढील शिक्षण कॅन्सर, विशेषतः तेव्हा भारतात नवीन असलेल्या रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजी या विषयात घेण्याचे ठरवले. मुंबईतील जसलोक रुग्णालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला. पहिल्याच प्रयत्नात रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजीमधील मास्टर डिग्री पूर्ण केली. त्यांचे ज्ञान, अभ्यास आणि प्रचंड कष्ट करण्याची वृत्ती पाहून जसलोकसह अनेक खाजगी रुग्णालये आणि परदेशातील मोठ्या पगाराच्या नोकरीचे प्रस्ताव त्यांच्यासमोर आपसूक आले. अशा नोकऱ्या स्वीकारल्यास गोरगरीब रुग्णांना सेवा देणे शक्य होणार नाही. त्यांनी सर्व प्रस्ताव नाकारले आणि मुंबईतील शासकीय कामा रुग्णालयात अत्यंत कमी पगारावर ते रुजू झाले. विशेष म्हणजे, त्यावेळी कामा रुग्णालयात कर्करोग विभाग अस्तित्वातही नव्हता. डॉ. निकम यांनी अक्षरशः 'शून्यातून' या रुग्णालयातील कर्करोग विभाग उभा केला. त्यांच्या प्रयत्नातून तब्बल ३२ कोटी रुपये किमतीची रेडिओ थेरपीची अत्याधुनिक उपकरणे कामा रुग्णालयात दाखल झाली. आपले ज्ञान, प्रामाणिकपणा आणि स्वच्छ चारित्र्याच्या बळावर त्यांनी कामा रुग्णालयाच्या कर्करोग विभागाला राज्यात एक ओळख मिळवून दिली.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे खाजगी रुग्णालयात ज्या उपचारांसाठी चार ते पाच लाख रुपये खर्च येतो, तेच उपचार कामा रुग्णालयात मोफत मिळू लागले. आज कामा रुग्णालय महिलांच्या केमोथेरपी आणि रेडिएशनसाठी हक्काचे, मोफत आणि उत्तम सेवा देणारे केंद्र म्हणून ओळखले जाते. टाटा रुग्णालय देखील त्यांच्याकडे अनेक रुग्ण उपचारासाठी पाठवते. या प्रवासात त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु त्यांनी रुग्णसेवेचा आपला वसा कधीही सोडला नाही. वेळोवेळी त्यांनी स्वित्झर्लंड, जर्मनी, अमेरिका, हाँगकाँगसारख्या देशांमध्ये जाऊन रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजीमधील आधुनिक उपचारांचे विशेष प्रशिक्षण घेतले. त्यांच्या या ज्ञानाचा लाभ देशातील लाखो रुग्णांना आज होत आहे.

एकाच वेळी उपचार करत असताना रुग्णांना मानसिक बळ देणं, त्यांचे समुपदेशन करणे यासाठी देखील डॉ. निकम यांनी आतापर्यंत खूप मोठी भूमिका बजावली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे कॅन्सर झाल्यानंतर आपले मनोबल गमावलेल्या असंख्य रुग्णांना पुन्हा जगण्याची उमेद निर्माण झाली आणि त्यातून ते ठणठणीत बरे होऊन आज चांगले जीवन जगत आहेत.

कर्करोगावरील उपचार अलिकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य होत असले तरी, त्याचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या पलीकडचा ठरतो आहे. त्यामुळे असले महागडे उपचार घेणे सर्वांना शक्य होत नाही. परिणामी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांसाठी हे उपचार दुरापास्त ठरत आहे. कर्करोग किंवा कुठलाही रोग माणसाची आर्थिक परिस्थिती पाहून होत नसतो. अशावेळी गरिबांच्या मदतीला धावून जाण्यासाठीचे पाऊल उचलण्याचा मानस डॉ. निकम यांनी व्यक्त केला आहे. अशा रुग्णांसाठी येत्या काळात एखादे भव्य इस्पितळ उभे करणे आणि औषधोपचार अल्पदरात उपलब्ध करून देत गरिबांनाही कर्करोगाचा सामना करणे सुकर करणे यासाठीचे पाऊल ते भविष्यात उचलणार आहेत. त्यांचा हा हेतू उदात्त असल्यामुळे त्यांना नक्कीच यश मिळेल यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## आजचे संघगीत-३६

शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५

### नवयुवकांनो संघटनेचे शस्त्र करी घ्या रे

नवयुवकांनो संघटनेचे शस्त्र करी घ्या रे ॥धृ.॥

शिवरायांची स्मरुनी मूर्ती जगांत पसरा भारतकीर्ती
कराच परमेच्छेची पूर्ती गतकालातुन घेउन स्फूर्ती
भविष्य उजळा रे ॥१॥

ओलांडुनिया सागर साती स्वातंत्र्याचे गिळते मोती
मगर धरा ती पकडा हाती त्या मगरीच्या पाडा दाढा
उदर विदारा रे ॥२॥

निशाण स्वातंत्र्याचे चढवा प्राण पणा लावुनिया लढवा
विरोध लाथेखाली तुडवा कलिकाळाला मारुनि ठोकर
मरणचि मारा रे ॥३॥

रंग घेउनी रिपुरक्ताचा टाक आपुल्या घ्या भाल्याचा
इतिहास लिहा भवितव्याचा सामर्थ्याचा पावित्र्याचा
सद्धर्माचा रे ॥४॥

## संशयपिशाच्चाची बाधा

'फटाके आणि हायड्रोजन बॉम्ब' हा ७ नोव्हेंबरचा अग्रलेख वाचला. साठ वर्षे मनसोक्तपणे, बेमुर्वतपणे, बेलगाम एकहाती सत्ता भोगल्यानंतर गांधी-नेहरू परिवार आणि काँग्रेस पक्षाला देशातील जनतेने २०१४ मध्ये अपमानास्पद रीत्या सत्तेतून बाहेर फेकले. त्यानंतरच्या दोन निवडणुकांमध्ये सुद्धा काँग्रेसची जनताजनार्दनाने पुरती वाताहत केली. काही किरकोळ अपवाद वगळले तर विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसचे पुरते पानिपत झाले. स्वतःला देशाचे अनभिषिक्त सुलतान समजणाऱ्या, देशावर राज्य करण्याचा एकाधिकार आपल्याच परिवाराला आहे, देशातील तमाम नागरिक आपले गुलाम आहेत, आपल्यापेक्षा देशात अन्य कोणीही श्रेष्ठ नाही, अशा अनेक गैरसमजांनी गांधी-नेहरू परिवार तसेच काँग्रेसच्या नेत्यांना पछाडलेले आहे. हे संशयपिशाच्च परिवार आणि काँग्रेसच्या मनात एवढे पिसाळले आहे की लोकशाही मार्गाने निवडणुकीत झालेला पराभव स्वीकारण्याचीही त्यांची तयारी नाही. उलट राष्ट्रीय निवडणूक आयोगावर अनर्गल आरोप करून ते संवैधानिक संस्थांचाच अपमान करत आहेत. असे बिनबुडाचे, बिनापुराव्यांचे आरोप केल्यामुळे देशातील जनता परिवाराच्या आणि काँग्रेसच्या मागे उभी राहील हा आणखी एक (गोड) गैरसमज राहुल गांधींनी सोयीस्करपणे करून घेतला आहे. बिहार निवडणुकीत सुद्धा संभाव्य पराभवाची शक्यता दिसत असल्यामुळे आणि त्या पराभवाचे निखारे राहुल गांधींवर उडू नयेत म्हणून काँग्रेस पक्षाने बिहारमध्ये दुय्यम भूमिका स्वीकारली आहे हेसुद्धा उघड आहे. तसेच ईव्हीएम, व्होटचोरी आणि एसआयआरमध्ये सर्वोच्च न्यायालयासह देशातील अनेक न्यायालयांकडून जहाल शब्दांत कानउघाडणी झाल्यामुळे या प्रकरणी न्यायालयात जाण्याचीही त्यांची हिंमत नाही. तेव्हा या संशयपिशाच्चाची बाधा उतरण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

## ईपीएस- ९५ पेन्शनर्सबाबत उदासीनता

अनेक वर्षांपासून ईपीएस-९५ पेन्शनधारकांची अवहेलना सुरू असून सर्व स्तरावरून तसेच कामगार संघटना, वरिष्ठ नागरिक परिसंघ, इतर काही संगठनांचे प्रयत्न याविषयी निष्फळ ठरले आहेत. त्यात भर म्हणजे सोशल मीडियावरील यूट्यूब, फेसबुक यांच्या माध्यमातून दिशाभूल करणाऱ्या पोस्ट सातत्याने प्रसारित होत आहेत ज्यात कधी पंतप्रधान मोदी तर कधी अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्या साक्षीने (फोटो द्वारा) ईपीएस -९५ पेन्शनमध्ये भरघोस वाढ स्वीकृत झाली असून लवकरच ही वाढ मासिक ७५०० रुपये, तर कधी ७००० तर कधी ५००० रुपये, सोबत महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा याला सरकारने मंजुरी दिली असून लवकरच ही वाढीव पेन्शन व इतर सुविधा प्रदान करण्यात येणार आहे अशी उघड (परंतु सपशेल खोटी) बातमी प्रसारित केली जात आहे. आश्चर्य हे आहे की अशाप्रकारे ईपीएस-९५ पेन्शनर्सच्या भावनांची थट्टा होत असताना सरकार मात्र उदासीन आहे व अशा माध्यमांवर काही कारवाई होताना दिसत नाही. आधीच हजार-दोन हजार रुपये मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनमध्ये होणारी परवड झेलत मोठ्या आशेने ही पेन्शन वाढेल याची चातकासारखी वाट बघत असलेले हे पेन्शनधारक समाज माध्यमांवरील अशा दिशाभूल करणाऱ्या व खोट्या बातम्या बघून सुखावतात परंतु क्षणिक आनंदाने प्रफुल्लित झालेले हे पेन्शनर्स वस्तुस्थिती कळल्यावर दु:खी होतात. सरकारला विनंती आहे की, अशाप्रकारे अपप्रचार करणाऱ्यांवर कडक कार्यवाही करून बंदी घालावी व ईपीएस-९५ पेन्शनधारकांची क्रूर थट्टा थांबवावी. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन एकदाचे जाहीर रीत्या हे स्पष्ट करावे की ईपीएस -९५ पेन्शनमध्ये काही वाढ अपेक्षित आहे की नाही. जेणेकरून पेन्शनधारकांची वारंवार होणारी मानसिक थट्टा व पिळवणूक थांबेल.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## समता सैनिक दलाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन आणि निवृत्त पोलीस उपनिरीक्षक केरू जाधव यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विकास विद्यालय, हनुमान नगर सोलापूर आणि सो.म.न.पा. प्राथमिक शाळा क्रमांक १६आणि२१ या ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून समता सैनिक दलाचे जीओसी सुमित्रा जाधव, ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर, महासचिव अनिल जगझाप, भारतीय बौद्ध महासभेच्या धम्मरक्षिता कांबळे, मालिनी दोडयानुर, लता कांबळे, वर्षा जाधव, प्रीती जाधव, विनोद जाधव तसेच शाळेतील शिक्षक राहुल पवार, शंकर नरहरे उपस्थित होते. निवृत्त पोलीस उपनिरीक्षक केरु रामचंद्र जाधव यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त येणाऱ्या मान्यवरांना आवाहन करण्यात आले होते की आपण पुष्पगुच्छ, बुके,हारतुरे न आणता वही आणि पेन घेऊन यावे. त्यानुसार या कार्यक्रमाच्या वेळी आलेल्या वह्या आणि पेन याचे वाटप यावेळी करण्यात आले. प्रास्ताविक महासचिव अनिल जगझाप यांनी केले. सूत्रसंचालन विनोद जाधव यांनी केले तर सिद्धेश्वर भुरले यांनी सर्वांचे आभार मानले.

## प्रा. गोसावी, कोनापुरे यांना विशेष उत्कृष्ट योगदान पुरस्कार

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**





अभियांत्रिकी शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तज्ज्ञांचा गौरव करण्याच्या उद्देशाने इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), सोलापूर स्थानिक केंद्र यांच्या वतीने वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजीच्या स्थापत्य अभियांत्रिकी शाखेचे सहाय्यक प्राध्यापक शशिकांत गोसावी आणि चेतन कोनापुरे यांना २०२३ - २०२५ या कालावधीत संस्थेच्या विविध उपक्रमात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विशेष उत्कृष्ट योगदान पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. प्रा. गोसावी आणि प्रा. कोनापुरे यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात व्यावसायिक जागरूकता वाढविणे, तांत्रिक कौशल्य विकास उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन अशा विविध माध्यमांतून प्रभावी योगदान दिले आहे. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), सोलापूर स्थानिक केंद्र आयोजित सन्मान सोहळा चेअरमन डॉ. मोहन देशपांडे यांच्या आणि सोलापूर स्थानिक केंद्राचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.



## बार्शी बाजार समिती निवडणुकीसाठी शेवटच्या दिवशी ११९ अर्ज दाखल

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर-**

कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूकीत पुन्हा एकदा सोपल-राऊत यांच्यातच चुरशीचा सामना रंगणार असल्याने, या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही गटाकडून १८ जागांसाठी एकूण ११९ अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये सोसायटी मतदारसंघातील ११ जागांपैकी ७ जागी सर्वसाधारण पुरुष, २ जागी सर्वसाधारण महिला, इतर मागासवर्गीय जागा १ व भटक्या विमुक्त जमातीची १ जागा आहे. ग्रामपंचायत मतदार संघातील ४ जागांपैकी २ जागा सर्वसाधारण, १ जागा अनुसूचित जाती जमाती व १ जागा आर्थिक दुर्बल घटकासाठी आहे. व्यापारी व अडते मतदार संघातून २ जागा व हमाल-तोलार मतदारसंघातून १ जागेसाठी अर्ज दाखल झालेले आहेत. यामध्ये सोपल गटाकडून पंचायत समितीचे माजी सभापती युवराज काटे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मकरंद निंबाळकर, माजी संचालक अरुण येळे, नंदकुमार काशीद, भास्कर काशीद, सुभाष शेळके, अशोक काशीद, माजी नगरसेवक अंबादास शिंदे, राजाभाऊ चव्हाण, किरण काकडे या प्रमुख नेत्यांनी अर्ज दाखल केले आहेत. तर माजी आमदार राजेंद्र राऊत गटाकडून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संतोष निंबाळकर, मदन दराडे, संजीव बगाडे, विजय गरड, प्रभाकर डमरे, अजित बारंगुळे, अभिजीत कापसे, बाबा गायकवाड, बाबा काटे, दशरथ टेकाळे, बाळराजे घाटे या प्रमुख नेत्यांनी अर्ज दाखल केले आहेत.

### माजी आमदार राजेंद्र राऊत यांचा धक्कादायक आणि आश्चर्यकारक निर्णय

या निवडणुकीत माजी आमदार राऊत यांनी त्यांचे सुपुत्र व बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. या निवडणुकीत राऊत यांनी आपल्या मुलाची उमेदवारी नाकारण्याच्या निर्णयामुळे त्यांनी विरोधकांना गोंधळून टाकले आहे. यामागे त्यांची कोणती रणनीती असू शकते, हे निवडणुकीच्या निकालानंतरच समजेल.

# प्रमुख चौक, दुभाजक देखभालीची जबाबदारी सोपविली संस्थांना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

शहरातील प्रमुख चौक ते महत्त्वाच्या मार्गांपर्यंत स्वच्छता, सजावट, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी विविध संस्थांकडून स्वेच्छेने स्वीकारण्यात आली आहे.

महापालिकेच्यावतीने स्वच्छता, सुंदरता आणि जनजागृतीसाठी विविध सामाजिक, औद्योगिक तसेच वृत्तसंस्थांच्या सहकार्याने दुभाजक ॲडॉप्शन उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिकेने शहरातील संस्थांना या चौक व दुभाजक या संदर्भातील स्वच्छता, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विविध चौक व रस्त्यांवरील दुभाजकांची स्वच्छता, सजावट, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी काही संस्थांकडून स्वेच्छेने स्वीकारली आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर या अभियानाचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.या उपक्रमाद्वारे शहरातील रस्ते व चौक स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध ठेवण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छता हीच सेवा या भावनेचा प्रसार होणार आहे. संबंधित संस्थांनी आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून शहराच्या स्वच्छतेत व सौंदर्यवर्धनात मोलाचा वाटा उचलला आहे.

### या संस्थांकडे आहे ही जबाबदारी

महानगरपालिकेकडील नोंदणीनुसार मान्यतेअंती पुढील चौक आणि दुभाजकासाठी खालील संस्थांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

१) डफरीन चौक ते जुना एम्प्लॉयमेंट चौक परिसरापर्यंतची जबाबदारी एनटीपीसी सोलापूर, २) पार्क चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैया चौक) जबाबदारी माऊली लँडमार्क, ३) मरीआई चौक ते डी-मार्ट रोड परिसर जबाबदारी- माऊली लँडमार्क, ४) आसराचौक ते संचार प्रेसची जबाबदारी- लोकमत प्रेस,५) सात रस्ता ते त्रिपुर सुंदरी मार्गे गांधी नगर ते महावीर चौक जबाबदारी- मोंढे मोटर्स,६) एम्प्लॉयमेंट चौक ते सात रस्ता जबाबदारी एनटीपीसी, सोलापूर ७) सात रस्ता चौक, यशवंतराव चव्हाण पुतळा समोरील दुभाजक परिसर जबाबदारी लोकमत प्रेस,८) मुख्य चौक सात रस्ता परिसर जबाबदारी एनटीपीसी सोलापूर, ९) एम्प्लॉयमेंट चौक परिसर जबाबदारी सोलापूर, १०) डॉ. द्वारकानाथ कोटणीस गार्डन, सात रस्ता परिसर जबाबदारी एनटीपीसी सोलापूर यांच्याकडे राहणार आहे.

### ध्येयपूर्तीकडे नेणारे महत्त्वाचे पाऊल : आयुक्त डॉ. ओम्बासे

दुभाजक ॲडॉप्शन योजनेतून शहरातील सार्वजनिक ठिकाणांची जबाबदारी स्थानिक संस्था स्वीकारत असल्याने शहराचे सौंदर्य वाढेल, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश पोहोचेल. ही योजना 'सुंदर सोलापूर - स्वच्छ सोलापूर' या ध्येयाच्या पूर्ततेकडे नेणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या उपक्रमाबाबत सांगितले.

## राष्ट्रवादीच्या जिल्हा सहसंपर्कमंत्रीपदी बनसोडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची शहर जिल्हा आढावा बैठक नुकतीच वरळी मुंबई येथे पार पडली. या बैठकीत सोलापूर शहर व जिल्ह्यातील सामाजिक सामाजिक समीकरण पाहता सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या जोडीला सहसंपर्क मंत्री म्हणून विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी केली, असता या मागणीनुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तात्काळ दखल घेत शहर जिल्ह्यासाठी सहसंपर्क मंत्री म्हणून अण्णा बनसोडे यांची निवड केली.

या निवडीनंतर सोलापूर जिल्ह्याच्या वतीने ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील तसेच शहरच्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेशचे उपाध्यक्ष किसन जाधव प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, तौफिक शेख यांनी अण्णा बनसोडे यांचा सत्कार केला. यावेळी अण्णा बनसोडे म्हणाले, आगामी महापालिका जिल्हा परिषद पंचायत समिती या सर्व निवडणुकीमध्ये कृषीमंत्री दत्तात्रय भरणे संपर्क मंत्री यांच्याबरोबर सहसंपर्क मंत्री म्हणून निवडणुकीमध्ये सक्रीय सहभाग नोंदवणार असून येणाऱ्या काळामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांचे बैठका घेऊन या निवडणुकीचा बाबतीत आढावा घेणार आहे.



## ५0 वर्षे रंगभूमीची सेवा करण्याचे भाग्य मिळाले : सुशीला व्हनसाळे

### ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

नाट्यकलेच्या क्षेत्रामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून मी कार्यरत आहे. मराठी आणि हिंदी अशा दहा सिनेमांमध्ये भूमिका केल्या. नटराजाची सेवा गेल्या पन्नास वर्षापासून अखंड सुरू असल्याचे मत ज्येष्ठ नाट्य कलावंत सुशीला व्हनसाळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य परिषदेच्या वतीने हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्हनसाळे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्य परिषद महानगर शाखेचे अध्यक्ष प्रा.अजय दासरी होते. यावेळी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, मराठी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य गुरु वठारे, परीक्षक मधुरा टापरे, दीप चहांदे, सुधीर सेवेकर, समन्वयक अमोल धाबळे उपस्थित होते.

वेदांत करपे लिखित मनमंदिरा हे दोन अंकी नाटक सादर करण्यात आले. या नाटकाचे दिग्दर्शन संकेत कुलकर्णी यांनी केले होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पंढरपूरच्या वतीने हे नाटक सादर करण्यात आले. नाटकामध्ये निवृत्तीनाथाची भूमिका संकेत कुलकर्णी यांनी केली होती. तर सखुबाई -आज्ञा कवडे, मिराबाई - विनया उत्पात, काशिनाथ - नाना दत्तात्रेय जगताप, विकास वेदांत करपे, जनाई ऋतुजा लाड, ममता - आरती गायकवाड, राकेश कौस्तुभ देवकर, वारकरी - रेणुका बडवे, अपूर्वा सासवडे, दिलीप कोरके, प्रकाश योजना, प्रतीक कसबे, विश्वेश्वरय्या स्वामी. जाधव, नेपथ्य- श्रावण डावरे. सूत्रसंचालन अभीज भानप यांनी केले. तर आभार समन्वयक अमोल ढाबळे यांनी मानले. नाट्यरसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विषेशतः मौजे अकोलेकाटी ग्रामपंचायत, तालुका उत्तर सोलापूर हद्दीतील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**: डि व सब डि|| सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, मौजे अकोलेकाटी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. २६६/१+२६६/२ यापैकी साई नगर मधील बिनशेती प्लॉट खालील प्रमाणे:

**१) प्लॉट नंबर** : ०८ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०९, दक्षिणेसः प्लॉट नं. ०९, उत्तरेसः प्लॉट नं, ०७ तसेच **२) प्लॉट नंबर** : ०९ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०८, दक्षिणेसः प्लॉट नं. १०, उत्तरेसः प्लॉट नं. ०८ तसेच **३) प्लॉट नंबर** : १० क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०७, दक्षिणेसः प्लॉट नं. ११, उत्तरेसः प्लॉट नं. ०९ तसेच **४) प्लॉट नंबर** : ११ क्षेत्र ९६.०५ चौ.मी. अथवा १०३३.८२ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. ६, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता, उत्तरेसः प्लॉट नं. १० तसेच **५) प्लॉट नंबर** : १०६ क्षेत्र ९६.०५ चौ.मी. अथवा १०३३.८२ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. ११, पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता, उत्तरेसः प्लॉट नं. १०७ तसेच ६ प्लॉट नंबर: १०७ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. १०, पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः प्लॉट नं. १०६, उत्तरेसः प्लॉट नं. १०८ तसेच १) प्लॉट नंबर: १०८ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. ०९. पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः प्लॉट नं. १०७, उत्तरेसः प्लॉट नं. १०९

सदर नमूद सातही प्लॉट जागा मागरेट / मारगेट मनोहर सूर्यवंशी व मायकल मनोहर सूर्यवंशी व जानी मनोहर सूर्यवंशी उर्फ मार्शल मनोहर सूर्यवंशी यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर प्लॉट जागा आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांकडून कांही इसारा रक्कम स्विकारले आहेत व तसा इसारा पावती दस्त लिहून दिला आहे. तसेच सदर प्लॉट जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद प्लॉट जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र, वारसपत्र, अधिकारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांतरण केले असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली. सदरची खरेदीपूर्वजाहीर नोटीस दिली. तारीखः ०७/११/२०२५

**सही/-**
**ॲड. सुनिल भ. कांबळे**
एम.ए.एल.एल.बी.
२२, शिवाजी नगर, बाळे, पुणे रोड,
सोलापूर - ४१३२५५ **मो.नं. ९७६४१०६३४२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

प्रस्तुत जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस विशेषतः बार्शी शहर, म्यु. पल हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आसपासचे सलग्न तालुक्यातील व परिसरातील तमाम लोकांना कळविण्यात येते की,

तालुका बार्शी पैकी बार्शी शहर, म्यु. पल हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट गट नं. ८८८/१४ याचे क्षेत्र १.९५०० चौ. मी., आकार ९रू. ७५ पैसे, मोजमापे पूर्व बाजुची १५.०० मिटर असा प्लॉट मिलिंद गोकुळदास मिरगणे याचे खरेदी मालकीचे व कब्जे वहिवाटाची जमीन असून याची चतुःसिमा पूर्वेस- प्लॉट नं. १३, दक्षिणेस-रस्ता, पश्चिमेस- रस्ता व उत्तरेस-प्लॉट नं. ७ येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक बिनशेती खुला प्लॉट आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तदंगभुत वस्तु हक्कासह.

वर नमुद बिनशेती खुला प्लॉट हि मिलिंद गोकुळकदास मिरगणे यांचे खरेदी मालकीची आहे. आज रोजी मिलिंद गोकुळदास मिरगणे यांचे नाव मालकी हक्की मालमत्ता हक्कापत्रकी नाव दाखल आहे व नमुद बिनशेती खुला प्लॉट प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे.

सदरची मिळकत मिलिंद गोकुळकदास मिरगणे यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री करणेचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयंतामध्ये ठरलेला आहे. व सदरची मिळकत ही निर्बंध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपर हि वर नमुद मिळकत संदर्भात कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १०(दहा) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरूपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटुन खात्री करून द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमु मिळकतही समजुन अथवा त्यांनी तो जाणीव पुर्वक स्वईच्छेने सोडुन दिला असे समजुन आमचे अशिल व प्लॉट मालक आसपास ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवु नये म्हणून ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. ०७/११/२०२५

**सही/-**
**ॲड. सुधीरकुमार प्रभाकर होनमुटे**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
**मो.नं. ९८६०५६९७१८**
अशिलातर्फे ॲडव्होकेट



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः बुधवार पेठ हद्दीतील आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व रहिवाशांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि. सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बुधवार पेठ हद्दीतील सिटी सर्व्हे नं.८९०७/पी/१०ब यासी म्यु.घर नं.१०८ यासी सो.म.पा. मिळकत नंबर ०४०८०२ असा असून यासी क्षेत्र ७४२ चौ.मी. जागेत तळमजला एक अल्टरेशन रूम, एक किचन रूम, फॅमिली रूम, स्टोअर कम रूम सर्व सोयीने असलेली घरजागा व जीना असे एकूण ७५ चौ.मी.चे बांधकाम आर.सी.सी. पद्धतीने व उर्वरित खुलीजागा आहे. सदर जागेची चतुःसिमा पुढील प्रमाणे :

**पूर्वेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/१०/ओ **दक्षिणेस** : ३० फूट रस्ता
**पश्चिमेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/१२ व ८९०७/पी/४
**उत्तरेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/३ व ८९०७/पी/२

सदर मिळकत ही **१) श्री. दत्तात्रय शंकर वल्हे २) श्री. गजानन भाऊराव चव्हाण ३) श्री. महेंद्र नामदेवराव सरोदे ४) अफरोजखान अनसारखान पठाण ५) श्री. हर्षल शेषेराव वाघमारे** यांच्या मालकी, कब्जे, वहिवाटीची असून सदर मिळकत ही आमचे अशिलाना कायम खूशखरेदी देण्याचे ठरवून दिनांक ०७/११/२०२५ रोजी तोंडी कायम खूष खरेदी देण्याचे ठरले आहे. इसारपोटी काही रक्कम स्विकारली आहे.

सबब वर नमूद मिळकती विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मार्गेज, इसारा, कर्ज व इतर कोणत्याही प्रकारचे हित संबंध असतील तर खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी/पुराव्यानिशी ७ दिवसाच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली दिनांक ०८/११/२०२५

**सही/-**
**ॲड. सहदेव रघुनाथ भडकुंबे**
बी.कॉम. एलएल.बी.,
५६ रविवार पेठ, गुजरवस्ती सोलापूर- ४१३००२
**मो.नं. ९०२८९६६३१७**



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि, व ता. बार्शी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील प्लॉट जागा याचा गट नं. ११७७/३/६ याचे क्षेत्रफळ ९५.७१ चौ. मी. याचे चौ. फुट १.२९. ८३ आहे याचा बिनशेती आकार रू. ६३.०० पैसे आहे. याचे मोजमाप पुर्व बाजु ८.०१ मी, दक्षिण प्लॉट नं. ५, पश्चिम बाजू मीटर ८.००, उत्तर बाजू मीटर ११.९५ आहे. यासी चतुःसीमा पुर्वेस-प्लॉट नं. १ व २, दक्षिणेस-प्लॉट नं. ५, पश्चिमेस ९.०० मीटर रूंदीचा रस्ता, व उत्तरेस- प्लॉट नं. ७ आहे. या मोजमापात आर. सी.सी. स्वरूपाचे बांधकाम याचे क्षेत्रफळ ७६.७५ चौ. मी. आहे. याचे चौ. फुट ८२७.०० आहे. सदर प्लॉटचे पाणी वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक प्लॉट जागा आतील बांधकाम व सर्व तद्गंभूत वस्तुसह.

सदर नमूद मिळकत ही प्रशांत महादेव जांभळे रा. मारूती शेजारी, सुभाष नगर, बार्शी ता. बाशी, जि. सोलापूर यांचे स्वकष्टार्जित स्वतंत्र खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची असून रेकॉर्डला त्यांचे नावाची नोंद असलेली मिळकत आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर अडचणीकरीता व इतर कायदेशीर गरजेकरीता विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीबाबत आमचे अशिलासोबत प्रशांत महादेव जांभळे यांनी व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी, इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क म्हणजे इसारपावती, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात ०८ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस असे ता. ०७/११/२०२५

**सही/-**
**ॲड. शंकर पांडुरंग ननवरे**
**ॲड. विजय सुरेश काकडे**
ऑफिस पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शॉपिंग सेंटर गाळा नं. ५०, ता. बार्शी, जि. सोलापूर
**मो.नं. ८१४९०६०००८, ९४०३५५१०९५**
अशिलातर्फे ॲडव्होकेट



Yashoda Shikshan Prasarak Mandal's
**Sojar College of Pharmacy, Khandvi.**
Tal: Barshi, Dist: Solapur. (MS) 413401 Ph: 02184-297000

**ADMISSION NOTICE: 2025-26**

Application are invited from the eligible candidates for
**FIRST YEAR B. PHARMACY**
Admission for the academic year 2025-26 for probable Vacancies after CAP rounds.
Detail schedule of admission process is displayed on college notice board & college website.

**CONTACT**
**Sojar College of Pharmacy, Khandvi,**
PH: (02184) 297000, Mo. 9604397996 / 9420702085 / 9923332316
**E-mail: sojarcop@gmail.com**
**Web Site: www.sojarcop.edu.in**

**PRINCIPAL** **PRESIDENT**



### विभाग सार्वजनिक वाचनालय

**१५१/५, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर ४१३००५**

**५० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि २३/११/२०२५ रोजी सकाळी १०:३० वा संस्थेच्या विणकर सभागृहात बोलविण्यात येत आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभा दि २०/१०/२०२४ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे
२) सन २०२४-२५ या सालाचे ताळेबंद पत्रक तसेच उत्पन्न व खर्चाची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
३) सन २०२४-२५ या सालाचे ऑडीट रिपोर्टची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
४) सन २०२५-२६ या सालाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५) सन २०२५-२६ या वर्षाकरिता लोकल ऑडिटरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे
६) मा खासदार यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून वाचनालयाच्या वाचकांसाठी इमारतनिधी मिळविणेबाबत
७) संस्थेचे घटना नियमावलीत बदल करणे
८) मा. अध्यक्षसाहेब यांच्या पूर्व परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय

**ठिकाण :- सोलापूर**
**दिनांक :- ०४/११/२०२५**

**सही/-** **पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी** **अध्यक्ष**
**सही/-** **अरविंद दत्तात्रय चित्री** **कार्यवाह**

**टिप :-**
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल त्या वेळेस कोरमची आवश्यकता नाही.
२) सभासदांनी मागील येणे वर्गणी थकबाकी आठ दिवस अगोदर संपूर्णपणे भरावी.
३) संस्थेच्या सभासदांनी प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी आठ दिवस अगोदर कार्यालयात सादर करावेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गतविजेता विदर्भ-ओडिशा रणजी लढत आजपासून

**नागपूर** : प्रतिष्ठेच्या रणजी करडंक क्रिकेट स्पर्धेत एलिट अ गटात शनिवारपासून जामठ्याच्या व्हीसीए स्टेडियमवर गतविजेता विदर्भ आणि ओडिशा यांच्यादरम्यान चौथ्या फेरीचा साखळी सामना खेळला जाणार आहे. सध्या एलिट अ गटाच्या गुणतालिकेत झारखंड १५ गुणांसह अव्वल स्थानावर, विदर्भ १३ गुणांसह दुसऱ्या, आंध्र प्रदेश ९ गुणांसह तिसऱ्या थानावर, तर बडोदा ८ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. विदर्भाला पुन्हा अव्वल स्थान मिळविण्यासाठी ओडिशाविरुद्ध मोठा विजय नोंदविणे आवश्यक आहे. विदर्भाचा गत तामिळनाडूविरुद्धचा सामना अनिर्णीत राहिला, त्यामुळे विदर्भाची गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर घसरण झाली. आता कर्णधार अक्षय वाडकरच्या नेतृत्वाखालील विदर्भ संघाला ओडिशाविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी करावी लागणार आहे. तसेही ओडिशा संघ आतापर्यंत संघर्ष करत आला आहे. ओडिशाने आतापर्यंतची आपली तिन्ही साखळी सामने गमावले असून एका गुणासह ओडिशा आठ संघांच्या एलिट अ गटात सातव्या स्थानावर आहे. ■

### ऑस्ट्रेलियन माजी फुटबॉल खेळाडूचा भारतीय संघात समावेश

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणारा माजी भारतीय फुटबॉल खेळाडू रायन विल्यम्सचा भारतीय फुटबॉल संघात समावेश करण्यात आला आहे. रायन विल्यम्सने खूप पूर्वीच आपले ऑस्ट्रेलियन नागरिकत्व सोडले होते आणि आता त्याने अधिकृतपणे भारतीय नागरिकत्व स्वीकारले आहे. बंगळुरू एफसीमध्ये त्याच्यासोबत खेळणारा दिग्गज भारतीय फुटबॉल खेळाडू सुनील छेत्रीने विल्यम्सचा भारतीय पासपोर्ट त्यांना सादर केला. २०२३ मध्ये बंगळुरू एफसीमध्ये सामील होण्यापूर्वी रायन विल्यम्स पूर्वी इंग्रजी क्लब पोर्ट्समाऊथ आणि फुलहॅमकडून खेळला होता. रायन विल्यम्सला त्याचा भारतीय पासपोर्ट सादर करण्यापूर्वी सुनील छेत्रीने त्याला भारतीय संस्कृती आणि स्ट्रीट फूडशी संबंधित काही प्रश्न विचारले. विल्यम्सने या सर्व प्रश्नांची उत्तरे सहजतेने दिली, देशाशी सहजपणे ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ३१ वर्षीय मिडफिल्डरचा जन्म ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे झाला होता, जिथे त्याने २० वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील पातळीवर ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आहे. भारतीय फुटबॉल संघ १८ नोव्हेंबर रोजी ढाका येथे बांगलादेशविरुद्धच्या एएफसी आशियाई कप पात्रता फेरीत आपला पुढचा सामना खेळणार आहे.

### एम.एस. धोनी पुढील वर्षी सीएसकेकडून खेळणार

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेटचा दिग्गज महेंद्रसिंग धोनी २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये पाच वेळा



विजेता चेन्नई सुपर किंग्जकडून (सीएसके) खेळणार आहे, असे फ्रॅन्चायझीचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी शुक्रवारी सांगितले. २००८ मध्ये लीग सुरू झाल्यापासून सीएसकेचा पर्याय असलेला धोनी २०२५ च्या आयपीएलच्या मध्यात पुन्हा कर्णधार म्हणून परतला होता, नवनियुक्त कर्णधार, सलामीवीर ऋतुराज गायकवाड कोपराच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला होता. सीएसकेसाठी हा एक विसरण्यासारखा हंगाम होता कारण त्यांनी १४ सामन्यांपैकी केवळ चार विजयांसह गुणतालिकेत तळाशी संपवले होते. धोनी खेळण्याची शक्यता आहे, ही सध्याची स्थिती आहे. आम्हाला वाटते की तो या आगामी आयपीएलमध्ये खेळेल, असे विश्वनाथन यांनी शुक्रवारी सांगितले. २०१६ आणि २०१७ च्या हंगामासाठी फ्रॅन्चायझीच्या निलंबनाशिवाय, धोनी सीएसके संघात कायमचा सहभागी आहे. आयपीएल २०२६ मध्ये पुनरागमन हा त्याचा सीएसकेसोबतचा १७ वा आणि स्पर्धेत एकूण १९ वा हंगाम असेल. आतापर्यंत, धोनीने सीएसकेसाठी २४८ सामने खेळले आहेत, ४,८६५ धावा केल्या आहेत आणि २०१०, २०११, २०१८, २०२१ आणि २०२३ मध्ये सीएसकेचे नेतृत्व करत पाच आयपीएल जेतेपदे जिंकली आहेत. एकूणच, धोनीने २७८ सामन्यांमध्ये ५४३९ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर १५८ झेल आणि ४७ यष्टीचित आहेत.

### २० नोव्हेंबर रोजी झुरिचमध्ये फिफा प्लेऑफचा ड्रॉ काढणार


**इयुरिच** : ४८ संघांच्या २०२६ विश्वचषकातील शेवटच्या सहा प्रवेशिका निश्चित करण्यासाठी फिफा २० नोव्हेंबर रोजी झुरिचमध्ये प्लेऑफ सामन्यांसाठी ड्रॉ आयोजित करणार आहे, असे जागतिक फुटबॉल संघटनेने शुक्रवारी सांगितले. युरोपियन गटामध्ये १६ संघ असतील- कदाचित चार वेळा विजेता इटलीसह - पुढील जून आणि जुलैमध्ये अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये होणाऱ्या स्पर्धेत चार स्थानांसाठी खेळतील. मेक्सिको आयोजित करणार असलेल्या इंटरकॉन्टिनेंटल प्लेऑफमध्ये युरोपबाहेरील सहा संघ दोन प्रवेशिकांसाठी खेळतील. बोलिव्हिया आणि न्यू कॅलेडोनिया आधीच पात्र ठरले आहेत. सर्व प्लेऑफ सामने २६ ते ३१ मार्च दरम्यान नियोजित आहेत. ■

# भारत मालिका विजयाच्या उंबरठ्यावर

## भारताचे फलंदाजीत सातत्य राखण्याचे लक्ष्य ● ऑस्ट्रेलियासमोर भारतीय फिरकीचे आव्हान



सूर्यकुमार यादव



मिचेल मार्श

◆ **ब्रिस्बेन, ७ नोव्हेंबर**

भारतीय टी-२० क्रिकेट संघ विदेशात आणखी एका मालिका विजयाच्या उंबरठ्यावर आहे. शनिवारी येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यान पाच टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना खेळला जाणार आहे. या मालिकेत सध्या भारत २-१ ने आघाडीवर असून भारताला विजयाची नामी संधी आहे, परंतु त्याकरिता भारताला आपल्या फलंदाजीतील विसंगती दूर करण्याच प्रयत्न करावा लागेल आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा शेवट विजयाने करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

**सूर्यकुमारचा विजयाची परंपरा कायम राखण्याचा प्रयत्न**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका न गमावण्याची १७ वर्षांची परंपरा कायम राखण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. शुभमन गिल व कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित केले जाईल, तर पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी दोन्ही संघ शेवटच्या वेळी आमने-सामने येतील, तेव्हा ऑस्ट्रेलिया भारताच्या फिरकी गोलंदाजांच्या आव्हानाचा सामना करण्याचा प्रयत्न करेल.

भारताने गत सामन्यात उच्चम व्यूहरचनेची जाणीव दाखवली, अवघड काराराच्या खेळपट्टीवर जुळवून घेतले. गिलने १४ षटकांत २ बाद १२१ धावांची आशादायक सुरुवात केली, परंतु नंतरच्या काळात झालेल्या पडझडीमुळे संघाने १५ धावांत चार फलंदाज गमावले.

**गिल उच्च कामगिरी करण्यास उत्सुक**

उपकर्णधार गिलचे सात डाव अर्धशतकाशिवाय राहिले आहेत, मात्र चौथ्या टी-२० मध्ये त्याने ४६ धावा काढून आपल्याला सूर गवसल्याचे दाखवून दिले. तेव्हा सलामीवीर गिल संघ व्यवस्थापनातील चिंता कमी करण्यासाठी आणि उच्च कामगिरी करण्यासाठी उत्सुक असेल.

सूर्यकुमारने संपूर्ण मालिकेतही चमकदार कामगिरी दाखवली आहे, परंतु त्याला त्याच्या सुरुवातीचे रूपांतर करण्यात संघर्ष करावा लागला आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यापूर्वी कर्णधाराकडून अधिक मुक्तपणाने फलंदाजी करण्याची व आदर्श नेतृत्व करण्याची अपेक्षा केली जाईल.

तिलक वर्माला अद्याप त्याची लय सापडलेली नाही. यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्मावरही दबाव असेल. गत दोन सामन्यांमध्ये संजू सॅमसनपेक्षा पुढे खेळला आहे परंतु अद्याप त्याचा कोणताही मोठा प्रभाव पडलेला नाही.

**अष्टपैलू खेळाडूंनी संघाला बळकटी**

अभिषेक शर्माने मात्र जगातील अव्वल क्रमांकाचा टी-२० फलंदाज म्हणून आपल्या प्रतिष्ठेनुसार कामगिरी केली आहे. भारताच्या तळाच्या फळीनेही प्रभावी कामगिरी केली आहे. गत सामन्यात अक्षर पटेलने ११ चेंडूत २१ धावा केल्या होत्या. अष्टपैलू खेळाडूंच्या उपस्थितीमुळे संघाला बळकटी मिळाली आहे.

गोलंदाजी विभागात अर्शदीप सिंगने पुन्हा एकदा भारतासाठी आपली योग्यता सिद्ध केली आहे, त्याने चार बळी टिपले व जसप्रीत बुमराहसोबत प्रभावी जोडी निर्माण केली आहे. कुलदीप यादवच्या अनुपस्थितीतही वरुण, अक्षर व वॉशिंग्टन ही फिरकी त्रिकूट भारतासाठी एक मोठी ताकद आहे. शिवम दुबे व वॉशिंग्टन दोघांनीही फलंदाजी आणि गोलंदाजीत महत्त्वाची कामगिरी केली आहे.

ऑस्ट्रेलियासाठी, चौथ्या टी-२० सामन्याने पुन्हा एकदा दर्जेदार फिरकी गोलंदाजांविरुद्ध त्यांची कमकुवतपणा उघडकीस आणला. कॅरारा ओव्हल येथे झालेल्या सामन्यात वरुण चक्रवर्ती, अक्षर व वॉशिंग्टन सुंदरने दहा षटकांच्या आत सहा बळी घेतले.


**भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० सामना**

**स्थळ** : गॅबा क्रिकेट स्टेडियम, ब्रिस्बेन
**वेळ** : दुपारी १.४५ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

पाहुण्या संघाची फलंदाजी कर्णधार मिशेल मार्श, मार्कस स्टोयनिस व टिम डेव्हिडवर जास्त अवलंबून होती. ट्रॅव्हिस हेडच्या अनुपस्थितीमुळे गत सामन्यात त्यांच्या आशा मावळल्या. जोश हेझलवूडची अनुपस्थिती सुद्धा जाणवली आहे

सलामीवीर म्हणून अष्टपैलू मॅथ्यू शॉर्ट प्रभाव पाडण्याची संधी गमावली असून तो शनिवारी कामगिरीत सुधारणा करण्यास उत्सुक असेल. नॅथन एलिस व ॲडम झम्पाने बरीच जबाबदारी घेतली आहे, परंतु बेन द्वारशुइस चौथ्या टी-२० मध्ये एकही बळी घेतला नाही. यजमान संघ अंतिम सामन्यात महली बियर्डमनला पदार्पण देण्याचा विचार करू शकतो. ◀(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र सरकारकडून मंधाना, जेमिमाह, राधाला प्रत्येकी २.२५ कोटींचे बक्षीस





जेमिमाह रॉड्रिग्जचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

◆ **मुंबई, ७ नोव्हेंबर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्यातील भारतीय महिला विश्वचषक विजेत्या संघातील सदस्य स्मृती मंधाना, जेमिमाह रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांचा सत्कार केला आणि त्यांना प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

दक्षिण मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थान वर्षा येथे झालेल्या सत्कार कार्यक्रमात फडणवीस यांनी या तिघींना 'महाराष्ट्राचा अभिमान' म्हटले आणि संघाच्या विजयामुळे तरुण मुलींना खेळात रस घेण्यास आणि जागतिक व्यासपीठांवर चमकण्यास प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

महिला क्रिकेटच्या प्रगतीसाठी फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांचेही कौतुक केले.

क्रिकेट संघाचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांना २२.५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तर सपोर्ट स्टाफमधील प्रत्येक सदस्याला ११ लाख रुपये देण्यात आले.

गोलंदाजी प्रशिक्षक अविष्कर साळवी, माजी दिग्गज क्रिकेटपटू डायना एडुलजी, विश्लेषक अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक्स समन्वयक अपर्णा गंभीरराव आणि सपोर्ट स्टाफ सदस्य मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे आणि ममता शिरुरल्ला उपस्थित होते. यावेळी उपकर्णधार स्मृती मंधानाने राज्यातील जनतेचे आभार मानले. गत दोन वर्षांत अढळ लक्ष केंद्रित आणि लवचिकतेबद्दल मुझुमदार यांनी खेळाडूंचे कौतुक केले. डावखुरा फिरकी गोलंदाज राधा यादव म्हणाली की पहिल्यांदाच तिचा अशा प्रकारे सत्कार करण्यात आला. मला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचा मला खरोखर अभिमान वाटते, असे रॉड्रिग्ज म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

# 'बीगसी'च्या साक्षी सुराला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे आयोजित आंतरविभागीय पॉवर लिफ्टिंग आणि वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या साक्षी सूरा हिने ४७ किलोग्रॅम वजन गटात सुवर्णपदक पटकाविले.

ऑर्चीड अभियांत्रिकी मध्ये झालेल्या स्पर्धेत तिने ही कामगिरी केली. तिला जिमखाना चेअरमन प्रा. अमित वडवेराव यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने, अध्यक्ष इंजिनियर रवींद्र गायकवाड यांनी अभिनंदन केले.

### कोको गॉफला हरवून सबालेंका अंतिम चारमध्ये

**रियाध** : अव्वल मानांकित बेलारूसच्या आर्यना सबालेंकाने डब्ल्यूटीए फायनलमध्ये सलग तिसरा गट-टप्पा विजय मिळवला आणि कोको गॉफला ७-६ (५), ६-२ असे हरवले आणि या प्रक्रियेत तिच्या अमेरिकन प्रतिस्पर्ध्याला स्पर्धेतून बाहेर काढले. सबालेंकाच्या विजयामुळे जेसिका पेगुला बेलारूसी क्रमांक १ सोबत गटातून उपांत्य फेरीत पोहोचली. ■

# वेस्टझोन कराटे स्पर्धेसाठी सांगोल्याच्या चौघांची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.७ नोव्हेंबर -**

नाशिक येथे कराटे इंडिया ऑर्गनायझेशनच्या मान्यतेने व कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या आयोजनाने पाचव्या वेस्ट झोन कराटे स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमध्ये सांगोल्याच्या आरोही सावंत, वैष्णवी गेजगे, रोहित अरबळी व सिद्धार्थ माने या चार खेळाडूंचा समावेश आहे. हे खेळाडू सुनील वाघमारे, श्रावणी वाघमारे, निजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वाघमारे कराटे क्लासमध्ये रोज सराव करत आहेत. त्यांचे कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सिंहन संदीप गाडे व स्पोर्ट्स कराटे डो असोसिएशन सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष जी.के.वाघमारे यांनी अभिनंदन केले.

# श्री चरणीला आंध्र प्रदेश सरकारकडून रोख बक्षीस, जमीन अन् नोकरी देण्याची घोषणा

◆ **अमरावती, ७ नोव्हेंबर**



श्री चरणीचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, मिताली राज

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी २०२५ च्या महिला क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाच्या सदस्या एन. श्री चरणीला २.५ कोटी रुपये रोख बक्षीस, १ हजार चौरस फूट घराचा भूखंड आणि गट-१ मध्ये नोकरी देण्याची घोषणा केली.

मुख्यमंत्र्यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज यांच्यासोबत त्यांच्या कॅम्प ऑफिसमध्ये भेट घेणाऱ्या चरणीचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी महिला विश्वचषक विजेत्या, टीम इंडिया (महिला) सदस्या आणि तेलुगू मुलगी श्री चरणीला मोठे बक्षीस जाहीर केले. मुख्यमंत्र्यांनी कडप्पा येथे घर बांधण्यासाठी २.५ कोटी रुपये रोख बक्षीस आणि १,००० चौरस फूट भूखंड देण्याचा निर्णय घेतला.. याशिवाय त्यांनी तिला गट-१ श्रेणीची नोकरी देण्याची घोषणा केली. महिला विश्वचषक जिंकून भारतीय महिलांची क्षमता सिद्ध झाली आह, असे मुख्यमंत्री नायडू म्हणाले. तत्पूर्वी, कडप्पामध्ये जन्मलेल्या या क्रिकेटपटूचे गन्नवरम विमानतळावर आंध्र क्रिकेट संघटनेचे (एसीए) अध्यक्ष के. शिवनाथ, गृहमंत्री वंगलापुडी अनिता आणि इतरांनी मोठ्या थाटामाटात स्वागत केले. ◀(वृत्तसंस्था)



# गांधी नाथा विद्यालयात क्रीडा स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर**

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान संचलित गांधी नाथा रंगजी विद्यालयात आंतर शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी, स्मिता रणदिवे व क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांच्या उपस्थितीत झाले.

या स्पर्धेत डॉजबॉल, आट्यापाट्या, रनिंग, कबड्डी, बुक बॅलेन्स, बादलीत चेंडू टाकणे, स्लो सायकल या खेळांचा समावेश आहे. या वेळी क्रीडा समिती प्रमुख विजया मल्लाडे, वर्षा शिंदे, मिनाक्षी माने, रूपाली लामखाने यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा, विभागीय व राज्य आणि नवोदित खेळाडू अंजली क्षीरसागर, तनुश्री बद्दुरकर, सान्वी कदम, अमृता जेंबगी, अनिकेत शिंदे, श्री क्षीरसागर, अक्षता रणसुबे, समृद्धी पुजारी या खेळाडूंचा गौरव करण्यात आला.



# विभागीय मैदानी स्पर्धेत महर्षी प्रशालेच्या मुलींनी दुहेरी मुकुट

### चार बाय शंभर व चारशे मीटर रिलेमध्ये प्रथम

**अकलूज, दि. ६ नोव्हेंबर-**

पुणे येथे झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत शंकरनगर येथील महर्षि प्रशालेच्या १९ वर्षांखालील मुलींनी ४ बाय १०० व ४०० मीटर रिले शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

पुणे येथील बालेवाडी झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलीनी ४ बाय १०० मीटर रिलेम ध्ये द्वितीय क्रमांक संपादिला.

यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रदिप पांढरे, अनिल मोहिते व दादासाहेब सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे म ोहिते पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक प्रश्नाला समितीचे सभापती अँड.नितिनराव खराडे, मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी कौतुक करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**संघातील मुली: १९ वर्षांखालील** : अवनी नवगिरे, जान्हवी खांडवे, वैभवी ठोंबरे, साक्षी निकम, निता साठे व सिध्दी ठोंबरे. **१४ वर्षांखालील** : गिरीजा पालकर, अनुष्का शिंदे, वैष्णवी कांबळे, प्राजल सुर्यवंशी, आदिती काळे.



# आयएमएस, पानगलची विजयी सलामी

### शतक वर्षानिमित्त हॉकीचे सामने

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

हॉकीच्या शतक वर्षानिमित्त सुरू झालेल्या शालेय हॉकी स्पर्धेत आयएमएस व एम.ए. पानगल प्रशालेने विजयी सलामी दिली.

हॉकी या खेळाला १९२५ ते २०२५पर्यंत १०० वर्ष पूर्ण झाले आहेत. यानिमित हॉकी इंडिया व हॉकी महाराष्ट्र अंतर्गत हॉकी सोलापूर असोसिएशनच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित केले होते. यात हॉकी रॅली, सायकल रॅली, हॉकी क्वीझ व हॉकीचे सामने आयोजित केले होते. याचे उद्घाटन खो-खोचे आंतर राष्ट्रीय खेळाडू व माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते झाले.

यावेळी हॉकीचे १०० शतक वर्षे सेलिब्रेशन नियोजन संघटनेचे अध्यक्ष जरार कुरेशी यांनी केले. अजय चाबुकस्वार यांनी आभार मानले.

सलामीच्या सामन्यात इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलने मॉडेल पब्लिक स्कूलचा १-0ने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात एम.ए. पानगल प्रशालेने मॉडेल पब्लिक स्कूलवर १-0 असा विजय मिळविला.

# जिल्हा कबड्डी स्पर्धा १३ नोव्हेंबरपासून

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

कुमार-कुमार आणि मुले व मुलींची जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे होईल. सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्रीराम स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने ही स्पर्धा मॅटवर होईल. मुलांसाठी ७५ किलो (वय २० वर्षांखालील १८.१.२००६ व त्यानंतर जन्मलेले) व मुलींसाठी ६५ किलो (वय २० वर्षांखालील २९.१२.२००५ त्यानंतर जन्मलेले) हे या स्पर्धेसाठी पात्र आहेत. नोंदणी केलेल्या संघाची १३ नोव्हेंबर रोजी स्पर्धेच्या ठिकाणी इंडेक्स वजन घेण्यात येईल. त्याकरिता आधार कार्ड, बोनाफाईड सर्टिफिकेट, शाळेचे निर्गम उतारा, इत्यादी सह संबंधित मंडळाचे खेळाडू वेळेवर उपस्थित राहावे. संपर्क : मरगु जाधव (मो. ९८९०५६११७१), सुवर्णा कांबळे (९८८१६९१७७९), मदनलाल गायकवाड (९८५००३९८८०).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पंढरपूर नगरपालिका विठ्ठल परिवार एकत्रित लढविणार

### भगिरथ भालके : येत्या दोन दिवसांत सहमतीने निर्णय जाहीर करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ नोव्हेंबर -**

येत्या काळातील नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका विठ्ठल परिवारीतील सर्व नेते मंडळीं एकत्रित येवून सर्वांच्या सहमतीने योग्य उमेदवारांची निवड करुन लढविणार असल्याची माहिती विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा विठ्ठल परिवाराचे नेते भगिरथ भालके यांनी दिली.



येथील भालके यांच्या कार्यालयात पंढरपूर नगरपालिका निवडणूकी संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी शुक्रवारी (ता.७) दुपारी विठ्ठल परिवारातील नेते मंडळी,ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजिण्यात आली होती. त्याबैठकी नंतर माध्यमांशी बोलताना श्री.भालके यांनी बैठकी संदर्भात माहिती दिली. श्री.भालके म्हणाले,येत्या काळातील निवडणूकांसाठी विठ्ठल परिवारातील सर्व नेत्यांना आम्ही एकत्रित येण्याची विनंती केलेली होती. त्या पध्दतीने सर्व नेते मंडळींनी सकारात्म कता दाखविलेली आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाला जोडलेली २२ गावे, मोहोळ मतदार संघाला जोडलेली १७ गावांमधील मंडळींची बैठक शुक्रवारी (ता.७) आयोजिण्यात आलेली होती.

दरम्यान उद्या शनिवारी (ता.८) माढा मतदार संघाला जोडलेली आणि सांगोला मतदार संघाला जोडलेल्या पंढरपूर तालुक्यातील प्रमुख गावांमधील प्रमुख पदाधिकारी आणि शहरातील देखील इच्छुक उमेदवार सोडून जे वडिलधारी मंडळी जे भारतनानांपासून विठ्ठल परिवारात खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत अशा प्रमुख मंडळींशी चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर या बाबतीत येत्या दोन दिवसांमध्ये सकारात्मक निर्णय घेतला जाईल अशी माहिती विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भालके यांनी दिली.


**प्रमुख नेतेमंडळींसोबतच आपण असणार**
पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणूकीतील नगराध्यक्षपदाचा उमेदवार तसेच १८ प्रभागातून निवडणूक लढविणारे ३६ उमेदवारांबाबत विठ्ठल परिवारातील प्रमुख नेते मंडळीं जो निर्णय घेतील त्यांच्या बरोबर आपण असणार आहोत असे देखील यावेळी भगिरथ भालके यांनी सांगितले.

**जी चुकीची माणसे आहेत आणि त्या सत्ता कायमस्वरुपी उध्वस्त करणार :** यापूर्वी देखील विठ्ठल परिवारात फुट पाडायची, भांडणे लावायची आणि वेगवेगळ्या सत्ता हस्तगत करावयाच्या हे काही मंडळींचे काम होते. पण त्याला आळा घालण्याचे किंवा त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याची भूमिका भारतनाना भालके यांनी त्या काळात घेतलेली होती. तीच भूमिका आम्ही सगळे विठ्ठल परिवारातील प्रमुख मंडळी एकत्रित येऊन घेऊ असा आपणाला विश्वास आहे. यामध्ये जी चुकीचे माणसे आमच्यामध्ये आहेत, जी आमच्या आमच्यात वेगवेगळ्या भूमिका घेऊन फुट पाडण्याचे काम करीत आहेत अशा मंडळींना आम्ही बाजुला करुन नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर आपले वर्चस्व राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या मंडळींना निश्चितच आम्ही त्यांची जागा दाखवुन देवु असे देखील भालके यांनी सांगितले.

**विठ्ठल परिवारावर प्रेम करणाऱ्या तरुणांना संधी :** या बरोबरच आगामी सर्व निडणूकांमध्ये आम्ही तरुण आणि विठ्ठल परिवारावर मनापासून प्रेम करणाऱ्या विठ्ठल परिवारासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या मंडळींना संधी देणार असल्याचे देखील यावेळी श्री.भालके यांनी सांगितले.

**मंगळवेढ्याबाबत देखील अशीच भूमिका :** पंढरपूर शहर, तालुक्याप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीला सामोरे जाताना मंगळवेढा तालुक्या बाबत देखील आमच्या विठ्ठल परिवाराची सर्वांना बरोबर घेऊन, सर्वांशी विचारविनिमय आणि चर्चा करुनच निर्णय किंवा भूमिका घेण्याची अशाच प्रकारची भूमिका असणार आहे असा देखील खुलासा यावेळी श्री.भालके यांनी केला.

## महत्वाचे...



### पौर्णिमेनिमित्त रेश्मा दिवटेनी रेखाटली भगवान शंकराची रांगोळी

**सांगोला, दि.७ नोव्हेंबर -**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त सांगोला शहरातील अंबिका देवी मंदिर परिसरात एकूण सहा ते सात उत्कृष्ट रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. यामध्ये रेश्मा प्रशांत दिवटे यांनी भगवान शंकराची अत्यंत आकर्षक आणि कलात्मक रांगोळी काढली. भगवान शंकराचे उभे रूप दर्शवणारी ही रांगोळी पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती व या रांगोळीने विशेष लक्ष वेधून घेतले. पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर मंदिरात दिव्यांची सजावट, आरती व भजन कार्यक्रम पार पडले. आकर्षक रांगोळ्यांमुळे अंबिका देवी मंदिराचा परिसर अधिकच मंगलमय झाला होता.



### एक्सेल इंडस्ट्रीजकडून सलगर शाळेस दीड लाखांचे शैक्षणिक साहित्य

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेडकडून अक्कलकोट तालुक्यातील सलगर जि.प. मराठी शाळेस ४ लोखंडी कपाट, २० खुर्च्या, ४ टेबल आणि पुस्तके असे एकूण दीड लाख रुपयांचे साहित्य दिले. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या प्रयत्नांतून VRTI यांच्याकडून शाळेसाठी विविध साहित्य देण्यात आले. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी विशेष प्रयत्न करत एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीकडे ग्रंथालयात आवश्यक असणाऱ्या साहित्याची मागणी केली. याप्रसंगी मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी प्रास्ताविक केले. )कार्यक्रमाप्रसंगी एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेडचे प्रसाद दगडे, प्रसाद भोईर, हर्षदा दगडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा रुपाली म्हेत्रे, सदस्य बसलिंगप्पा भासगी उपस्थित होते. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक हणमंतराव गुंडरगी तसेच महिला शिक्षिका संध्या बशेट्टी, गोदाबाई पाटील, सोनाली भारती, मयुरी फुलारी उपस्थित होते.



### मनोज जरांगे-पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्यावर कारवाई करा

**मंगळवेढा, दि. ७ नोव्हेंबर-**

संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे मागणी करणारे निवेदन मंगळवेढा सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिद्दे यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी सातत्याने लढा देत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. परंतु काही असामाजिक प्रवृत्तीकडुन त्यांच्या जिवीतास धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांमधुन समोर येत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी व जीवे मारण्याचा कट रचणाऱ्या आरोपीं विरूध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. जरांगे पाटील यांच्या सुरक्षेचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक असलेली शासकीय सुरक्षा तात्काळ पुरविण्यात यावी अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे यावेळी मंगळवेढा तालुक्यातील सकल मराठा समाजाचे बांधव उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### पवन फत्तापूरे



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

जोडभावी पेठ येथील पवन कल्याण फत्तापूरे (वय ३४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व चार वर्षाचा मुलगा, आई, काका, काकू, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

### वसंत क्षीरसागर



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

जिल्हा न्यायालयातील सेवानिवृत्त सहाय्यक अधीक्षक वसंत धोंडीबा क्षीरसागर (वय ७६) रा. सोलगी नगर, कुमठा नाका यांचे आज शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजता निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले विवाहित मुलगी सुना व नातवंडे असा परिवार आहे. संतोष क्षीरसागर यांचे ते वडील होत.

### जयशिंग भोसले



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

कै. जयशिंग रमेश भोसले यांचे अल्पशा आजाराने दि. ६ नोव्हेंबर रोजी सायं. सात वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

# सर्व्हर बंद असल्यामुळे ई-केवायसी होईना

### ●मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना; लाडक्या बहीणी वैतागल्या



ज्या महीलांचे पती, वडील व घटस्फोट झाला आहे, यांच्यासाठी या महिलांचा सांभाळ करणाऱ्या नातेवाईकाचे आधार कार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे महिला व बालकल्याण विभागाकडून सांगण्यात आले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सर्व्हर व्यवस्थित सुरू नाही. यामुळे ई केवायसीच होत नाही. यामुळे महिलांमध्ये सध्या भीतीचे वातावरण आहे. यामुळे शासनाने ई केवायसीची मुदत वाढवावी.
**- पूनम भैस, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिलीव शहराध्यक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी कोणत्याही जाचक अटी न ठेवता ही योजनेचा सर्व महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. ही योजना प्रचंड लोकप्रिय ठरली व महायुती सरकारला बहुमताने लाडक्या बहिणींनी सत्तेत आणले. मात्र यामध्ये अनेक शासकीय कर्मचारीवर्ग, पेन्शन धारक, अगदी पुरुष यांनीही लाभ घेणे सुरु केल्यामुळे शासनाने यासाठी ई केवायसी करणे बंधनकारक केले. यासाठी शासनाने दोन महिन्याची मुदत दिली आहे.

ती मुदत १८ नोव्हेंबरला संपत आहे. पण सध्या लाडक्या बहिणीसाठी केवायसी करण्याचा सर्व्हर बंदच आहे यामुळेच सध्या ई केवायसीचे काम पूर्ण पणे थांबले आहे. यामध्ये अनेक महीलांचे व पतीचे आधार कार्ड अपडेट नाही. आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक नाही अश्या प्रकारच्या मोठ्या अडचणींचा महिलांना सध्या सामना करावा लागत आहे.तसेच बऱ्याच महीलांचे पती, वडील मयत झाले आहेत यांनाही ई केवायसी करताना अडचणी येत आहेत. तसेच घटस्फोटित महिलांनाही अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सध्या ई केवायसी करण्याची मुदत संपत आल्यामुळे महीलांची लगभग सुरू झाली आहे. पण सर्व्हर बंद असल्या मुळे महिलांमध्ये सध्या धास्ती वाढली आहे. शासनाने याचा सर्व्हर व्यवस्थित सुरू करावा अशी मागणी लाडक्या बहीणीमधुन होत आहे.

# केंद्रस्तरीय टॅलेंट हंट स्पर्धेत नागणसूर कन्नड मुली शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केंद्रस्तरीय विद्यार्थी गुणवत्ता शोध (टॅलेंट हंट) स्पर्धेत नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेने सर्व सहा विभागात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दरवर्षी केंद्र, तालुका आणि जिल्हा स्तरावर निबंध, वक्तृत्व, कथाकथन, चित्रकला, समूह गीतगायन, लोकनृत्य अशा विविध स्पर्धा होतात. नागणसुर कन्नड मुली शाळेने सांघिक समूह गीतगायन लहान व मोठ्या गटात प्रथम, लोकनृत्य स्पर्धेत लहान गटात प्रथम, तर मोठ्या गटात द्वितीय क्रमांक पटकावला. कथाकथन लहान गटात ईश्वरी धनशेट्टी हि प्रथम आली. चित्रकला लहान गटात प्रांजली शिवमूर्ती हि प्रथम आली. मोठा गट कथाकथन स्पर्धेत अक्षरा कल्याण हि प्रथम तर श्रावणी गंगोंडा हि द्वितीय आली. लहानगट वक्तृत्व स्पर्धेत श्राव्या यळमेली प्रथम आली. लहान गट निबंध स्पर्धेत सविता खिल्लारी हि तृतीय आली. विविध स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी यांची निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना उपशिक्षक राजकुमार खानापुरे, राजकुमार नरूणे, राजशेखर कुर्ले, लक्ष्मीकांत तळवार, शांता तोळनुरे, शोभा कलशेट्टी, शरणप्पा फुलारी आदींचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांना आणि मार्गदर्शक शिक्षकांना गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, केंद्रप्रमुख इरप्पा गजा, केंद्रीय प्रभारी मुख्याध्यापक विजयश्री एंटमन, कन्नड मुली शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक शरणप्पा फुलारी, कल्याणी गंगोंडा, मालकप्पा हिप्परगी, चन्नम्मा बिराजदार, शंकर अजगोंडा, बसवराज खिलारी, रामेश्वर सोलापुरे, शरद गंगोंडा तसेच केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी, सरपंच, उपसरपंच, तंटामुक्त अध्यक्ष सर्व ग्राम पंचायत सदस्य, समस्त ग्रामस्थ,पालक,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर भोसगी, उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी, शिक्षणतज्ञ गुरुबाई प्रचंडे, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी सिद्धेश्वर गंगोंडा आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# वर्धापनदिनानिमित्त एनटीपीसीत पोलीस अधिक्षकांच्या हस्ते ४०० झाडांचे रोपण

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग,दि.७ नोव्हेंबर-**

फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे दि.७ नोव्हेंबर रोजी एनटीपीसीच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात २०० फळझाडे तसेच २०० दुर्मिळ औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमास एनटीपीसी चे मुख्य कार्यकारी निवेदक शास्त्री, एच.आर. मॅनेजर श्री. रेड्डी, इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग, तसेच वळसंग पोलीस ठाणे येथील सपोनी राहुल डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक श्री. कांबळे, होटगी दूरक्षेत्राचे अधिकारी, आणि पोलीस ठाण्याचा कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

सदर वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमामुळे परिसरात हिरवळ वाढण्यास हातभार लागणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला गेला. वृक्ष लावा - पर्यावरण वाचा या संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# करमाळ्यातील ४० गावचा पाणीप्रश्न; ११ नोव्हेंबरला मंत्रालयात बैठक

### रिटेवाडी संघर्ष समितीच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ नोव्हेंबर-**

रिटेवाडी संघर्ष समितीने ४० गावातील सरपंचासह कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यालया समोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्यामुळे पालकमंत्री जयकुमारे गोरे यांच्या पुढाकाराने मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वा. मंत्रालयात जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार, संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



बैठकीसाठी पालकमंत्री गोरे, कार्यकारी संचालक (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ), मुख्य अभियंता (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ), अधिक्षक अभियंता (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) त्याचप्रमाणे विषयाशी संबंधित सर्व मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकारी यांच्यासमवेत बैठक होणार आहे. त्यामुळे रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या कागदरुपी आराखड्याला प्रत्यक्षात सुरुवात होईल असा आशावाद ४०-४५ गावातून व्यक्त केला जात आहे.

करमाळा तालुक्यातील ४०-४५ गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटावा. यासाठी कुकडी प्रकल्पात काही प्रमाणात पाणी राखीव ठेवले गेलेले आहे. परंतू कुकडी जलाशय ते करमाळा तालूका म्हणजे २५०-३०० किमी.वरुन येणारे पाणी फक्त दिवास्वप्नच राहून जात होते. या अनुषंगानेच तालुक्यातील ४०-४५ गावाचे हक्काचे पाणी मिळविण्यासाठी येथील नागरिकांना आंदोलने, निवेदने तसेच विविध मंत्री, अधिकारी यांना भेटून, आमचे हक्काचे पाणी आम्हाला योग्य प्रकारे मिळावे. यासाठी मंत्रालयीन पातळीवरून एखादी बैठक झाल्यास, व अधिकाऱ्यांना देखील तसे सुचित केल्यास सदरच्या ४०-४५ गावांचा पाण्याचा मिटेल. अशा प्रकारची आशा दिसत होती. यामुळे पालकमंत्री, मुख्यमंत्री, शासकीय वरिष्ठ अधिकारी यांच्या सततच्या भेटी घेऊन, रिटेवाडी संघर्ष समितीने पाठपुरावा केला. यामध्ये अनेक वेळा बैठका आयोजित केल्या गेल्या. व काही कारणास्तव रद्द देखील झाल्या. त्यामुळे समितीने २७ ऑक्टेबरला ४० गावातील सरपंचासह कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे येथील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. परंतू पालकमंत्री गोरे यांनी २३ ऑक्टोबर रोजी समितीच्या सदस्यांना बोलावून, संबंधित विभाग आणि मंत्र्यांची बैठक आयोजित करण्याबाबत आश्वासित केले होते. सदरच्या उपोषणाच्या निवेदनाची सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तातडीने दखल घेऊन, मंत्री विखे-पाटील यांच्या समवेत बैठक आयोजित केली आहे.

# जिल्ह्यात आतापर्यंत २७ टक्के रब्बी पेरणी

### पावसाने उघडीप दिल्याने बळीराजाकडून पेरणीचा धडाका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील सर्वच मंडलातील खरिपाची पिके अतिवृष्टी, महापुरामुळे वाहून गेली आहेत. काही जणांना ॲग्रीस्टॅकमुळे शासनाकडून मिळणारी नुकसानीची मदतही मिळाली नसल्यामुळे शेतकरीवर्ग प्रचंड अडचणीत आला आहे. तरीही हे संकट बाजूला सारून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी हंगामातील पेरणीचा श्रीगणेशा केला आहे.

दरम्यान, थंडीच्या महिन्यातही रोजच पाऊस पडत असल्याने जमिनीच्या वापस्याअभावी आजतागायत जिल्ह्यात अवघी २७ टक्केपर्यंतच पेरणी झाली असून, नोव्हेंबरमध्ये पाऊस थांबला तरच पेरणीचे हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. इतकेच नाहीतर ज्वारी पेरणीस विलंब झाल्याने यंदा गहू, हरभरा, ऊस आणि मका पेरणीचा टक्का वाढण्याची शक्यता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. ७) व्यक्त केली. दरवर्षी जिल्ह्यात सरासरी तीन ते साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील पिकांची पेरणी होत असते. यंदा हे क्षेत्र वाढण्याची शक्यता कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. या महिन्यात तशी तर कडाक्याची थंडी पडत असते; मात्र यंदा अजूनही पाऊस पडू लागल्याने आणि आभाळ येत असल्याने थंडीची चाहूलही तशी लागेना झाली आहे. सतत पाऊसधारा कोसळत असल्यामुळे वापस्याअभावी पेरणी लांबत आहे. इतकेच नाहीतर काही ठिकाणी जास्त पाऊस झाल्याने दुबार पेरणीचे संकटही शेतकऱ्यांवर आले आहे. रब्बी हंगामात गहू, ज्वारी, मका ही महत्वाची पिके आहेत. खरीप पेरणी वाया गेल्याने रब्बी क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता जास्त आहे. गतवर्षी रब्बी हंगामात विविध पिकांची पेरणी सरासरी ३.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली होती. यंदा मात्र आजतागायत १.१९ लाख हेक्टरवर रब्बी पेरणी झाली आहे. मात्र आता पाऊस थांबण्याची गरज आहे. अतिवृष्टी, महापुरामुळे शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अजूनही जिल्ह्यातील शेतशिवारामध्ये पाणी साठले आहे. रब्बी पेरणी जरी सुरु झाली असली तरी देखील परतीचा पाऊस अजूनही बरसत आहे. यंदा गहू, हरभरा आणि ऊस पिकांत मोठी वाढ होणार आहे.



**तालुकानिहाय अशी झाली रब्बीची पेरणी :** उत्तर सोलापूर तालुक्यात ७ हजार ८२८ हेक्टरवर पेरणी झाली असून, ही पेरणी ३५ टक्के आहे. तर दक्षिण सोलापूर ६४३१-१८.९७, बार्शी १५५५८-२२.१३, अक्कलकोट १४०१६-२२.८४, मोहोळ ९४०४-२६.०५, माढा १०४०३-२४.४६, करमाळा ८२१९-१७.६९, पंढरपूर ३०४८-२३.०६, सांगोला १६२४१.४- ३४.८४, माळशिरस ८३०२-३७.६८, मंगळवेढा १९९४४-४१.१७ तर जिल्ह्यात सरासरी ४ लाख ४३ हजार ०९७ हेक्टरपैकी १ लाख १९ हजार ३९४ हेक्टरवर रब्बी पेरणी झाली आहे. तर उसाची नवीन लागवड ४४ हजार ६२० हेक्टरवर झाली आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून निवडणूक समिती जाहीर

### जिल्हा निवड समितीत अनेक दिग्गजांचा समावेश

**अकलूज, दि. ७ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जोरदार तयारी केली जात असून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच पक्षाकडून जिल्हा निवडणूक समिती जाहीर करण्यात आली आहे.माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेते मंडळींचा या निवड समितीत समावेश असून या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रविंद्र पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सरचिटणीस रवींद्र पवार यांनी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांना नुकतेच या जिल्हा निवडणूक समितीचे पत्र पाठवले असून यामध्ये राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, आ.अभिजीत पाटील, आ.उत्तमराव जानकर, आ. राजू खरे, आ.नारायण आबा पाटील, माजी आ. लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार रमेश कदम, शेखर माने, अनिल सावंत, विश्वासराव बारबोले, बाबुराव गायकवाड, सूरज देशमुख, विनंती कुलकर्णी, सुवर्णाताई शिवपुरे, धनंजय साठे, अरुण तोडकर, बाळासाहेब खान यांची जिल्हा निवडणूक समिती म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांसाठी या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे असे यावेळी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी सांगितले.


# सामूहिक 'वंदे मातरम'ने चेतविले राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग

- आई प्रतिष्ठानतर्फे साकारला भारताचा मानवी नकाशा
- पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आई प्रतिष्ठान आणि दयानंद शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी दोन हजार विद्यार्थिनींनी सामूहिक वंदे मातरम गायन केले. यावेळी दोन हजार विद्यार्थिनींनी दीड एकर जागेत भारताचा मानवी नकाशा साकारला. राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थित राहून 'वंदे मातरम' चे गायन करीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

दयानंद महाविद्यालयाच्या दीड एकर मैदानावर आई प्रतिष्ठानतर्फे भारताचा १५० बाय १०० फुटांचा मानवी नकाशा साकारण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते व्याहारती होम करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष रोहिणी तळवळकर, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस वरेरकर, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य ॲड. सुनंदा भगत, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य बी. एच. दामजी आदी उपस्थित होते. कलाकार विपुल मिरजकर यांनी दोरीच्या साह्याने भारताचा मानवी नकाशा साकारला. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, वंदे मातरम हे गीत भारतातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देणारे गीत आहे. देश प्रेमाची धगधगती ऊर्जा १५० वर्षांनंतरही या गीतातून आजही मिळते. १८७५ साली बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत स्वातंत्र्ययुद्धाचे राष्ट्रगान बनले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमातून वंदे मातरम या गीताच्या वैभवशाली वारशाची आठवण देशाला करून दिली. २०४७ साली भारतीयांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या जडणघडणीत वंदे मातरम हे गीत महत्त्वाचे ठरणार आहे, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे याप्रसंगी म्हणाले. आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मीनाक्षी म्हेत्रे यांनी सूत्रसंचालन तर प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी योगेश डांगरे, राहुल डांगरे, विठ्ठल बडगंची, पंचाक्षरी स्वामी, शुभम चिट्याल, अविनाश शंकु, सचिन लवटे , नागनाथ कोळेकर, संजय कोळेकर, समर्थ चिलवेरी, लक्ष्मीकांत येलदी, अंबादास पोगुल, उमेश चिट्याल, व्यंकटेश बंडा आदी उपस्थित होते.



**भारतमातांनी वेधले लक्ष :** विविध शाळा, महाविद्यालयातील पाच विद्यार्थिनींनी भारतमातेचा वेश परिधान करून, हाती मोठा तिरंगा घेऊन या उपक्रमात हजेरी लावली. भारताच्या मानवी नकाशाच्या मधोमध मोठ्या आकाराच्या कापडी राष्ट्रध्वजासोबत उभे राहून या विद्यार्थिनींनी भारतमातेला वंदन केले.

---

यंदा वाचनालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त...

## भावी पिढीसाठी 'अत्याधुनिक अभ्यासिका' उभारणार

### पूर्व विभाग वाचनालयाचे अध्यक्ष दिड्डी यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०७ नोव्हेंबर-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाची स्थापना १९७५ मध्ये झाली. पहिले अध्यक्ष राजाराम पंत कुचन यानंतर माणिक गुर्रम, माजी महापौर जनार्दन कारमपुरी, अंबादास पद्मा, माजी महापौर प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल, पांडुरंग दिड्डी, लक्ष्मीनारायण कुचन, माणिक सारंगी, नारायण पुजारी, रामलू मच्छद, यल्लप्पा येलदी, दत्तात्रय कारमपुरी, शैला अन्नलदास आदी अध्यक्षांच्या देखरेखीखाली पूर्व भागातील वाचनालयाचा आतापर्यंतचा प्रवास यशस्वीपणे चालू आहे. दरम्यान, यंदाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने सोलापुरातील युवा पिढीसाठी अत्याधुनिक अभ्यासिका उभारणार असल्याचे वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांनी दैनिक तरुण भारतशी बोलतना सांगितले.

आतापर्यंतच्या प्रत्येक अध्यक्षांच्या कार्यकाळामध्ये वाचनालयाने भरीव कामगिरी करून सोलापूरकरांसाठी योगदान दिलेले आहे. गंगाधरपंत कुचन, इरणप्पा बोल्ली, सत्यनारायण बोल्ली, जनार्दन कारमपुरी या सर्वांच्या पुढाकाराने नवीन आणि स्वतंत्र इमारतीची पायाभरणी १९१२ साली झाली होती. वाचनालयाच्या स्थापनेवेळी मद्दा मंगल कार्यालयाच्या छोट्याशा




खोलीत त्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. परंतु त्याचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आपल्याला दिसतंय. त्यानंतर महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार १९९२ मध्ये प्राप्त झाला. वाचनालयातर्फे वर्षभरामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जातात. छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी राजभाषा गौरव दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे जयंती, मराठी भाषा पंधरवडासह महत्त्वाचे तसेच शाळेतील लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, गंगोळी स्पर्धा आदी उपक्रमही सातत्याने राबविले जातात.उन्हाळ्यातील सुट्टीमध्ये सर्व वयोगटातील वाचकांसाठी तेलुगु भाषा प्रशिक्षण देखील घेतले जाते. दहावी आणि बारावी वर्गातील यशस्वी विद्यार्थी तसेच इतर विभागातील व विविध क्षेत्रातील मान्यवरांचे देखील सत्कार समारंभ वाचनालयातर्फे केले जातात. गेल्या ५० वर्षांपासून या मंडळींनी सोलापुरातील वाचकांची सोय केली आहे. आजतागायत ३५ हजार ग्रंथसंपदा या वाचनालयात आहे.

#### सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम होणार



येथील तेलुगू भाषिकांकडून गेल्या ५० वर्षांपासून पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यशस्वीपणे सुरू आहे. दर पाच वर्षाला अध्यक्षपद आणि कार्यकारिणीची निवड होते. ही निवडही सर्वानुमते होते. मोबाईल आल्याने आणि कोरोना काळात वाचकवर्ग कमी झाला होता; मात्र आता वाचक वाढत आहे. भविष्यातही युवा पिढीला पुस्तकाची आवड निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. इतकेच नाहीतर येथील विणकर बागेत येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी फिरते वाचनालय आम्ही चालविणार आहोत. या बागेत आलेल्या लोकांना मोफत पुस्तके वाचण्यासाठी देवून ती पुस्तके बागेतून घरी जाताना त्यांच्याकडून जमा करून घेण्यात येणार आहे. या उपक्रमालाही प्रतिसाद मिळेल असे वाटते.

**- पांडुरंग दिड्डी, अध्यक्ष, पूर्व विभाग वाचनालय, सोलापूर**

---

## कर्तृत्वाशिवाय मनुष्यावर भगवंताची कृपा अशक्य

**ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर : विकास सहकारी बँकेच्या 'वाग्यज्ञ' चा भक्तिमय वातावरणात समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

कर्तृत्व हे केवळ स्वीकारातून नव्हे तर त्यागाने सिद्ध होते. कर्तृत्वाशिवाय मनुष्यावर भगवंताची कृपा होणे अशक्य आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. विकास सहकारी बँकेतर्फे हेरिटेज लॉन्स येथे आयोजित तीन दिवसीय 'वाग्यज्ञ' च्या तिसऱ्या आणि अखेरच्या दिवशी शुक्रवारी ह.भ.प. देगलूरकर महाराजांनी मार्गदर्शन केले.

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर 'म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु (कर्तुत्व आणि कृपा) या श्री ज्ञानेश्वरीतील १८ व्या अध्यायातील ओवीवर प्रवचन केले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील कर्तृत्व आणि त्यावर असलेल्या भगवंताच्या कृपेचे अवलंबित्व यावर विवरण केले.

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, विचारांनी परिपक्व असणारा व्यक्ती भगवंताला अपेक्षित असतो. अंतःकरणाची अस्थिरता हे जीवदशेचे लक्षण आहे. तर वृत्तीची स्थिरता ही जीवनाला ज्ञानाचे अधिष्ठान



असल्याचे लक्षण आहे. मनुष्याला कर्माचा त्याग करता येत नाही. मनुष्याचे कर्तृत्व आहे पण त्याच्यावर भगवंताची कृपा झाली नाही असे मनुष्याला अनेकदा वाटते. परंतु भगवंताने सुनियोजित केलेल्यावेळी त्या मनुष्यावर परमात्म्याची कृपा होतेच.

मात्र ज्या व्यक्तीवर भगवंताची कृपा झाली आहे, त्याचे कोणतेही कर्तृत्व नाही ही बाब अशक्य आहे, असेही ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी सांगितले.

ज्याप्रमाणे पाऊस नाही आला तर समुद्र आटत नाही आणि पाऊस जास्त पडला तरी समुद्राला पूर येत नाही. कारण तो व्यापक आहे. भगवंतदेखील याचप्रमाणे व्यापक आहे. परिश्रम शब्द हा कर्तृत्वाचा वाचक आहे. कोणत्याही क्षेत्रात नैपुण्यासाठी परिश्रम आणि अभ्यासाशिवाय पर्याय नाही. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी मनुष्यावर नैतिक, धार्मिक आणि मनुष्यत्वाची बंधने असतात, असेही ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले.

विकास सहकारी बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष जेष्ठ संचालक सी. ए. राजगोपाल मणियार यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विकास सहकारी बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी, उपाध्यक्ष राजगोपाल चंडक, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार, हरीनिवास जाजू, पांडुरंग मंत्री, मनीष बलदवा, ज्योती आसावा, प्रवीण बजाज, सुनील माहेश्वरी आदी उपस्थित होते. संजीव कुसुरकर यांनी सूत्रसंचालन केले. शेवटच्या दिवशी ही सोलापूरकरांनी 'वाग्यज्ञ' ला मोठी गर्दी केली होती.

---



## 'उमेद' च्या रुक्मिणी मॉलचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्हा उमेद स्वयंसहाय्यता गट उत्पादनांचे पॅकेजिंग व ब्रॅण्डिंग करणाऱ्या रुक्मिणी मिनी शॉपिंग मॉल व उपहारगृहाचे सोलापूर येथे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत लोकार्पण झाले.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह इतर मान्यवर व उमेद स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला- भगिनी आणि नागरिक उपस्थित होते. महिला बचत गटांच्या हातातून तयार होणाऱ्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हे या मिनी शॉपिंग मॉलचे उद्दिष्ट आहे. यातून त्यांच्या परिश्रमाला योग्य सन्मान मिळेल आणि त्यांची आर्थिक उन्नती होईल अशी अपेक्षा गोरे यांनी व्यक्त केली. या रुक्मिणी शॉपिंग मॉल व उपहारगृहात महिलांनी हाताने बनवलेले फराळाचे पदार्थ, सुकामेवा विविध प्रकारचे मसाले, याशिवाय,खवय्यांसाठी जेवण सुद्धा उपलब्ध आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात मोठे उमेद मॉल उभे करण्याचा संकल्प केला आहे.

---

## संकर्षण व्हाया स्पृहा गप्पा, गोष्टी आणि कवितांचा अनोखा संगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

प्रिसिजन गप्पा २०२५ या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी ''संकर्षण व्हाया स्पृहा...!'' या बहारदार कार्यक्रमाने रंगतदार प्रारंभ झाला. सोलापूरच्या रंगभवन सभागृहात सादर झालेल्या या कार्यक्रमात अभिनेता संकर्षण कऱ्हाडे आणि कवयित्री-अभिनेत्री स्पृहा जोशी यांच्या प्रभावी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजनचे चेअरमन यतीन शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा आणि करण शहा यांच्या हस्ते कलाकारांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे हे सहपरिवार उपस्थित होते.

''वडील, आई, लहानपण आणि भाषेची गोडी'' या विषयांवर आधारित कविता, गप्पा, गाणी आणि गोष्टी यांच्या माध्यमातून दोघांनी जीवनातील कोमल भावविश्व रंगवले. भावकविता,




बालस्मृती आणि भाषेचे माधुर्य यांचा मिलाफ या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला.

विशेष म्हणजे, स्पृहा जोशी यांनी लहान मुलीच्या आवाजात सादर केलेले ''सुंदर चॉकलेटचा बंगला'' हे गाणे प्रेक्षकांच्या मनाला भिडले. संकर्षण कऱ्हाडे यांच्या विनोदी व भावस्पर्शी शैलीने सभागृहात हास्य आणि भावनांचे रंग एकत्र खुलले. सुरुवातीला गेल्या १७ वर्षांपासून रंगभवन सभागृहाची स्वच्छता कार्यक्रमापूर्वी आयोजकांकडून केली जाते, याविषयीची लघुफिल्म दाखवण्यात आली. यावेळी सोलापूरकरांना आवाहन करण्यात आले की ''नुसता कार्यक्रम नव्हे, स्वच्छ कार्यक्रम व्हावा, ही आपली संस्कृती व्हावी यासाठी सर्वांनी जबाबदारी घ्यावी.'' प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सभागृहच नव्हे तर सभागृहाच्या बाहेरही रसिकांची प्रचंड गर्दी जमलेली होती. भाषेची गोडी, भावनांचा ओलावा आणि सामाजिक संदेश यांचा अनोखा संगम या कार्यक्रमातून दिसून आला.

---

## फेसबुकवरील 'स्पष्ट वक्ता' अकाउंटवरून समाजविरोधी वक्तव्ये

### पद्मशाली युवक संघटनेचा संताप; पोलिस आयुक्तांकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

गेल्या काही दिवसांपासून फेसबुकवर 'स्पष्टवक्ता' या नावाने चालविल्या जाणाऱ्या अकाउंटवरून पद्मशाली समाजाबाबत अपमानास्पद, दिशाभूल करणारी आणि समाजात मतभेद निर्माण करणारी वक्तव्ये व कमेंट्स करण्यात येत आहेत. या प्रकारा मुळे समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



या संदर्भात अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघ आणि पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने सोलापूर शहराचे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघाचे अध्यक्ष श्रीनिवास संगा, प्रेसिडेंट नागेश बोमड्याल, उपाध्यक्ष प्रविण जिल्ला, प्रसिद्धी प्रमुख पवन गुंडेटी, ॲड. शाम आडम, माजी अध्यक्ष साईराम बिर्रू, अमर बोडा, संतोष चन्ना पंतुलु उपस्थित होते.

संगा म्हणाले, 'स्पष्टवक्ता' या सोशल मिडीया अकाउंटवरून करण्यात येणाऱ्या पोस्ट आणि कमेंट्स समाजात तणाव निर्माण करणाऱ्या आहेत. या माध्यमातून पद्मशाली समाजाची हेतुपुरस्सर बदनामी केली जात असून, समाजातील ऐक्य आणि शांततेला बाधा पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे अशा समाजकंटकांविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी. जर या प्रकरणी त्वरीत आणि ठोस कारवाई झाली नाही, तर 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात येईल.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आठ विद्यार्थ्यांची बी.यू. भंडारी एनर्जी प्रा. लि. मध्ये निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ नोव्हेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांची पुणे येथील नामांकित बी.यू. भंडारी एनर्जी प्रा. लि. या कंपनीम ध्ये निवड झाली आहे. हे विद्यार्थी डिझाईन इंजिनियर आणि प्रोजेक्ट इंजिनियर पदांवर कार्यरत राहणार आहेत.



मेकॅनिकल विभागातून अक्षय गांजे, योगिता शिंदे, अविराज देशमुख; इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागातून आशिष थोरात, मुसा शेख, श्रुती वाघे; तर सिव्हिल विभागातून केतन जाधव आणि ऋतुराज पाटील यांची निवड झाली.

या कॅम्पस ड्राइव्हसाठी कंपनीचे प्रतिनिधी लक्ष्मण कानडे, मुकेश बिराजदार, अनिता सरतापे व प्रज्ञा मापारी उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन प्रा. अशोक जगताप, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, प्रा. रणजित दंडनाईक, दिग्विजय गायकवाड, प्रा. सरवदे आणि रामेश्वर मुंढे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...



### निशा लांडघुले व बालाजी भांडवलकर यांचा राज्यस्तरीय यशाने गौरव

**परंडा, दि.७ नोव्हेंबर -**

लातूर येथे झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत जय हनुमान माध्यमिक विद्यालय, वाटेफळ (ता.परंडा) येथील कुमारी निशा संतोष लांडघुले हिने १९ वर्षाखालील गटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत विभागात द्वितीय व जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच हिमाचल प्रदेश येथे पार पडलेल्या किक बॉक्सिंग स्पर्धेत ७५ किलो वजन गटात बालाजी आप्पासाहेब भांडवलकर याने प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या दोघांच्या यशाबद्दल भाजपा नेते आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी भाजपा संपर्क कार्यालयात सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जि.प.च्या माजी महिला व बालकल्याण सभापती सखु पवार, रमेश पवार, आप्पासाहेब भांडवलकर, बळीराम भांडवलकर, सहदेव भांडवलकर, नाना भांडवलकर, रामभाऊ गिरवले, गहिनीनाथ भांडवलकर आदी मान्यवर उपस्थित होते.




### तुळजापूर खुर्द येथे विद्यार्थी दिन उत्साहात साजरा

**तुळजापूर, दि.७ नोव्हेंबर -**

तुळजापूर खुर्द येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.३ मध्ये विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये प्रवेश घेतल्याच्या स्मरणार्थ हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमाला शिक्षणतज्ज्ञ भगवान सुरवसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भगवान सुरवसे, मुख्याध्यापक तुकाराम मोटे व शिक्षण विभाग प्रमुख अशोक शेंडगे यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी 'वंदे मातरम' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हे गीत सामूहिकरित्या गायले गेले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री संत महादेव कासार यांच्या पुण्यतिथीचे आयोजन

**तुळजापूर, दि.७ नोव्हेंबर -**

भागवत धर्माची पहिली पताका फडकवणारे संत श्री महादेव कासार यांच्या पुण्यतिथीचा सोहळा तुळजापूर येथे मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. दि. १० नोव्हेंबर (कार्तिक कृ. ६) रोजी जिजामाता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हा कार्यक्रम होणार आहे. सोहळ्याची सुरुवात सकाळी ९ वाजता संत महादेव कासार यांच्या प्रतिमेच्या पूजनाने होईल. त्यानंतर कीर्तन, प्रवचन, आरती आणि प्रसाद वितरण असे कार्यक्रम होणार आहेत. या धार्मिक कार्यक्रमासाठी सो.क्ष. कासार समाज, इस्कॉन धाराशीव, माऊली महिला भजनी मंडळ आणि हरे कृष्ण भक्त तुळजापूर यांनी संयुक्तपणे पुढाकार घेतला आहे.



### शुभम क्षीरसागरची महाराष्ट्र अंडर -१९ व्हॉलीबॉल संघात निवड

**इटकळ, दि.७ नोव्हेंबर -**

आलुर येथील शुभम क्षीरसागर याची उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र अंडर-१९ व्हॉलीबॉल संघात निवड झाली आहे. राज्यातील विविध संघांविरुद्ध त्याला खेळण्याची संधी मिळणार आहे. गेल्या सहा वर्षांपासून आलुर येथे भरविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धांमुळे नव्या खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळाले आहे. सरावासाठी पौष ग्रो सर्व्हिसेसचे अविनाश आणि विकास मुळजे, तसेच बसवराज मुनाळे व बाबा जेवळे यांनी मैदान व सुविधा उपलब्ध करून दिल्या. शुभमने सांगितले की, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असो.चे उपाध्यक्ष दादा देशमुख यांच्या मार्गदर्शनामुळे त्याला ही संधी मिळाली.



### अल्पवयीन मुलगा फुस लावून पळविला; अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

**भूम, दि.७ नोव्हेंबर -**

आदित्य गोपीचंद दराडे यास अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी भुम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गोपीचंद दराडे (वय ३५) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.५ नोव्हेंबर सायं. सुमारे ६ वा. त्यांचा म लगा शेतातील गोट्यावर असताना अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी त्यास फुस लावून नेले. या तक्रारीवरून भुम पोलीसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# २०२४ चे अतिवृष्टी अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर न आल्यास १७ नोव्हेंबरला आष्टा मोड येथे महामार्ग अडवणार

**आमदार प्रवीण स्वामी व शेतकरी नेते अनिल जगताप यांचा इशारा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ नोव्हेंबर -**

लोहारा व उमरगा तालुक्यातील तब्बल ४४ हजार शेतकऱ्यांचे २०२४ मधील अतिवृष्टी अनुदानाचे पैसे अद्याप खात्यावर जमा झाले नसल्याने आज लोहारा तहसील कार्यालयासमोर आमदार प्रवीण स्वामी व शेतकरी नेते अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.

राज्य शासनाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार ७९,८८० शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख ३४ हजार रुपये मंजूर केले होते. मात्र, शासन निर्णयाला तीन महिने उलटूनही जवळपास ४४ हजार शेतकऱ्यांचे पैसे प्रलंबित आहेत. शासनाने १ ऑक्टोबरपासून घधउ पोर्टल बंद केल्याने 'ग्री-स्टिक'द्वारे पैसे पडणार की नव्याने घधउ करावी लागणार, याबाबत स्पष्टता नसल्याने शेतकरी संभ्रमात असून हतबल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर आंदोलनादरम्यान आमदार प्रवीण स्वामी व अनिल जगताप यांनी १६ नोव्हेंबरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा न झाल्यास १७ नोव्हेंबर रोजी आष्टा मोड (ता. लोहारा) येथे राष्ट्रीय महामार्ग अडवण्याची घोषणा केली.

अनिल जगताप यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने लढा दिला असून त्यांच्या प्रयत्नांतूनच या अनुदानाची मंजुरी मिळाली होती. त्यामुळे शेतकरी वर्गाकडून त्यांच्याबद्दल समाधान व कौतुक व्यक्त करण्यात आले.

या धरणे आंदोलनात आमदार प्रवीण स्वामी, शेतकरी नेते अनिल जगताप, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष अमोल बिराजदार, काँग्रेस शहराध्यक्ष सवार साहेब, स्वराज पक्षाचे महेश गोरे, संभाजी ब्रिगेडचे बालाजी यादव, शिवसेना शहराध्यक्ष सलीम शेख, महबूब गवंडी, संजय लोभे, सुजित मुळे, गणेश फत्तेपुरे, राहुल निम्बर्गी, सोमनाथ भोंडवे, निशिकांत गोरे, महेश लोभे तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



## केंद्रीय प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांची नळदुर्ग नगर परिषदेला भेट



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ नोव्हेंबर -**

केंद्रीय प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या पथकाने नळदुर्ग नगरपरिषदेला भेट देऊन नगरपरिषदेच्या विविध उपक्रमांची पाहणी केली. या पथकाने घनकचरा व्यवस्थापन केंद्र, वृक्षारोपण स्थळ व इंदिरानगर (झोपडपट्टी) भागाची पाहणी करून नगरपरिषदेच्या कामकाजाची माहिती मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांच्याकडून घेतली.

या पथकामध्ये ग्रुप प्रमुख अधिकारी शाहनवाज अली, भारतीय रेल्वे व्यवस्थापन सेवा अधिकारी सतीश मिना, सुर्यवंशी गुप्ता, स्नेहा राव, प्रियंका दुर गोपाल, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक अधिकारी आहान सिस्टम, आयपीएस प्रज्ञा ठाकुर, आयपीटीएएफ एस. शिवम कुमार व जेना माझी यांचा समावेश होता.

पथकाने नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यालाही भेट देऊन विविध प्रेक्षणीय स्थळांची पाहणी केली. यावेळी नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक खलील शेख, प्रकल्प अधिकारी सुरज गायकवाड, दस्तगीर जागीरदार, विकास बनसोडे, विकास कांबळे व प्रेम राठोड आदी उपस्थित होते.

## संकटात मैत्रीचा हात : वर्गमित्रांनी कॅन्सरग्रस्त मित्रासाठी केली मदत

**आबासाहेब आखाडे यांच्या उपचारासाठी वर्गमित्रांनी जमा केला ७२ हजार ५०० रुपयांचा निधी**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ नोव्हेंबर -**

मानवीतेचा आणि मैत्रीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारी हृदयस्पर्शी घटना धाराशिव जिल्ह्यातील पारगाव येथे घडली आहे. गावातील आबासाहेब पांडुरंग आखाडे या कॅन्सरग्रस्त तरुणाच्या उपचारासाठी त्यांच्या शालेय वर्गमित्र-मैत्रिणींनी एकत्र येत तब्बल ७२ हजार ५०० रूपयांचा निधी जमा करून म दतीचा हात पुढे केला आहे.



आबासाहेब आखाडे यांनी पारगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत चौथीपर्यंत आणि महात्मा फुले विद्यालयात दहावीपर्यंत शिक्षण घेतले.

शिक्षणानंतर त्यांनी तुटपुंज्या शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू ठेवला. सध्या त्यांच्या घरी पत्नी, दोन मुले आणि वृद्ध आई-वडील असून घराची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाकीची आहे.

त्यातच कॅन्सरसारखा गंभीर आजार ओढवून कुटुंबावर संकट कोसळले.

ही बाब समजताच २०००-२००१ च्या दहावीच्या बॅचम धील वर्गमित्र एकत्र आले. आपल्या मित्राला संकटात एकटे सोडायचे नाही, या भावनेतून सोशल मीडियाच्या माध्यमातून निधी संकलन मोहीम राबवली. अल्पावधीतच ७२ हजार ५०० रूपयांचा निधी जमा करून तो निधी आबासाहेब यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्त करण्यात आला.

या बॅचने यापूर्वी २४ मे २०२५ रोजी २५ वर्षांनंतर स्नेहसंमेलन आयोजित केले होते. त्यावेळीच सर्वांनी एकमेकांच्या अडचणीला धावून जाण्याचा निर्धार केला होता.

आबासाहेब आखाडे यांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. काही दिवसांनंतर त्यांच्या आजाराचे निदान झाले आणि मित्रमंडळी तत्काळ म दतीसाठी पुढे आली.

वर्गमित्रांच्या या संवेदनशील उपक्रमाचे पारगाव परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, मैत्री ही फक्त शालेय आठवण नसून संकटात साथ देणारे अमूल्य बंधन आहे, असा प्रेरणादायी संदेश या घटनेतून मिळत आहे.

## एकलव्य विद्या संकुलाच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र शासन क्रीडा विभागाच्या वतीने लातूर विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी मंगरूळ येथील खेळाडूंनी उत्तम कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दोन स्पर्धकांची निवड झाली.

१४ वर्षे वयोगट ६०० मीटर मध्ये विश्वजीत जाधव याने प्रथम क्रमांक मिळवला तर १७ वर्षे वयोगट ४०० मीटर हर्डल्स मध्ये शिवराज म रिआईवाले प्रथम क्रमांक आला. विश्वजीत जाधव व शिवराज मरीआईवाले या दोन्ही खेळाडू डेरवण ता. चिपळुण रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जाणार आहेत.

यशस्वी खेळाडू व क्रीडा प्रशिक्षक माऊली भुतेकर, यशवंत निंबाळकर यांचे भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवराव काळे, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचित, सदस्य अभय कुलकर्णी, अशोक संकलेच्या ॲड. प्रदीपसिंह राजपूत, ॲड. जनक कदम पाटील, डॉ. प्रणिता गडेकर, कोषाध्यक्ष नरेशजी पोटे, राजाभाऊ गिजरे, गोविंद सोमाण, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, क्रीडा विभाग प्रमुख बालाजी क्षीरसागर यांनी तसेच सर्व कर्मचारी वृदांनी अभिनंदन केले.

## महेश मोकाशे यांना 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील रहिवासी (ता. तुळजापूर) येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले महेश मोकाशे यांना यावर्षीचा 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्कार जि.प. धाराशिव यांच्या वतीने जाहीर झाला आहे.



ग्रा.पं.च्या कामकाजात पारदर्शकता, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न तसेच शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान त्यांना जाहीर करण्यात आला आहे.


या पुरस्काराबद्दल अणदूर तसेच दहीटणा परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून खडकाळी मॉर्निंग क्लब, जयमल्हार पत्रकार संघ व ८-फार्मा ग्रुप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामसेवक म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उमरगा : स्थानिक स्वराज्य निवडणुकीचा बिगुल, राजकीय हालचालींना वेग

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.७ नोव्हेंबर -**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजताच उमरगा शहरासह संपूर्ण तालुक्यात राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणुकीची धाम धूम सुरू होताच विविध पक्षांत उमेदवारी निश्चितीसाठी हालचालींना चांगलाच वेग आला असून, पडद्यामागील घडामोडींनी वेग घेतला आहे.







महायुती होणार का, की प्रत्येक पक्ष स्वतंत्रपणे रिंगणात उतरणार, याबाबत सध्या तरी अनिश्चितता कायम आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि इतर घटक पक्ष यांच्यातील चर्चेची पातळी उच्चांकी टप्प्यावर पोहोचली असून, सूत्रांच्या माहितीनुसार काही ठिकाणी वाटाघाटी निर्णायक अवस्थेत आहेत. मात्र अद्यापही कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. दुसरीकडे, महाविकास आघाडीतही अंतर्गत मतभेदाचे सूर उमटू लागले आहेत. काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटातील स्थानिक पातळीवरील नेत्यांमध्ये उमेदवार ठरविण्यावरून मतभेद असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आघाडीमध्ये बिघाडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व राजकीय घडामोडीमुळे उमरगा परिसरातील राजकारण तापले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी संभाव्य उम दवारांच्या चर्चेलाही उधाण आले आहे. भाजपकडून हर्षवर्धन चालुक्य पाटील आणि डॉ. कपिल महाजन यांची नावे चर्चेत आहेत. काँग्रेसकडून अश्लेष मोरे यांचे नाव पुढे असून, त्याचबरोबर डॉ. उदय मोरे यांच्या नावाची देखील जोरदार शिफारस करण्यात आली असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. तर शिवसेना (शिंदे गट) कडून किरण गायकवाड यांच्या नावाची चर्चा रंगली आहे. पक्षांतर्गत गटबाजी आणि नेतृत्व संघर्ष यामुळे उमेदवार निश्चितीवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोणाला अंतिम संधी मिळणार, कोणाला गच्च बसवले जाणार, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. दरम्यान, सर्वच पक्षांमध्ये उमेदवारांची नावं ठरविण्यासाठी अंतर्गत खलबत्ते सुरू आहेत. स्थानिक पातळीवरील नेत्यांमध्ये एकीकडे गाठीभेटी वाढल्या असताना, दुसरीकडे गुप्त बैठकांच्या मालिकाही सुरू झाल्या आहेत. येत्या काही दिवसांत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

काही नेत्यांनी नगरसेवक पदासाठी उमेदवारीची तयारी सुरू केली असून, स्थानिक कार्यकर्त्यांच्या बैठका आणि गुप्त सल्लामसलती सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, अर्ज भरण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपासून सुरू होईल. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १७ नोव्हेंबर आहे. अर्ज छाननी १८ नोव्हेंबर, माघार घेण्याची अंतिम तारीख २० नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी पार पडणार आहे.

राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असताना, उम रगा नगर परिषदेची निवडणूक यावेळी अत्यंत चुरशीची ठरणार असून, स्थानिक राजकारणात अनेक नवे चेहरे पुढे येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तरुण भारत राजकिय दंगल


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जुन्या भांडणाच्या रागातुन सिडकोत तरुणाचा खून

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून सिडको संभाजी चौक येथे शुभम भद्रे व साई वट्टमवार यांच्या वाद होऊन शुभम भद्रे जागीच मृत्यू पावला ही घटना गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास घडली.



सिडको भागात साई वटमवार यांनी केलेल्या मारहाणीत २३ वर्षीय शुभम किशन भद्रे रा. संभाजी चौक सिडको नांदेड वय २३ वर्ष याचा मृत्यू झाला. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली. शुभमला लाथाबुक्याने गंभीर मारहाण केली. यामध्ये तो बेशुद्ध पडला तेव्हा त्याला त्याचे नातेवाईकांनी विष्णूपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता. रात्री ८ वाजेच्या सुमारास डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. याप्रकरणी ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळीच भेट देऊन तपास करून आरोपी साई वट्टमवार यास ताब्यात घेऊन जयश्री किशन भद्रे यांच्या फिर्यादीवरून ट्रॉसिटी क्ट नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील आरोपीस गळ्यावर धारदार ब्लेडचा वार आसल्याने तो दवाखान्यात उपचार घेत आहे. पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे अधिक तपास करत असल्याची माहिती पो.नि. रोकडे यांनी दिली.

# वंदे मातरम गीताच्या सामुहिक गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

वंदे मातरम या राष्ट्रभावना जागविणाऱ्या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आज जिल्ह्यात वंदे मातरम समूह गायन कार्यक्रम सर्वत्र उत्साहात संपन्न झाला. नांदेड येथे श्री गुरूग्रंथ साहिबजी भवन येथे हा कार्यक्रम हजारो विद्यार्थ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत राष्ट्रभक्तीच्या वातावरणात उत्साहात पार पडला.



श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, तहसिलदार संजय वारकड, गुरुद्वारा अधीक्षक हरजितसिंग कडेवाले, शहर पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैजने, जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुर्यवंशी, शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक यांच्यासह शहरातील विविध शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक स्थळी सकाळी १० वा. एकाच वेळी वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि अभिमानाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिक्षण विभागाच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दिल्ली येथील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत सामूहिक वंदे मातरम गीत गायन सुरु होते, हा कार्यक्रम सर्वाना दूरदृश्यप्रणालीद्वारे दाखविण्यात आला.

वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्षानिमित्ताने घेतलेल्या या सामूहिक गायन उपक्रमाने जिल्ह्यात देशभक्तीचा उत्साह आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत झाली. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम' या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्य सैनिकांसाठी प्रेरणास्रोत बनले होते. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली रचलेल्या 'वंदे मातरम' या गीताला शुक्रवारी ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान एकूण चार टप्प्यात राज्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून कौशल्य विकास विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी विद्यार्थ्यांनी वंदे मातरम गीतावर आधारीत लघुनाटिका सादर केली.

## मतदानाचा वाढविण्यासाठी सकाळच्या सत्रात मतदान करावे : जगताप

**हदगाव**-नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज रोजी नगरपरिषद हदगावात निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती



यावेळेस मतदारांनी भयमुक्त वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावा शक्यतो सकाळच्या सत्रातच आपले मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळेस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी गौरव वांडेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासह इतर विभागातले अधिकारी वर्ग उपस्थित होते. पुढे बोलताना जगताप म्हणाले की, येणारी नगरपरिषद च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भयमुक्त वातावरणात व निपक्षपाती पणे ही निवडणूक आपल्यास पार पाडायची आहे त्यामुळे मतदान यादी व मतदान केंद्रा बाबत जनजागृती केल्या जाईल मतदारांना काही अडचण असल्यास प्रत्येक ठिकाणी बी एल ओ हे मतदार यादी घेऊन उपस्थित राहणार त्यांना आपली अडचण सांगितल्यास आपले मतदान कुठे आहे याची माहिती दिली जाईल. मतदारांनी मतदानापासून वंचित न राहता आपला मतदानाचा हक्क बजविण्यासाठी दुपारच्या नंतर रांगा लावून रात्रीपर्यंत उभे न राहता सकाळच्या वेळेतच आपले मतदान करावे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमची पूर्ण यंत्रणा सज्ज असून निवडणूक व प्रचारादरम्यान आपणास काही अडचण व गैरप्रकार लक्षात आल्यास सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्याकडे तक्रार करावे असेही आव्हान शेवटी निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांनी केले.

## मिलींद काळेश्वरकर याची सहआयुक्त पदी (औषधे) पदोन्नती

**नांदेड**-मिलींद कृष्णराव काळेश्वरकर यांच्या कार्याची दखल घेत, सरकारने पदोन्नतीवर सहआयुक्त (औषधे) पदावर नागपूर येथे पदोन्नती केली आहे. नांदेड जिल्ह्यात अन्न व औषधी विभागात निरीक्षक म्हणून कार्य केलेले मिलींद काळेश्वरकर हे अतिशय प्रामाणिक



व्यक्तीमत्व म्हणून सर्वश्रूत आहेत. मिलींद काळेश्वरकर यापूर्वी यवतमाळ येथे सहाय्यक आयुक्त(औषधे) कार्यरत होते. त्यांना राज्य सरकारने ३१ऑक्टोबर रोजी पदोन्नती देत, नागपूर येथे सहआयुक्त पदावर विजमान केले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील रहिवासी असलेले मिलिंद काळेश्वरकर यांनी १९९६ मध्ये आपली औषधी पदवी प्राप्त केल्यानंतर दहा वर्षे औषध उत्पादन कंपनीत छत्रपती संभाजी नगर येथे नोकरी केली. त्यानंतर त्यांनी यवतमाळ येथेच एक वर्ष ते दीड वर्ष डिप्लोमा इन फार्मसी कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून नोकरी केली . २००७ मध्ये सरळ सेवेने संभाजीनगर येथील पैठण तालुक्यातील ढाकेफळप्राथमिक आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. प्राथमिक आरोग्य केंद्रात नोकरी करीत असताना, २०१२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या औषधी निरीक्षक गट ब परीक्षेत नांदेड येथे पदावर प्रथम नियुक्ती झाली होती. त्यांनी नांदेडला असताना त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने सर्व औषधी विक्रेत्यांच्या समस्या सोडविल्या वेळप्रसंगी शिष्टीने कडक नियमावली सुद्धा अवलंबले. एखाद्या वेळेस कुठे गैरप्रकार होत असतील, तर तेथे नियमानुसार शास्ति केली. तसेच त्यावेळी शिस्तप्रिय म्हणून नांदेडमध्ये काळेश्वरकर नावाचा चांगलाच दबदबा औषधी विक्रेत्यांच्या स्मरणात राहीला. त्यानंतर ते २०१५ ते २०१८ कालावधीत संभाजीनगर, २०१८ ते २०२०, यवतमाळ येथे औषधी निरीक्षक म्हणून कार्य केले. २०२० मध्ये ते सरळ सेवेने सहायक आयुक्त पदी पुन्हा एकदा संभाजी नगर येथे रुजू झाले. त्यानंतर सहआयुक्त होण्यापूर्वी ते यवतमाळ येथे २०२३ ते २०२५ सहायक आयुक्त म्हणून पदावर कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र सरकारने सहायक आयुक्त पदावरील पदोन्नतीवर सह आयुक्त पदी नियुक्ती दिलेली आहे. नांदेड येथे यांनी केलेली सेवा नांदेडकर नागरिकांच्या नेहमीच लक्षात राहणार आहे. अत्यंत प्रामाणिक आणि गरजवंताला मदत करणारे अधिकारी म्हणून मिलिंद काळेश्वरकर यांची समाजात आणि औषधी विक्रेत्यामध्ये वेगळी ओळख निर्माण झालेली आहे.

## व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी इलियास बावाणी

**नांदेड** -व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटना, माहूर शाखेच्या तालुका अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. व्हाइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे,राज्याध्यक्ष अनिल मस्के, जिल्हाध्यक्ष गणेश जोशी, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले यांनी दि.०७ नोव्हेंबर रोजी एका छोटेखानी कार्यक्रमात व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची एकमताने नियुक्ती केली असल्याचे घोषित केले. यावेळी व्हाऑमि जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले, जेष्ठ पत्रकार नंदकुमार जोशी, वसंतराव कपाटे यांसह पत्रकार सचिन बेहेरे, गजानन कुलकर्णी, संजय बनसोडे, निखिल कोरडे, सादिक भाई किरमाणी, शेख रफिक भाई तसेच स्नेहांकित निलेश जयस्वाल, वसंतराव राठोड, दत्ता जाधव यांचे सह मान्यवर उपस्थित होते.या नियुक्तीबद्दल नेते, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व स्नेहांकित मंडळींकडून बावाणी यांचे अभिनंदन केले जात आहे.

# हिरकणी आयटीआयमध्ये वंदे मातरम् गीत गायन कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. ७ नोव्हेंबर-**

येथील हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि. ०७ नोव्हेंबर रोजी तहसीलदार अभिजित जगताप यांचे अध्यक्षतेत तथा प्रमुख वक्ते जगदीश तावडे, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, योगी शामजी भारती महाराज, महाराष्ट्र शासनाचे स्वच्छतादूत प.पु. साईनाथ महाराज, नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, आयएमसी सदस्य संजय सुरोशे, सतीश कान्नव प्रप्रा. प्रतिभा पाटील यांचेसह उपस्थितांनी 'वंदे मातरम्' या भारत मातेच्या स्तुती गीताचा सोहळा संपन्न झाला.

यावेळी सर्व कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.प्रास्ताविक अश्विनी पोतदार यांनी केले. सूत्रसंचलन एस.एस.पाटील यांनी केले, तर के.पी. वाकोडे यांनी आभार मानले.

# नरसी येथील सेवा सहकारी संस्थेत आर्थिक अनियमिततेचा पर्दाफाश ; सचिव गादेवार निलंबित!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ७ नोव्हेंबर-**

नरसी सेवा सहकारी संस्थेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या गंभीर आरोपांवरून सचिव एन. व्ही. गादेवार यांना निलंबित करण्यात आले आहे. हा निर्णय नांदेड जिल्हा देखरेख सहकारी संस्था म. नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुमार बाकरे यांनी घेतला आहे.

संस्थेचे सभासद रविंद्र शिवाजीराव भिलवंडे यांनी केलेल्या तक्रारीत, संस्थेच्या व्यापारी संकुलाती ल दुकाने व गोदामे भाड्याने दिल्याची रक्कम अनेक वर्षे संस्थेच्या जमा-खर्च वह्यांमध्ये नोंदविली नसल्याचा आरोप करण्यात आला होता. २०१३ ते २०२४ या काळातील भाड्याची मोठी रक्कम संचालक मंडळाच्या परवानगीशिवाय उचलण्यात आल्याचा आरोप आहे.

चौकशी अधिकारी अजयकुमार कोंडलवाडीकर यांनी वारंवार लेखी, दूरध्वनी व प्रत्यक्ष संपर्क साधूनही गादेवार यांनी चौकशीसाठी आवश्यक कागदपत्रे न सादर करता उलट जे करायचे ते करा अशा उद्धट भाषेत उत्तर दिल्याची नोंद चौकशी अहवालात आहे. या गैरवर्तनाची गंभीर दखल घेत, कारणे दाखवा नोटीस देऊनही गादेवार यांनी कोणताही खुलासा सादर केला नसल्याने अखेरीस निलंबनाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील विभागीय चौकशीची जबाबदारी जी. आर. कौरवार, सहायक निबंधक ता. नायगांव यांच्याकडे सोपविण्यात आली असून, त्यांनी ६० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

निलंबन काळात गादेवार यांना अनुज्ञेय भत्ता मिळेल; मात्र त्यांनी कोणताही उद्योग वा नोकरी करता कामा नये. त्यांच्या निलंबन काळातील मुख्यालय म्हणून नांदेड जिल्हा देखरेख सहकारी संस्था निश्चित करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी बाकरे यांनी आदेशा त स्पष्ट केले आहे की, सहकारी क्षेत्रातील प्रामाणिकपणा आणि पार दर्शकते ला धक्का पोहोचविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

नरसी सेवासहकारी संस्थेतील हा गैरव्यवहार प्रकरण सहकारी क्षेत्रातील प्रामाणिकतेवरील विश्वासाला धक्का देणारा ठरत असून, विभागीय चौकशीतून सत्य बाहेर येण्याची सर्वत्र उत्सुकता लागली आहे.

# लोकसहभागातून सुंडगी गावात 'शिव पांदन रस्ता'

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ७ नोव्हेंबर-**

तालुक्यातील सुंडगी (बु.) गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून साकारलेल्या शिव पांदन रस्त्याचे माती काम पूर्ण झाले असून आता या रस्त्याचे खडीकरण करण्याची मागणी प्रशासनाकडे जोर धरू लागली आहे. सुंडगी (बु.) गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदार, देगलूर यांना या संदर्भात निवेदन दिले असून ग्रामपंचायतीनेही ठरावाद्वारे या मागणीला मान्यता दिली आहे.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मौ. सुंडगी (बु.) येथील पांडूरंग लालु कांबळे ते पांडूरंग चंद्रप्पा पाटील यांच्या शेतीपर्यंत जाणारा हा रस्ता सुमारे दोन किलोमीटर लांबीचा असून शेतकऱ्यांचा दळणवळणाचा हा मुख्य मार्ग आहे. या रस्त्याने शेतातील माल, बियाणे व खत वाहतूक केली जाते. मात्र पावसाळ्यात हा रस्ता चिखलमय होऊन वाहतूक पुर्णपणे ठप्प होते, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गावकऱ्यांनी स्वतःच्या श्रमदानातून आणि लोकसहभागातून या रस्त्याचे माती काम पूर्ण केले आहे. आता शासनाने किंवा प्रशासनाने पुढाकार घेऊन या रस्त्याचे खडीकरण करावे, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे. प्रशासनानेही तातडीने या मागणीवर लक्ष घालून रस्त्याचे खडीकरण केल्यास गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनावर दिगांबर हणमंतराव पाटील (भारतीय जनता पार्टी बुथ प्रमुख), विजय पाशमवार, शंकरराव पाटील, बाळासाहेब पाटील, कपिल देशमुख, लक्ष्मण बरसमवार, दिलीप पाटील, युवराज कांबळे (पोलीस पाटील), हणमंतराव बडगे, हणमंतराव तोटावाड, सुभाषराव बोईनवाड, मारोती बडेवार, शेषेराव चिंतलवाड, सुरेश देशमुख हवरगेकर, गंगाधर बरसमवार, शंकर बरसमवार आदीं शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाच्या प्रती जिल्हा दंडाधिकारी नांदेड, उपजिल्हाधिकारी देगलूर, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर यांनाही देण्यात आले आहेत.

## नगरपालिकेसाठी भाजपा इच्छुकांच्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

होऊ घातलेल्या देगलूर , बिलोली , कुंडलवाडी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इच्छुकांच्या खा. डॉ. अजित गोपछडे , आ. जितेश अंतापुरकर आणि जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे आणि नांदेड महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांनी आज मुलाखती घेतल्या. या मुलाखतींना उदंड प्रतिसाद मिळाला असून असंख्य इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत. यावेळी खा. डॉ.अजित गोपछडे, आ. जितेश अंतापुरकर, नांदेड महानगर अध्यक्ष तथा विधान परिषदेचे माजी आमदार अमरभाऊ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ .संतुकराव हंबर्डे, लक्ष्मणराव ठक्करवाड, शंकरराव कंतेवार, शिवाजीराव देशमुख बळेगावकर आदींची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्वच घटकांचा समतोल विकास साधला जात आहे . यात नांदेड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही भरपूर तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीला उदंड यश मिळाले आहे . त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विजय मिळविण्यासाठी आणि सत्ता स्थापना करून सर्वसामान्यांचा विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात जोरदार तयारी सुरू आहे. नांदेड दक्षिण भागातील देगलूर, कुंडलवाडी आणि बिलोली या अत्यंत महत्त्वाच्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वात बलाढ्य पक्ष झाला पाहिजे किंबहुना या तिन्ही ठिकाणी भाजपाची सत्ता आली पाहिजे यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन सुरू आहे. या अनुषंगाने आज देगलूर, बिलोली, कुंडलवाडी नगर परिषदेची निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या.

## घनकचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण करावीत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील गावे मॉडेल करण्याच्या उद्देशाने सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे गावस्तरावर सुरू आहेत. अद्याप अपूर्ण असलेल्या १५९ गावांतील सर्व शिल्लक कामे २५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले. या बैठकीस तालुकास्तरावरील विस्तार अधिकारी, उपअभियंता, शाखा अभियंता उपस्थित होते.

# आष्टूर येथील अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

लोहा तालुक्यातील येथील योगेश बाबर , नारायण बाबर, मंथन बाबर, पांडुरंग बाबर , राहुल कंधारे यांच्यासह अनेकांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव सुनील नानवटे , जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे , युवक उत्तर जिल्हा अध्यक्ष स्वप्निल इंगळे , नांदेड उत्तर विधानसभा प्रमुख मोहन कांबळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक बांधणी आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक गटावर आणि पंचायत समितीच्या प्रत्येक गणावर राष्ट्रवादी काँग्रेसचा विजयी ध्वज फडकला पाहिजे यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे काटेकोर नियोजन सुरू आहे. यातच अनेक राजकीय पक्षातील वरिष्ठ मंडळींचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होण्याचा सपाटा सुरूच आहे. यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नियोजन मोठ्या प्रमाणात सुरू असून आज लोहा तालुक्यातील आष्टूर येथील अनेक सक्रिय कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे . पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जोरदार कामाला लागा जो जास्त काम करेल त्याला निश्चितपणे उमेदवारी देण्यासाठी सकारात्मक विचार केला जाईल असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी वेळी कार्यकर्त्यांना दिला आहे.

# मुदखेड नगर परिषदेच्या निवडणूकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ७ नोव्हेंबर-**

मुदखेड नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ दि.२ डिसेंबर रोजी होणार असून मागील तीन वर्षापासून खंडित असलेली नगरपरिषदेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्यातील रखडलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका दि.२ डिसेंबर रोजी घेणार असून यासंबंधी दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगांवकर यांनी स्थानिक माध्यम प्रतिनिधी आणि पत्रकारांशी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून निवडणूक विभागाने पूर्णपणे तयारी केली असून निवडणूक घेण्यासाठी सज्ज असल्याची माहिती देत




नगरपरिषदेची निवडणूक पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे पार पाडली जाईल आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जगदीश दळवी आणि नायब तहसीलदार मारोतराव जगताप निवडणूक प्रक्रियेत सहाय्यक म्हणून आपली भूमिका बजावतील.

सविस्तर वृत्त असे की नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ संबंधी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले की शहरात एकूण १० प्रभागाची रचना करत एकूण २१,५४९ असून त्यात १०,७२७ पुरुष असून स्त्री मतदारांची संख्या ११,०१९ अशी असून निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या हीींि:// ारहरीशलशश्रशल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नामनिर्देशनपत्र भरणा करणे व भरणा केलेले नामनिर्देशन पत्राची छायांकीत प्रत स्वाक्षरीनिशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दि. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालवधीत सुटीचे दिवस वगळून दुपारी ३:०० वा.पर्यंत सादर करावयाची असल्या बाबत माहिती दिली.

नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची माहिती प्रसिध्द करण्याचा दिनांक १८ नोव्हेंबर, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे १९ नोव्हेंबर ते दि.२१ नोव्हेंबर दुपारी ३:०० वा. पर्यंत., निवडणूक चिन्ह नेमूण देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २६ नोव्हेंबर मतदानाचा दिनांक २ डिसेंबर सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वा पर्यंत. मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक ३ डिसेंबर इ. बाबत माहिती सांगितली.

निवडणुकीची घोषणा होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याचा सर्वांनी काटेकोरपणे पालन करत निवडणूक प्रक्रिया ही शांततेत व सुरळीतपणे पार पडणेसाठी सर्वांनी सहकार्य करावेत असे आह्वान निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देवळगाव कारणे यांनी यावेळी दिले.

**विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार**

मुदखेड नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नाम निर्देशन पत्र वाटप आणि स्वीकारणे नगरपरिषदेच्या विशेष कक्ष स्थापनकरण्यात येणार असून नगरपरिषदेची मतमोजणी दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता पासून सुरू होणार असून ही मतमोजणी नगरपरिषदेच्या सभागृहात पार पाडण्यात येईल अशी माहिती या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# धाराशिव नगर परिषद निवडणूक : २ डिसेंबर रोजी मतदान; मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे

## निवडणूक निर्णय अधिकारी ओंकार देशमुख यांचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ नोव्हेंबर -**

धाराशिव नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि.२ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, ९४ हजार १४ मतदारांनी निर्भयपणे, शांततेत आणि कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी केले.

धाराशिव नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




देशमुख यांनी सांगितले की, धाराशिव नगर परिषद क्षेत्रात एकूण ४१ नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार आहे. एकूण २० प्रभागांपैकी १९ प्रभागांमध्ये त्रीसदस्यीय निवडणूक होणार असून, १०० मतदान केंद्रे प्रभागांतर्गत आणि ८ मतदान केंद्रे प्रभागाबाहेर असतील.

या निवडणुकीत ४८ हजार ४१३ पुरुष, ४५ हजार ५८५ महिला आणि १६ इतर मतदार मतदान करणार आहेत. नामनिर्देशन भरण्याची प्रक्रिया १० ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दुपारी ३.३० वाजेपर्यंत (रविवार वगळता) सुरू राहील. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर, तर अर्ज मागे घेण्याची मुदत २० ते २१ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत असेल. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल.

मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायं. ५.३० वाजेपर्यंत पार पडेल. तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होऊन निकाल जाहीर केला जाईल. देशमुख यांनी सांगितले की, निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्वतंत्र नियंत्रण पथके नेमण्यात येणार आहेत.

शहरातील संवेदनशील मतदान केंद्रांची यादी पोलीस अधीक्षक कार्यालयाला देण्यात आली असून, निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार आवश्यक ती खबरदारी घेण्यात येईल. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी १५ लाख रुपये, तर नगरसेवक पदाच्या उमेदवारासाठी ५ लाख रुपये खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

मतदारांच्या ओळखीसाठी मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, शासकीय कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र किंवा बँक पासबुक यांसारखे अधिकृत पुरावे ग्राह्य धरले जातील, असे देशमुख व अंधारे यांनी स्पष्ट केले.

# पूरग्रस्त महिलांना पुण्यधाम ट्रस्टकडून हरभरा बियाण्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील ५०० पूरग्रस्त विधवा, परितक्ता व एकल महिलांना रब्बी हंगामासाठी हरभरा बियाण्यांचे वाटप पुण्यधाम ट्रस्ट, पुणे संचलित पुण्यधाम आश्रम यांच्या वतीने करण्यात आले. हा कार्यक्रम पर्याय सामाजिक संस्था, हसेगाव (के) येथे दि. ६ नोव्हेंबर रोजी पार पडला.

या उपक्रमाचे आयोजन पुण्यधामच्या माता कृष्ण कश्यप व पर्याय संस्थेचे कार्यवाहक विश्वनाथ अण्णा तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या प्रसंगी पुण्यधाम ट्रस्टचे ट्रस्टी गणेश कामठे म्हणाले, आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसावे, या भावनेतून हा उपक्रम राबविला. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, तो कोणापुढे हात पसरणारा नाही. पुण्यधाम ट्रस्टकडून भविष्यातही १०० टक्के मदत केली जाईल.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाम मरळ, सूर्यकांत कामठे, निलेश काकडे उपस्थित होते. अध्यक्षस्थान विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी भूषविले. या वेळी बाळासाहेब धस, विलास गोडगे, सुनंदा खराटे यांनी मार्गदर्शन केले, तर ऋषिकेश तोडकर यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिर्ता तोडकर, भिकाजी जाधव, बालाजी शेंडगे, परमेश्वर गवारे, विकास कुदळे, प्रमिला राख, आनंद जाधव, कल्पना जतकर, अश्विनी काकडे, निकिता चंदनशिवे, शकुंतला गोडगे, जयश्री कोठावळे, रियाज शेख, अशोक शिंदे, अजहर तुटके, दिगंबर लडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नळदुर्ग येथे वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त सामूहिक गायन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ नोव्हेंबर -**

वंदे मातरम या गीताच्या १५० व्या वर्षानिमित्ताने देशभरात सामूहिक गायनाचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार नळदुर्ग येथील भाजप कार्यालयात दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विलास येडगे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, नळदुर्ग शहराध्यक्ष बसवराज धरणे, माजी नगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, भाजप नेते सुशांत भुमकर, माजी भाजयुमो जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, सुनिल उकंडे, सुधीर हजारे, किशोर नळदुर्गकर, अजय देशपांडे, पद्माकर घोडके, संजय जाधव, पप्पु पाटील, बंडु पुदाले, मुदस्सर शेख, तसेच शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, उत्तम बनजगोळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वंदे मातरम हे गीत केवळ गाणे नसून राष्ट्रीय अस्मिता आणि गौरवाचे प्रतीक आहे.

बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी ७ नोव्हेंबर १८७५ रोजी या गीताची रचना केली होती. त्याला आज १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# तेजस्वी माळी आणि शिवक्रांती गायकवाड यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ नोव्हेंबर -**

धाराशिव आणि लातूर येथे पार पडलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्याभवन हायस्कूल, कळंब येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले असून त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थिनींचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

धाराशिव येथे झालेल्या विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात कुमारी तेजस्वी धनंजय माळी हिने प्रथम क्रमांक पटकावला असून तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

तसेच, लातूर येथे झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत कुमारी शिवक्रांती अतुल गायकवाड हिने ६०० मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तिचीदेखील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून ती रत्नागिरी येथे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या दोन्ही विजेत्या खेळाडूंचा सत्कार मुख्याध्यापक व्ही.जी. कुंभार, उपमुख्याध्यापक व्ही.एस. मायाचारी आणि पर्यवेक्षक जे.एन. कोळी यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यार्थिनींना क्रीडा विभाग प्रमुख संजय मडके यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# नळदुर्ग नगरपालिकेवर भाजपचा झेंडा फडकविण्याचे लक्ष्य : जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ नोव्हेंबर -**

येणाऱ्या नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप पूर्ण ताकदीने उतरून नगरपालिका ताब्यात घेणार असून, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी केले.

दि. ६ नोव्हेंबर रोजी भाजप कार्यालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत ते बोलत होते.




या बैठकीत नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी रणनीती आखण्यात आली तसेच शहरातील राजकीय समीकरणे आणि विकासाच्या प्रलंबित कामांवर चर्चा झाली.

बैठकीस भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, नेताजी पाटील, जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता राजमाने, शहराध्यक्ष बसवराज धरणे, सुशांत भुमकर, नय्यर जहागीरदार, विलास राठोड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी दत्ता कुलकर्णी म्हणाले, नगरपालिकेवर भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे. ज्यांना तिकीट मिळाले नाही त्यांनी नाराजी न दाखवता पक्षाच्या उमेदवाराच्या विजयासाठी प्रयत्न करावेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरात जाऊन भाजप सरकारच्या योजनांची माहिती द्यावी आणि 'मीच उमेदवार आहे' या भावनेने निवडणूक लढवावी.

बैठकीत शहराच्या विकासासाठी ठोस रोडमॅप निश्चित करण्यात आला असून भाजपकडून निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी सुरू झाली आहे.

# तुळजापूर क्रीडा संकुलात वंदे मातरम् समूहगान उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ नोव्हेंबर -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता, सांस्कृतिक कार्य विभागाच्या विद्यमाने शुक्रवारी राज्यातील सर्व शासकीय आयटीआयमधील मैदान व क्रीडा संकुलाच्या ठिकाणी एकाच वेळी वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याने सार्थ शताब्दी महोत्सव साजरा झाला आहे.

शिक्षणमहर्षी सीना आलूरे गुरुजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुळजापूरच्या वतीने तालुका क्रीडा संकुल तुळजापूर, येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. जनमानसात देशभक्तीची भावना रुजावी, या हेतूने राज्यातील सर्व तालुक्यांत एकाच दिवशी वंदे मातरम् गीताचे समूहगान झाले.

यावेळी मानवी साखळीसह लघुनाटिकेचे सादरीकरण तुळजाभवानी जुनियर कॉलेज तुळजापूर येथील प्रा. विवेक कोरे व त्यांचे विद्यार्थीयांनी सुंदर अशा रित्या नाटिका सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटील व्हि. के. यांनी केली व या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून प्रा. उज्वला मसलेकर यांनी वंदे मातरम गीताबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी तुळजाभवानी सैनिक स्कूल तुळजापूर यांनी वंदे मातरम् गीत गायन केले.

प्रमुख उपस्थिती म्हणून अर्चना पाटील, महंत माऊजीनाथ महाराज, हभप. प्रभाकर नाईकवाडी महाराज, महंत इच्छागिरी महाराज, आयएमसी चेअरमन बाबासाहेब पाटील, नायबतहसीलदार गणेश कोनेले, अॅड. स्वाती नळेगावकर, प्रा. चेतन गायकवाड, डॉ. राहुल पाटील यांच्यासह शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सुचिता रत्नपारखे, प्रा. विवेक कोरे यांनी केले.

# नळदुर्ग न.पा.च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांची नगरपालिका कार्यालयात गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक २ डिसेंबर रोजी होणार असून, निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी घरपट्टी, नळपट्टी भरून बेबाकी प्रमाणपत्र घेण्यासाठी नगरपालिकेच्या कार्यालयात मोठी गर्दी केली आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या नावावर नगरपालिकेची कोणतीही थकबाकी नसावी, हा नियम असल्याने अनेकांनी थकीत कर तत्काळ भरून बेबाकी प्रमाणपत्र घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निमित्ताने का होईना, नगरपालिकेच्या थकीत कराची वसुली होऊन तिजोरीत महसूल जमा होत आहे.

नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १० ते १७ नोव्हेंबरदरम्यान असून, त्याआधीच इच्छुक उमेदवार प्रमाणपत्रासाठी रांगा लावत आहेत.

शहरातील सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसह अनेक स्वतंत्र इच्छुक उमेदवारही या तयारीत असल्याने नगरपालिका कार्यालयात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे.

# शेतकरी पुत्र रामलिंग भांगे यांनी मिळवले क्लास-१ गटविकास अधिकारी पद

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ नोव्हेंबर -**

जिद्द, चिकाटी आणि पालकांच्या कष्टांची जाणीव ठेवली तर यश नक्की मिळते, हे परंडा तालुक्यातील वाकडी येथील शेतकरी पुत्र रामलिंग भगवान भांगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएससी परीक्षेत त्यांनी राज्यात ४६ वा क्रमांक मिळवत क्लास-१ गटविकास अधिकारी पद मिळवले आहे.



घरची आर्थिक परिस्थिती बेताची असूनही आई-वडिलांनी मुलगा अधिकारी व्हावा या स्वप्नासाठी शेतात कष्ट केले. त्या त्यागाची जाणीव ठेवून रामलिंग भांगे यांनी संघर्षातून अभ्यास सुरू ठेवला. एमपीएससीच्या तयारीदरम्यान आर्थिक गरज भागवण्यासाठी त्यांनी एटीएम सेंटरवर सुरक्षा रक्षकाची नोकरी करत अभ्यास सुरू ठेवला.

त्यांचे प्राथमिक शिक्षण वाकडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण बार्शी येथील महाराष्ट्र विद्यालयात झाले. पदवी शिक्षण शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे घेतले. त्यानंतर त्यांनी कोल्हापूर विद्यापीठात एमपीएससीची तयारी केली.

सन २०१७ मध्ये झालेल्या एमपीएससी परीक्षेतच त्यांनी पीएसआय, एसटीआय, एएसओ व एक्साईज पीएसआय या पदांवर पात्रता मिळवली होती. आता २०२४ च्या परीक्षेत राज्यात ४६ वा क्रमांक पटकावत त्यांनी क्लास-१ गटविकास अधिकारी पदाला गवसणी घातली.

ग्रामिण भागातील शेतकरी पुत्राने असा मोठा मान मिळवल्याने वाकडीसह संपूर्ण परंडा तालुक्यातून त्यांच्या यशाचे कौतुक होत आहे.

# नगरपरिषद निवडणुकीदरम्यान वाहनांच्या गैरवापरावर निर्बंध

## जिल्हाधिकारी पुजार यांचा आदेश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ नोव्हेंबर -**

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानंतर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि वाहनांच्या गैरवापरास आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी महत्त्वाचा आदेश जारी केला आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या ताफ्यात दहा पेक्षा जास्त वाहने नसावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी पुजार यांनी मोठ्या वाहनताफ्यांवर निर्बंध लावण्याचे आदेश दिले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये जारी केलेल्या आदेशानुसार, कोणत्याही वाहनांच्या ताफ्यात दहापेक्षा जास्त मोटारगाड्या, मोटारसायकली किंवा इतर वाहने वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश धाराशिव जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांच्या हद्दीत लागू राहणार असून, ३ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रभावी असेल.

# आष्टा कासार येथे सामूहिक वंदे मातरम् गीत गायन उत्साहात संपन्न

## ग्रामपंचायत, शैक्षणिक संस्था व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ नोव्हेंबर -**

वंदे मातरम् या अमर देशभक्तीपर गीताच्या १५० व्या वर्षानिमित्ताने ग्राम पंचायत कार्यालय आष्टा कासार यांच्या वतीने सामूहिक गीत गायनाचा भव्य कार्यक्रम आज दि.७ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला.



या उपक्रमात गावातील सर्व शैक्षणिक संस्था, आरोग्य केंद्र, तलाठी कार्यालय, कृषी अधिकारी, ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमाचे आयोजन सरपंच सुलभा कांबळे, उपसरपंच वसंतराव सुलतानपुरे आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या पुढाकाराने करण्यात आले. वंदे मातरम् गीताने स्वातंत्र्यलढ्यात भारतीयांना एकतेची प्रेरणा दिली होती. त्याच भावनेतून ग्राम पंचायतीकडून हा देशभक्तीचा उत्सव साजरा करण्यात आला.

वंदे मातरम् हे गीत कवी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी इ.स. १८७५ साली रचले. 'बंगदर्शन' मासिकात त्याचे प्रथम प्रकाशन झाले, तर 'आनंदमठ' या कादंबरीत १८८२ साली ते समाविष्ट करण्यात आले. २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेने या गीताला राष्ट्रगीताचा दर्जा दिला.

कार्यक्रमावेळी सामाजिक कार्यकर्ते मुकेश मुळे यांनी वंदे मातरम् गीताचे ऐतिहासिक आणि प्रेरणादायी महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी या गीताने स्वातंत्र्य सैनिकांना मिळालेल्या प्रेरणेची माहिती उपस्थितांना दिली.

याप्रसंगी सरपंच सुलभा कांबळे, उपसरपंच वसंतराव सुलतानपुरे, सदस्य अमोल सोमवंशी, पंढरी पाटील, प्रशांत आळंगे, विवेक सोमवंशी, गंगाधर बलसुरे, बसवराज कोंडे, सौरभ कागे, प्रशांत सोमवंशी तसेच गावातील अंगणवाडी सेविका, पालक वर्ग आणि नागरिक उपस्थित होते. आष्टा हायस्कूल, जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, जिल्हा परिषद कन्या शाळा आणि सहारा प्राथमिक शाळा आष्टा कासार येथील विद्यार्थी व शिक्षकांनी एकसुरात वंदे मातरम् गीत सादर करून देशभक्तीचा नारा दिला.

कार्यक्रमानंतर घोषणा देत राष्ट्रप्रेमाचा जयघोष करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आष्टा हायस्कूलचे क्रीडा शिक्षक मुकेश सोमवंशी यांनी केले.

# मोटारसायकल अपघातात एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मळुंब्रा गावाजवळ झालेल्या मोटारसायकल अपघातात एकाचा मृत्यू झाला असून, या प्रकरणी तामलवाडी पोलिस ठाण्यात निष्काळजी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी बबन किसन इटकर (रा. गांधीनगर, बिड) यांनी दि.२१ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता आपली मोटारसायकल (क्र. एमएच २३ बीएल ८९१२) वेगाने व निष्काळजीपणे चालवून घसरवल्याने अपघात झाला.

यात सोबत असलेले रविंद्र कचरु उपाळकर गंभीर जखमी होऊन मयत झाले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा पक्षप्रवेशाचा मेळा; ना. पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.७, नोव्हेंबर -**
आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहमदपूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश होत आहेत.

राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत प्रभाग क्र. ८ मधील रफिकभाई खुरेशी, युनुस खुरेशी, रतन खुरेशी, अजहर खुरेशी, कासीमभाई खुरेशी यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

सर्व नवागतांचे स्वागत ना. बाबासाहेब पाटील यांनी केले. यावेळी शिवानंद हेंगणे (प्रदेश सरचिटणीस), शिवाजीराव देशमुख (तालुकाध्यक्ष), सय्यद एजाज (अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष) यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### अहमदपूर येथे यशवंत विद्यालयात 'विद्यार्थी दिवस' साजरा

**अहमदपूर, दि.७ नोव्हेंबर -**
अहमदपूर येथील यशवंत विद्यालयात महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला विद्यार्थी दिवस विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक गजानन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी साताऱ्यातील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये दि. ७ नोव्हेंबर १९०० रोजी प्रथम शाळेत प्रवेश घेतला होता. त्या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून घोषित केला आहे. या प्रसंगी माधव वाघमारे व राम तत्तापुरे यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील प्रेरणादायी घटनांवर भाषणे केली. विद्यार्थ्यांनी त्यातून मौल्यवान प्रेरणा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कपिल बिराजदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष पारशेट्टे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




### उदगीर येथे 'वंदे मातरम' गीताचा १५० वा वर्धापन दिन साजरा

**उदगीर, दि.७ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे राष्ट्रीय छात्र सेना च्या वतीने 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संतोष नवगण, ॲडम ऑफिसर कर्नल वाय.बी. सिंग आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. के. मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करण्यात आले तसेच 'स्वाधीनता के शताब्दी वर्ष का भारत' या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन डॉ.आर.पी. साबदे यांनी केले, सूत्रसंचालन कॅडेट सुषमा स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन कॅडेट तेजस्विनी बोनवळे यांनी मानले.



### 'वंदे मातरम्' गीताच्या सार्धशताब्दीनिमित्त औराद शहाजानीत सामूहिक गान

**निलंगा, दि.७ नोव्हेंबर -**
तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभागाच्या वतीने 'वंदे मातरम्' गीताच्या सार्धशताब्दीनिमित्त दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सामूहिक गान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संगीत विभागप्रमुख प्रा. दुर्गादास सबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' गीत सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद जाधव यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. आशीष खडकेश्र्वर, डॉ. विजयकुमार पवार, प्रा. प्रमोद मरगणे, प्रा. दगडू मुंडे, पोलीस उपनिरीक्षक जनार्दन काळे, पोलीस कॉन्स्टेबल बालाजी माने, अली शेख, प्रशांत हंडे, बाळासाहेब कामले, कार्यालय अधीक्षक संजीवकुमार होसुरे, विजयकुमार बाबछडे, राजेंद्र बेलूरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय वाहतूक 'धोका झोन'मध्ये; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर



**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.७, नोव्हेंबर -**
देवणी तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस अधिकच असुरक्षित बनत असून, यामुळे पालक आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत अनेक ठिकाणी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चालवली जाणारी वाहतूक नियमबाह्य पद्धतीने सुरू आहे.

वाहनचालकांकडे आवश्यक परवाने नसतात, वाहनांची तांत्रिक तपासणी होत नाही, तर क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी बसवले जातात. काही ठिकाणी एका छोट्या व्हॅनमध्ये दहा ते पंधरा मुले दाटीवाटीने बसवली जात असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो आहे.

वाहतुकीसाठी ठरवलेले नियम जसे की अग्निशामक यंत्र, प्राथमिक उपचार पेटी, वेगमर्यादा, सुरक्षा पट्टा आणि चालकाची ओळखपत्रे यांचे पालन होत नसल्याचे वारंवार दिसून येते. अनेकदा चालक अल्पवयीन किंवा अनुभवहीन असतात, तसेच काहींचा गुन्हेगारी इतिहास तपासला जात नाही, अशी पालकांची तक्रार आहे.

गेल्या काही महिन्यांत वलांडी-दवणहिप्परगा मार्गावर शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या रिक्षा आणि दुचाकींचे गंभीर अपघात झाले आहेत. काही घटनांमध्ये पाच विद्यार्थी जखमी झाले, तर काहींना अपंगत्व आले आहे.

शिक्षण विभाग आणि परिवहन खात्याने शालेय वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असली तरी त्यांची अंमलबजावणी अत्यंत कमकुवत आहे. अनेक शाळा जबाबदारी केवळ कागदोपत्री ठेवून विद्यार्थ्यांची वाहतूक खासगी चालकांकडे सोपवतात. या शिथिलतेमुळेच अपघातांची पुनरावृत्ती होत असल्याचे स्पष्ट दिसते.

पालक संघटनांनी परिवहन विभागाकडे नियमभंग करणाऱ्या वाहनांवर तातडीने कारवाई करण्याची, चालकांना नियमित प्रशिक्षण देण्याची आणि शालेय वाहतुकीसाठी स्वतंत्र परवाना प्रणाली लागू करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रत्येक शाळेत वाहतूक समिती स्थापन करून वाहनांची तपासणी बंधनकारक करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

बालसुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. शालेय वाहतूक सुरक्षित करण्यासाठी सरकारी यंत्रणा, शाळा प्रशासन आणि पालक या तिघांच्या समन्वयातून ठोस उपाययोजना केल्याशिवाय परिस्थितीत बदल होणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे.

### अहमदपूरमध्ये 'वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त उत्साहपूर्ण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.७, नोव्हेंबर -**
भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रेरणादायी गीत 'वंदे मातरम'ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राज्य सांस्कृतिक विभागाच्या मार्गदर्शनाखाली अहमदपूर येथे विविध उपक्रम राबविण्यात आले.

डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदपूर आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने महात्मा गांधी महाविद्यालयात सामूहिक वंदे मातरम गीत सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे होत्या. यावेळी महसूल विभागाचे संतोष अनर्थे, विचार विकास मंडळाचे ड. किशनराव बेंडकुळे, आयटीआयचे प्राचार्य शिवाजी कवलेकर, उपप्राचार्य तुकाराम सुरवसे, तसेच अमोल शिंपले, तीरोना मस्के, आयुबखान पठाण, कैलास बोरळे, रमेश आचमे, सारिका कदम, प्रशांत पांडव आदी मान्यवर उपस्थित होते.

यशवंत विद्यालय, कमला नेहरू विद्यालय, जिल्हा परिषद प्रशाला, किलबिल नॅशनल स्कूल आणि महात्मा गांधी महाविद्यालय येथील शेकडो विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले.

## उदगीर नगरपालिका निवडणूक : लिंगायत-मुस्लिम मतदार ठरणार निर्णायक घटक

### सर्व पक्षांनी सुरू केली मोर्चेबांधणी; महायुती-आघाडी गणित गुंतागुंतीचे

**तभा वृत्तसेवा / नागेंद्र साबणे**
**लातूर, दि.७, नोव्हेंबर -**
लातूर जिल्ह्यातील सर्वांत मोठे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उदगीर शहरात आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. शहरात लिंगायत आणि मुस्लिम समाजाची मोठी लोकसंख्या असल्याने या दोन समाजांच्या मतांचा कौलच नगरपालिकेचे भवितव्य ठरवणार आहे. आतापर्यंतच्या निवडणुका प्रामुख्याने जातीय आधारावर झाल्याने, या वेळीही त्याच समीकरणांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे.

गेल्या निवडणुकीत भाजपचा नगराध्यक्ष विजयी झाला होता. तेव्हा भाजपकडे १९, काँग्रेसकडे १३ तर एमआयएमकडे ६ नगरसेवक होते.

तिरंगी लढतीत भाजप पहिल्या, काँग्रेस दुसऱ्या तर एमआयएम तिसऱ्या क्रमांकावर राहिली होती. या वेळी नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असल्याने सर्वच पक्षांत लिंगायत महिला की मुस्लिम महिला उमेदवार द्यायचा हा पेच निर्माण झाला आहे.



राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी (ता. ५ नोव्हेंबर) निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. अर्ज दाखल: १० ते १७ नोव्हेंबर, छाननी: १८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख: २५ नोव्हेंबर, मतदान: २ डिसेंबर, मतमोजणी: ३ डिसेंबरला होणार आहे.

उदगीरमध्ये सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) व भाजप युतीत आहेत. मात्र, आगामी निवडणुकीत ही युती कायम राहणार की नाही, याबाबत अजून निर्णय झालेला नाही. भाजपने नगराध्यक्षपदावर दावा केला असून हे पद आमचाच हक्क आहे, असे स्पष्ट मत राहुल केंद्रे (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व विधानसभा प्रमुख, भाजप) यांनी व्यक्त केले आहे. दुसरीकडे, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस-एमआयएम आघाडीची शक्यता निर्माण झाली आहे. जर ही आघाडी झाली तर ती महायुतीसाठी मोठे आव्हान ठरण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीत माजी क्रीडामंत्री व विद्यमान आमदार संजय बनसोडे, भाजप नेते व माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, बाजार समिती सभापती व काँग्रेस नेते शिवाजीराव हुडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते बसवराज पाटील नागराळकर, एमआयएम नेते ताहेर हुसेन, तसेच माजी आमदार गोविंद केंद्रे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

आ. संजय बनसोडे यांनी केलेली विकासकामे, नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरण सोहळ्याचा प्रतिसाद आणि त्यांची कार्यकर्त्यांशी असलेली नाळ यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला शहरात पोषक वातावरण असल्याचे मानले जात आहे.

त्यामुळे ते स्वबळावर लढण्याचाही विचार करू शकतात, अशी चर्चा सुरू आहे. भाजपचे विधानसभा प्रमुख राहुल केंद्रे यांनी म्हटले की, महायुती धर्मानुसार नगराध्यक्षपद भाजपाचाच हक्क आहे. माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी विधानसभेत भाजप कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचा विचार करून हे पद भाजपकडे ठेवावे, अशी आमची अपेक्षा आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, महायुतीसाठी भाजप आग्रही आहे, मात्र नगराध्यक्षपदाचा उमेदवार भाजपाचाच असावा, यावर आमचा ठाम आग्रह राहील.

## कपिलधार येथे पार्वती ग्रुपतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर; ३२६० भाविकांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.७, नोव्हेंबर -**
वीरशैव लिंगायत समाजाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कपिलधार (जि. बीड) येथे सोळाव्या शतकातील थोर संत, संतशिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांच्या शिवसाक्षात्कार दिनानिमित्त भव्य-दिव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने उमरखेड (जि. यवतमाळ) येथील पार्वती हेल्थ फाउंडेशन, उमामहेश्वर मन्मथ ज्योत यात्रा विठ्ठळ, वीरशैव जंगम समाज संघटना, आणि वीरशैव लिंगायत समाज संघटना उमरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मोफत सर्वरोग तपासणी शिबिर घेण्यात आले.

दि.४ व ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित या शिबिरात डॉ. विष्णुकांत शिवणकर व डॉ. ओंकार मुळावकर यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ३२६० रुग्णांची तपासणी करण्यात आली.



यामध्ये महिला १५२० व पुरुष १७४० रुग्णांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. राज्यातील तसेच तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या शेजारील राज्यांतून लाखो भाविक पायी दिंड्या घेऊन मन्मथमाऊलींच्या दर्शनासाठी कपिलधार येथे येतात. अनेक दिवसांच्या पायी प्रवासानंतर या भाविकांना आरोग्य सेवेची तीव्र गरज भासते. याची जाणीव ठेवून पार्वती ग्रुपचे दुसरे यशस्वी वर्ष ठरले. उपक्रमाचे व्यवस्थापन बालाजी शिरडकर, प्रा. संतोष बिचेवार आणि प्रभाकर दिघेवार यांनी उत्कृष्टरीत्या केले. तसेच किसनराव हिंगमिरे, कैलास स्वामी सुकळकर, सावन स्वामी बेंडके, संतोष डोम, अमोल घंटे, रनमले यांनी निस्वार्थ भावनेने सेवा दिली. या शिबिरासाठी वीरभद्र क्लिनिक उमरखेड, मोरया क्लिनिक विठ्ठळ, आरोग्य विभाग, सहस्रबाहु चॅरिटेबल ट्रस्ट उमरखेड, आणि महालिंग स्वामी लातूर यांचे विशेष सहकार्य लाभले.

उपक्रमाचे औचित्य साधून गुरूवर्य दिगांबर शिवाचार्य महाराज (थोरलामठ वसमत), गुरूवर्य शंभूलिंग शिवाचार्य महाराज (अंबेजोगाई) आणि गुरूवर्य रुद्रमुनी शिवाचार्य महाराज (मुदखेड) यांनी भेट देऊन आरोग्य सेवेचे कौतुक केले आणि आशीर्वाद दिला.

## सामाजिक बांधिलकीतून पालखी लखनगावेचा वाढदिवस साजरा



### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.७, नोव्हेंबर -**
नगरपंचायतचे नगरसेवक सुधीर लखनगावे यांनी आपल्या चिमुकली पालखी लखनगावे हिचा द्वितीय वाढदिवस सामाजिक बांधिलकी जोपासत अनोख्या पद्धतीने साजरा केला. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप करून पालखीचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

ही उपक्रममूलक वाढदिवस साजरीकरणाची मोहिम जि.प. केंद्रिय शाळा शिरूर अनंतपाळ, जि.प.प्रा. मुलींची शाळा, जि.प.प्रा. शाळा भोजराजनगर, जि.प.प्रा. शाळा समानगर तसेच जि.प. प्रा. शाळा नागेवाडी येथे पार पडली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेंद्र देवशटवार, तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे, नगरसेवक ऋषिकेश आवळे, माधव खरटमोल, मुख्याध्यापक परमेश्वर तोंडारे, शिक्षक, शाळा समितीचे सदस्य तसेच लखनगावे परिवार व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे समाजासमोर सद्भावना, शिक्षणवृद्धी आणि सामाजिक जबाबदारीचे उदाहरण नगरसेवक लखनगावे यांनी घालून दिल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# गणेशनाथ केसरी पारितोषिकाने अक्षय शेळके सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७, नोव्हेंबर -**
उजनी (ता. औसा) येथे संत गणेशनाथ महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळा व यात्रा महोत्सवात अखेरच्या दिवशी पारंपरिक पालखी नगरप्रदक्षिणा, काला आणि कुस्ती फडाने वातावरण भारले. यावेळी अंतिम फेरीत पार्थ कळंत्रे (कोल्हापूर) यांचा पराभव करून अक्षय शेळके (टाका) याने विजेतेपद पटकावत 'गणेशनाथ केसरी' हा मानाचा किताब आपल्या नावे केला.

३७७ वर्षांची परंपरा असलेला हा सोहळा दरवर्षी दीपावली पाडव्यानंतर सुरू होऊन तब्बल पंधरा दिवस चालतो. अखेरच्या टप्प्यात पालखी प्रदक्षिणा, शोभेची दारू, शास्त्रीय गायन, भारुड, काला आणि कुस्ती फड यांसारख्या विविध सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवाला उंची गवसली. भाविकांच्या मोठ्या गर्दीमध्ये पोलिसांनी प्रभावी बंदोबस्त ठेवत सुरक्षेची काळजी घेतली.

दुपारी संत गणेशनाथ महाराजांच्या पालखीची प्रदक्षिणा महाआरतीनंतर संपन्न झाली. त्यानंतर गोपाळपूर येथे टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने वातावरण दुमदुमले.



नाथांचा काला गोड झाला; नामवंतांच्या भारुडांनी रसिक मंत्रमुग्ध...

कुस्ती फडाची सुरुवात लहान मल्लांच्या स्पर्धांनी झाली. यामध्ये मुलांबरोबरच मुलींनीही दमदार कामगिरी बजावली. साक्षी गरड आणि श्वेता कार्ले यांनी विजय मिळवत उजनीच्या मैदानावर आपली छाप पाडली. उपविजेतेपदासाठी झालेल्या चुरशीच्या सामन्यात राहुल मुळे (हातलाई) आणि प्रशांत जाधव (कोंड) यांच्यात रोमांचक झुंज पाहायला मिळाली. स्पर्धेचे संचालन गोविंद घारगे आणि डेव्हिजन देशमुख यांनी केले. पैलवानांना जोड लावण्यात बाबुराव ढवण, बसवराज बरदापुरे, बब्रुवान मुकडे, काशीनाथ सगट, वैजनाथ पाटील, अरुण मुकडे, भागवत जाजू यांनी मोलाची भूमिका बजावली.

विजेत्याला पारितोषिक व मानाचा फेटा मंदिर समितीचे अध्यक्ष धनराज पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी सरपंच युवराज गायकवाड, माजी सभापती योगीराज पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील, तसेच ग्रामसेवक एस.एस. सय्यद, शेखर चव्हाण, मजहरखान पठाण, रफीक शेरीकर, सुरेश गायकवाड, मुक्तार शेरीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कुस्ती, भारुड आणि भक्तिरसाने नाथांचा काला गोड झाला असून, या पारंपरिक महोत्सवाने उजनीची परंपरा आणि संत संस्कृती पुन्हा उजळून निघाली.

### कक्कया समाजबांधवांची हॅटट्रिक पूर्ण

उजनी (ता. औसा) येथील वीरशैव कक्कया समाजबांधवांनी सलग तिसऱ्या वर्षी समाजसेवेची परंपरा कायम ठेवत दर्शनार्थी भाविकांसाठी अल्पोहार (नाश्ता-चहा) व्यवस्थेची हॅटट्रिक पूर्ण केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेली ही सेवा यंदाही उत्साहात पार पडली असून, यात्रेदरम्यान आलेल्या जवळपास सर्व भाविकांनी या अल्पोहार सेवेचा लाभ घेतला. समाजबांधवांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.